१जुन १९८५ / दोन रुपये

माणूस

२५ वर्षारंभ

साप्ताहिक

माणूस

वर्ष : पंचविसावे
अंक : पहिला

१ जून १९८५
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
चारुहास पंडित

सप्रेम नमस्कार..

□ आम्हा सैनिकाच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे तुम्ही अगदी 'बडा खाना' दिलात. (माणूस १८ मे ८५) मन अगदी तृप्त झाले. तेव्हा आभार मानण्याच्या निमित्ताने हा पत्रप्रपंच. मागे गोविंद तळवलकराच्या मुलाखतीच्या निमित्ताने लिहावेसे वाटले होते पण ते राहिलेच खरं तर हल्ली तुमचे 'माणूस'चे अंक छान निघत असूनही सपूर्णपणे वाचून काढण्याचा मूड काही लागत नाही. १८ मेचा अक मात्र त्याला अपवाद ठरला. तुमची मुखपृष्ठाबाबतची बाजारु तडजोड मात्र जरा खटकलीच. मी सपादक असतो तर मुखपृष्ठावर कुठेतरी, कोपऱ्यात का होईना, 'जसपालसिंग-अविनाश धर्माधिकारी,' 'मी– एस्. एम्.-वि. शं. पारगावकर' ह्या दोन लेखाचा आवर्जून उल्लेख केला असता. ह्या सर्वांगसुदर अकाचे तेच मानबिंदू होते.

महाराष्ट्राच्या बुद्धिसामर्थ्याबद्दल मी हल्ली जरा साशकच बनत चाललोय. इग्रजीत निदान आठ–दहा तरी अशी दर्जेदार साप्ताहिके आहेत की त्यातील 'वाचकाचा पत्रव्यवहार' वाचणे हा एक निखळ आनद असतो. तुमचा माणूस वरच्या थरावर वाचला जात असूनही काही तुरळक अपवाद सोडल्यास ह्याबाबत निराशाच पदरी येते आता बघू या पारगावकरांनी जे आव्हान मराठी बुद्धिमत्तेला दिलेय ते तिला कितपत पेलतं ते. मी एकतर हे आत्मचरित्र वाचलेले नाही किंवा तितका अभ्यासही नाही माझा; पण जर हे पुस्तक मी वाचले असते तर नक्कीच माझी प्रतिक्रिया देणे मला आवडले असते; पण मला कळत नाही, तुम्ही शीर्षकात 'वादग्रस्त' हा शब्द का वापरावा? पारगावकराचा मुद्दा निराळाच आहे. त्याना ते अपुरे वाटते, काहीसे अपेक्षाभग करणारे वाटते. त्यानी आपले प्रामाणिक मत माडल्या बद्दल त्याचे अभिनदन! जसपालसिंग याची मुलाखत जास्तीतजास्त तरुणांच्या वाचनात येवो व त्याच्यातील स्पुल्लिंग प्रज्वलित होवो अस मनापासून वाटते; पण तसं होईल का?

२० मे ८५ शि. जो. शिर्के
चिपळूण

□ 'माणूस'च्या १८–५–८५ च्या अंकात 'बालरंगभूमी' या सदरात शुभदा रानडे यांचा लेख आहे. त्यात त्यानी सौ सुधा करमरकराचे एक वाक्य घातले आहे.'कारण या नाटकाच्या बाबतीत (मधुमजिरी) माझी एक चूक अशी होती की मी हे नाटक अतिशय वास्तववादी पद्धतीने हाताळले होते.' या विधानातला 'वास्तववादी' शब्द खटकला, अप्रस्तुत जाणवला म्हणून हे लिहिण्याचा प्रपच.

भारतीय नाट्य परपरेत परीला स्थान आहे. चेटकिणीला नाही.नाटकातून चेटकिणी आणणे हे पाश्चात्याचे भ्रष्ट अनुकरण आहे मुलांसमोर अशी दृश्ये कोवळ्या वयात ठेवणे मानसशास्त्रदृष्ट्या अयोग्य आहे. शिवाय झाडूवर (ब्रुमस्टिक) बसून आकाशमार्गे जाणारी कुरूप भीषण चेटकी ही पाश्चात्य आहे. भारतीय नाही. तेव्हा अशी भीषण दिसणारी चेटकी बालासाठीच्या नाटकात आणणे यात वास्तवता नसून अवास्तवता आहे. सुधाताई काही अमेरिकन मुलांसाठी नाट्यप्रयोग बसवीत नव्हत्या. तेव्हा त्यानी 'वास्तवतेची' चूक केली नसून अवास्तवतेला वास्तवता म्हणण्याची चूक केली आहे हे मी मानसशास्त्राचा विद्यार्थी व प्राध्यापक या नात्याने निश्चित म्हणू शकतो.

२० मे ८५ प्रा. मा. य. भिडे
मुंबई

□ माणूसमधून बालशिक्षणावर श्री. लीला पाटील व श्री. शोभा भागवत यांच्या अतिशय सुजाण अशा लेखमाला येत आहेत. बालशिक्षणाबद्दल पालकशिक्षण करण्याच्या दृष्टीने त्या अतिशय उपयुक्त आहेत. हे पालकशिक्षण आजच्या घटकेला अत्यंत आवश्यक आहे हे प्रत्येक समजुतदार पालक मान्य करेल. आजकालच्या शाळेतून होणाऱ्या पालकसभांना गेल्यास त्याचे उत्तम प्रत्यतर येईल व नुसते पालकशिक्षणच नव्हे तर शिक्षक शिक्षणही अत्यत आवश्यक आहे हे समजून येईल.

नुकत्याच आलेल्या ऐलमा पैलमामध्ये शिक्षकाचा एक प्रकार बकेटफीलर म्हणून दिला आहे. आजकाल बाकीचे कोणतेच प्रकार फारसे आढळत नाहीत आणि फक्त हा एकमेव शिक्षकीप्रकार बोकाळला आहे

जो लवकरात लवकर बकेट भरू शकतो तो आदर्श शिक्षक ही नवी व्याख्या रूढ करायला हवी.

शाळेतून होणाऱ्या पालकसभांतून आपल्या मुलांबद्दल काही अधिक माहिती मिळेल अशा आशेनी जाणाऱ्या पालकांच्या पदरात संपूर्ण निराशा येते. ते तर Parents' coaching classes असतात. एक एक, दोन दोन मार्कांच्या चढाओढीसाठी पालकांनी आपल्या मुलांना पणाला लावलेले असते. विशेषत: प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळेमध्ये तरी अशा चढाओढींना बंधन घालायला नको का? चौथी पास होणारे मूल जास्तीतजास्त ९ वर्षाचे असते. त्याचा किती वेळ अभ्यासात गेला पाहिजे, शाळेत त्याने कोणत्याकोणत्या निरनिराळ्या गोष्टी शिकल्या पाहिजेत याचे ज्ञान पालकांना तर नसतेच पण शिक्षकांना तरी असते की नाही याबद्दल शंका यावी.

माझ्या नात्यातील एक मुलगी, वय ३॥ वर्षे, मेंटली नॉर्मल (म्हणजे रिटार्डेड नाही) ज्युनियर के. जी. मध्ये नापास केली गेली. मॉंटेसरीचा उद्देश काय? त्याला काही ठराविक अभ्यासक्रम असतो का? त्याची लेखी परीक्षा घेऊन मुलांना नापास करता येते का? अशा अनेक शंका आम्हाला पडल्या आहेत. ३॥ वर्षाच्या त्या मुलीला तर आपण नापास झालोत म्हणजे काय ते समजण्याची शक्यता नाही. म्हणजे तुम्ही पालकांना किंवा शिक्षकांना नापास केलं असा अर्थ होतो आणि ह्या सर्वात क्लायमॅक्स म्हणजे नुसतंच नापास नाही तर 'advised to leave school' हा शेरा. तिला शाळेतून काढून टाकण्यासारखा कोणता गुन्हा तिच्याकडून झाला आहे? मोठेपणीसुद्धा फक्त Misbehaviors बद्दलच शाळा कॉलेजमधून मुलांना काढून टाकता येते आणि तुम्ही मॉंटेसरीतून एका ३॥ वर्षाच्या मुलीला नापास झाली म्हणून काढून टाकता याला काय म्हणायचे?

हे वघून त्या मादाम मॉंटेसरीचा आत्मा अक्षरश: तळमळत असेल. मुलांना शाळेची गोडी, सवय लागावी, नवीन काही शिकण्याची इच्छा निर्माण व्हावी ह्या उद्देशाने तिने निर्माण केलेल्या या वृक्षाला ही कसली कीड लागली आहे? ही कीड पालकांच्या, शाळाचालकांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेची आहे. त्यासाठी आपण आपल्या छोटच्या छोटच्या मुलांचे बळी देत आहोत हे कसे कोणाच्याच लक्षात येत नाही? शिक्षणतज्ज्ञ, राज्यसरकार याबाबतीत काहीच करू शकत नाही का?

आणि सर्वात विनोदाचा किंवा क्रौर्याचा भाग म्हणजे लहानपणी एवढे ओझे देऊन अभ्यास करून मागणाऱ्या या शिक्षणसंस्था व पालक मोठेपणी कॉलेजमध्ये गेल्यावर मात्र Supplimentary exams, Re-examinations यांच्या मागण्या कट करून व सवलती देऊन मुलांना येनकेन प्रकारेण पास करत असतात. ही कोणत्या प्रकारची शिक्षण पद्धती आणि याविरुद्ध दाद तरी कोणाकडे मागायची?

याबद्दल एका नगरसेवकाकडे चौकशीसाठी गेले असता त्याने सांगितले की, याबाबतीत काही करू शकणार नाही. तुम्ही मुलीच्या अभ्यासाकडे लक्ष द्यायला हवे होते. आई-वडिल दोघे नोकरी करणारे, एक मोठा भाऊ, त्याचा वरच्या इयत्तेचा अभ्यास म्हणून त्याच्याकडे लक्ष देण्यात मिळणारा वेळ घालवला व Jr. K. G. तील मुलीचा काय अभ्यास घ्यायचाय या समजुतीने थोडे दुर्लक्ष झाले, तर तो घोर अपराध ठरला. पुढील वर्षी चांगला अभ्यास करून घेऊ असे आश्वासन दिले, तर गेल्यावर्षी घेतला नाही तर यावर्षी घ्याल याची हमी काय हा प्रश्न या नगरसेवकांनीच विचारला. यापुढे काय बोलणार?

कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील B. Ed किंवा S. T. C. च्या अभ्यासक्रमात याबद्दल काय शिकवतात याची मला कल्पना नाही; पण या गोष्टींची गंभीरपणे दखल घ्यायला नको का? ती कोणी घ्यायची?

२० मे ८५ — आशा गद्रे, मुलुंड



☐ खैरनार आणि वृत्तपत्रे

मुंबापुरीत सध्या विशेष गाजत असलेले प्रकरण म्हणजे जी नॉर्थ वॉर्ड ऑफिसर खैरनार यांच्यावरील हल्ल्याचे. हा आमचा मजकूर हातावेगळा होईपर्यंत खैरनार सायन हॉस्पिटलमधून घरी पोहोचले असतील. खैरनार ह्यांनी अनधिकृत बांधकामांविरुद्ध जी मोहीम उघडली आहे ती सध्या चर्चेचा विषय बनली आहे.

मुंबापुरी वाचविण्यासाठी ज्यांनी जीवापाड प्रयत्न केले त्या द. म. सुखथनकर, अरुण भाटिया, कुदा कदम, ज्युलिओ रिबेरिओ ह्या नामावळीत आता खैरनार यांचा समावेश होऊ लागला आहे. मुंबापुरीतील अनधिकृत बांधकामांविरुद्ध अशा प्रकारे कोणी तरी खंबीर पाऊल उचलावे याचा आम्हाला आनंद आहे. आमचा आक्षेप एवढाच आहे की अशा घटनांना अवाजवी प्रसिद्धी देऊन व्यक्तिमहात्म्याचे जे स्तोम माजवले जाते त्याला मात्र आळा घातला गेला पाहिजे. आपल्याकडे मूळ शासनव्यवस्था, कार्यपद्धती किंवा कायदे ह्यांच्यात बदल करून ते अधिक कार्यक्षम बनविण्यापेक्षा व्यक्तिपूजेकडेच विशेष कल दिसून येतो. त्यामुळे आपल्या प्रश्नांवरचे उपायही साधेसरळ असतात. म्हणजे अंतुल्यांना तुरुंगात डांबले की भ्रष्टाचाराचा समूळ नाश होईल. माधवसिंग सोळंकींना अधिकारावरून हटवले की राखीव जागांचा प्रश्न सुटेल वगैरे.

खैरनार ह्यांच्यावरील हल्ल्याचा महापालिकेच्या सभेत निषेध झाला, त्यावेळी भाषण करताना काँग्रेस आयच्या नेत्या इंदुमती पटेल ह्यांनी एक मुद्दा मांडला, त्यात आम्हाला तथ्य वाटते. त्या म्हणाल्या खैरनार उत्तम काम करीत आहेत; पण त्याचबरोबर आपल्या पदाचा वापर ते प्रसिद्धीसाठी करून घेत आहेत. आपल्या प्रत्येक कृतीची वृत्तपत्रांनी दखल घेतली

पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो.

खैरनार ह्यांनी वांद्रे आणि माहीम येथील अनधिकृत देवळे आणि क्रॉस तोडल्यामुळे ते प्रथम प्रसिद्धीच्या झोतात आले ह्यानंतर दर दोन दिवसानी त्याचे नाव पहिल्या पानावर झळकू लागले. मागल्या दोन-तीन आठवड्यापूर्वी खैरनारांनी शालिनीताई पाटील याचे चिरजीव चंद्रकात पाटील ह्यांच्या माहीम येथील 'स्टेप-इन' हया हॉटेलने केलेले अनधिकृत बाधकाम तोडले. बाधकाम किरकोळच होते; पण ते हॉटेल दादाच्या सावत्र मुलाचे आहे आणि तोडण्याचे काम खैरनार हयानी केले, हया कारणामुळे साऱ्या प्रकरणास अवाजवी प्रसिद्धी देण्यात आली. खैरनार हयानी बाधकाम तोडण्याच्या एक दिवस आधी दोन सायंदैनिकात सर्व प्रकरणाची माहिती दिली. दुसऱ्या दिवशी बांधकाम तोडतानाही वार्ताहार बोलावून घेण्यात आले. आम्हाला हा प्रकार पटला नाही. याचा अर्थ आम्ही अनधिकृत बाधकामाना पाठिंबा देतो असे नव्हे; पण ज्याना मनापासून काम करण्याची इच्छा आहे त्यांनी प्रसिद्धीपासून दूर रहायला हवे. सुखथनकर आणि कुदा कदम ह्यांनीही बेकायदेशीर बाधकामे तोडली पण त्यानी कधी वार्ताहरांना फोन करून बोलवून घेतले नाही. खैरनार ह्याना मिळालेल्या प्रसिद्धीमुळे ज्यांची बाधकामे त्यांनी तोडली त्याना अधिकच खिजवल्यासारखे वाटले. त्यातूनच हे सूडाचे प्रकरण उद्भवले असावे.

अपराध्यांना शासन करण्यास पोलीस आयुक्त द. शं. सोमण समर्थ आहेतच. मधल्या काळात खैरनारानी वृत्तपत्रापासून मात्र दोन हात दूर रहावे, हे चागले.

☐ आलीया भोगासी

इथं खूप उकडतय असं आम्ही म्हटलं तर तुम्ही नाक मुरडणार. म्हणणार, त्या रिबेरो साहेबांकडे बघा. ऐन उन्हाळघात कलिंगडाचं थंडगार सरबत पीत पोलिसाचं समूह-नृत्य विडीयोवर पहायचं सोडून ते दिल्लीला निघून गेले. दिल्लीची हवा साप्रत बरीच तापलीये त्यात तपमानाचा अदाज ऐकण्यासाठी ट्रान्झिस्टर देखील लावायची सोय नाही !

इथ मुबईत उन्हाळा तर विचारू नका. त्यात अधून-मधून वीजच नाहीशी होते. म्हजे अगदी कलकत्ता बोरिवली-अधेरी, मुलुड-विक्रोळी या दुर्गम, दूरदूरच्या गावी हल्ली वीज अधून-मधून नाहीशीच होते. ॲट द मोस्ट, आमच्यासारखी पापभिरू माणसं काय करणार ? तर 'बहुताची अतरे' मध्ये पत्र लिहिणार; पण तोही एक डोक्याला तापच. आपण पत्रात कुठेही एक इंग्रजी शब्द चुकून (किंवा कसेही) टाकला तर प्राध्यापक अनत भावे त्याला पर्यायी मराठी शब्द सुचवणार. मग सगळी गोचीच होणार. स. गं. मालशे, अरुण आठल्ये, अ. वा. वर्टी सगळे पुढे सरसावणार, आणि बाँबे सबर्बन इलेक्ट्रिक सप्लायकडून सबुरीचं पत्र येण्याअगोदर सपादक 'हा वाद आता इथेच' संपवून टाकणार. म्हंजे उडाला ना आमचा फ्यूज ?

तेव्हा, 'आलिया भोगासी' म्हणून गप्प बसणे हा एकमेव मार्ग आम्ही चोखाळला आहे. इन्सिडेंटली, हा मार्ग साधू-सताचा आहे ! आणि साधू-संताच्या काळी वीज होतीच कुठे ?

☐ दोन गृह-प्रवेश

राजकारण हे विलक्षण नाट्याने ठासून भरलेलं आहे अन् या जबरदस्त 'सेन्स ऑफ थिएटर'मुळेच आम पब्लिकला राजकारणी पुरुषाबद्दल कुतुहल असत अस भले गालब्रेथ म्हणो, आम्हाला मात्र शरद पवारांबद्दल काडीमात्र कुतुहल नाही. किती नाटक करावीत माणसान ! आम्ही म्हणतो तुम्हाला जायचयच आहे ना काँग्रेस (आय) कळपात ? मग जा ना. इतका फापटपसारा कशाला तो फुकट ?

पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत पवारांनी आपल्या सभाव्य काँग्रेस-प्रवेशाचा पहिला नगारा वाजवला. तेव्हापासनं यत्र, तत्र सर्वत्र कोण गदारोळ उठलाय ? आबासाहेब कुलकर्णी, वसतदादा, विठ्ठलराव गाडगीळ वगैरे सगळघांनी या वादावादीत हिरीरीने भाग घेतला. आता फक्त सरोज खापर्डे, नजमा हेपतुल्ला प्रभृनी बायकानी एक जंगी वासतिक हळदी-कुकू समारभ भरवून पवारांच्या काँग्रेस प्रवेशाची घोषणा करायची खोटी आहे तेही होऊन जाऊ द्या !

या पार्श्वभूमीवर यशवंतरावाचा काँग्रेस-पुनर्प्रवेश आठवतो. मरीन ड्राईव्हवरच्या 'रिविएरा' या आपल्या घरी चव्हाणानी १९८१ साली प्रेस-कॉन्फरन्स बोलावून आपल्या गृह-प्रवेशाचा फैसला जाहीर करून टाकला पत्रकारानी नतर चव्हाणाना अक्षरशः भडावून सोडल. तरी चव्हाण ढिम्म. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या दिनू रणदिव्यानी चव्हाणाना त्याच्याच १९७८ च्या एका भाषणातला उतारा कात्रणातून वाचून दाखवला या भाषणात चव्हाणानी इदिरा गाधीच्या एकूण कार्यपद्धतीविषयी नाराजी व्यक्त केली होती उतारा वाचून रणदिव्यांनी चव्हाणांना पॉईंट-ब्लँक 'आपलं इदिरा गाधीविषयीचं हे मत आता बदललंय का' असा खडा सवाल टाकला. चव्हाणानी होकारार्थी मान डोलावली; पण किती नव्हेसली ?

त्याच काळात पत्रकारांनी टिळक भवनात पवाराना छेडलं होतं. चव्हाणाबरोबर आपणही स्वगृही जाणार का या प्रश्नाला लाब पल्ल्याच, एक तडाखेबद वाक्य फेकून पवारानी समस्त प्रेस कॉन्फरन्सला बुचकळघात टाकल होतं. शेवटी 'सडे'च्या ओल्गा टेलिस यानी पवारांकडे 'एका वाक्यात-होय किंवा नाही' उत्तर मागितलं. तेव्हा पवारही असेच नर्व्हस झाले होते. चव्हाणांसारखे.

पवाराना आमची एक नम्र सूचना आहे. जास्त वेळ न घालवता व अधिक घोळ न घालता पवारानी काँग्रेसात प्रवेश करून टाकावा. वार्ताहराना वगैरे सागण्याची काही एक आवश्यकता नाही. त्यानी मथळे आणि बातमी आधीच तयार करून ठेवलीय. फक्त डेट – लाईन तेवढी बदलावी लागेल.

—विष्णू जयदेव

सांस्कृतिक नागपूर

एक साधासुधा फोटोग्राफर मॉस्कोकडे

कोणाच्या गुणाना कशी दाद मिळेल काही सागता येत नाही. आमच्या नागपूरचा एक साधासुधा प्रेस फोटोग्राफर जयंत मुरलीधर हरकरे हा १२ व्या आतरराष्ट्रीय वृत्तपत्र फोटो प्रदर्शनाचा एक ज्युरी म्हणून

ह्या महिन्याच्या अखेरीला मॉस्कोला चाललाय ! हे प्रदर्शन आतरराष्ट्रीय वृत्तपत्र संघटनेने मास्कोला आयोजित केलेले असून त्यात जगातील सर्व प्रेस–फोटोग्राफर्स आपआपले उत्तमोत्तम फोटो स्पर्धेकरिता पाठविणार आहेत. त्यात फोटोचे अनेक विभाग रहाणार आहेत १३ देशातील ज्युरी या फोटोतून उत्तम फोटोची निवड करणार असून निवडलेलेच फोटो प्रदर्शनात ठेवले जाणार आहेत. सर्वोत्तम तीन फोटोना बक्षिसे दिली जाणार आहेत. ह्याशिवाय उत्तम फोटोग्राफर्सना सन्मानचिन्हे आणि सन्मान पदके दिल्या जाणार आहेत ह्याच प्रदर्शनाकरिता जयंत हरकरे याची एक प्रेस–फोटोग्राफर म्हणून, हिंदुस्थानचा प्रतिनिधी ह्या नात्याने एक ज्युरी म्हणून निवड झालेली आहे ज्युरी म्हणून जयतला हजारो फोटोग्राफ्स काळजीपूर्वक पहावे लागणार आहेत. जयत हरकरे येथल्या 'तरुण भारत' दैनिकाचा प्रेस फोटोग्राफर. त्यापूर्वी तो १९५० पासून १९६५ पर्यंत भारतीय आरमारात नोकरीला होता. १९७१ च्या बगला देशाच्या युद्धातही त्याने भाग घेतलेला आहे १९७४ मध्ये कोट्टायम ह्या ठिकाणी जे वृत्तपत्रीय फोटोचे प्रदर्शन भरले होते त्यात त्याच्या फोटोला दुसरे बक्षिस मिळाले होते. १९७६ मध्ये पश्चिम बगालमधील वृत्तपत्रीय फोटो स्पर्धेत त्याला दुसरे बक्षिस मिळाले जयंत हरकरे याने मध्यतरी आपल्या फोटोचे प्रदर्शन नागपूरला भरविले होते. त्यावेळी त्या प्रदर्शनाला रसिकानी चागलाच प्रतिसाद दिला होता जयत हरकरे याने अत्यत प्रतिकूल परिस्थितीतून आपला मार्ग काढला आहे. त्याच्या घरची आर्थिक परिस्थिती काही मोठी चागली नव्हती कारण हरकरे घराण्याला स्वातत्र्यप्रेमाने प्रारभीपासूनच पछाडलेले होते. घरात चार–पाच काका परतु एकाने कोठे तरी नोकरी करावी आणि बाकीच्यानी स्वातत्र्यलढ्यात भाग घ्यावा हा ह्या घराण्याचा रीतीरिवाज सगळीच मंडळी ध्येयवादी आणि जिद्दी जिद्दी किती याची एक गोष्ट आठवली म्हणून लिहितो *नागपूरला झालेल्या स्वातत्र्यलढ्यात बाबूराव* हरकरे याचे नाव नागपूरकर कधीच विसरू शकणार नाहीत स्वातत्र्य मिळाल्यानतर बाबुराव हरकरे याच्या बरोबरचे अनेक लोक मंत्रिमडळात जाऊन बसलेत बाबुरावाची आर्थिक स्थिती ठीक नसल्याने त्यानी सरकारला अर्ज करावा म्हणून अनेकानी सुचविले स्वातत्र्यसैनिक म्हणून त्याना पेन्शन मिळेल असे त्याच्या हितचिंतकाना वाटत होते बाबुराव म्हणाले, 'अर्ज ? मी काही अर्ज करणार नाही पेन्शन मिळावी म्हणून मी स्वातत्र्यलढ्यात गेलो नव्हतो सरकारला वाटत असेल तर त्याने आपणहून मला पेन्शन द्यावी.' बाबुराव हरकऱ्यानी काही अर्ज केला नाही प्रकरण अनेक दिवसपर्यंत भिजत पडले. शेवटी केंद्रिय मत्री वसतराव साठे यानी इंदिरा गाधी याना सागितले व त्यानी आपल्या अधिकारात पेन्शन मजूर केली व ती देण्याकरिता वसतराव साठे स्वतः बाबुराव हरकरे याच्या घरी गेले असे हे जिद्दी कुटुब आणि त्या घराण्यातला हा जयत हरकरे. त्याला यश मिळणारच त्याच्या मॉस्कोवारीला आम्ही सुयश चिंतितो

□

नागपूरचा उन्हाळा आता अगदी रगात आलेला आहे सकाळी ६॥ वाजल्यापासूनच तो भाजून काढायला प्रारभ करतो. सध्याकाळी ६॥ वाजेपर्यंत तो डोके बाहेर काढू देत नाही. तिकडे तुम्ही मॅजेस्टिक वगैरे गप्पात मशगुल असता तर इकडे उन्हाच्या तडाख्यात इकडील मडळी हाशहुश करीत असतात. इकडील माणूस हे उन्हाळ्याचे तीन महिने कसे जातील ह्याच काळजीत असतो. मग कसले काव्य आणि कसले लिखाण ? पुण्या–मुबईतल्या लोकानी निदान एक डोगर आणि एक नदी आम्हाला उसनी दिली तर आमचे प्रश्न कायमचे मिटतील ! नागपूरचे हवामान एकदा थड होऊ द्या, मग पहा इकडल्या लोकाचा प्रतिभेला कसा बहर येतो ते ! पण हे घडणे कसे शक्य आहे ?

–शरश्चंद्र

म सा. प. निवडणूक

रंगा मराठे– कोषाध्यक्षपदासाठी

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या त्रैवार्षिक निवडणुका जून १९८५ मध्ये होणार आहेत. या निवडणुकीत कोषाध्यक्ष पदासाठी आमचे मित्र श्री. रंगनाथ यशवंत मराठे, जे रंगा मराठे या नावाने माणूस वाचकांना सुपरिचित आहेत, हे एक उमेदवार आहेत.

ग्रीव्हस कॉटन या उद्योग समूहाच्या 'चीफ इंटर्नल ऑडिटर' या जबाबदार पदावर अनेक वर्षे काम केल्याने त्यांचा औद्योगिक क्षेत्राशी निकट संबंध आहे. निवृत्तीनंतर आपल्या अर्थव्यवहाराच्या ज्ञानाचा, अनुभवाचा व व्यावसायिक ऋणानुबंधाचा लाभ महाराष्ट्र साहित्य परिषदेसारख्या संस्थेला मिळावा ही त्यांची या निवडणुकीतील उमेदवारी मागची प्रेरणा अतिशय स्तुत्य आहे

जवळ जवळ २५ वर्षे सातत्याने विविध प्रकारचे लेखन केल्याने साहित्य जगताशीही त्यांचा घनिष्ट संबंध आहेच. म्हणून श्री. रंगा मराठे यांची महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या हितचिंतक सभासदांनी पुढील तीन वर्षाकरिता कोषाध्यक्ष म्हणून निवड करावी अशी आमची त्यांना विनंती आहे.

पुणे, २३ मे १९८५

श्री. ज. जोशी, विद्याधर पुंडलीक, वि. ग. कानिटकर, वि. शं. पारगावकर, श्री. ग. माजगावकर

पंचविसाव्या वर्षारंभानिमित्त....

चोविसावे वर्ष ओलांडून 'माणूस' आज, १ जूनला, पंचविशीत येत आहे. न खड पडता इतकी वर्षे 'माणूस' नियमितपणे प्रसिद्ध होत राहिला. प्रथम मासिक स्वरूपात, नंतर काही काळ पाक्षिक, पुढे साप्ताहिक. मध्यंतरी काही महिने आठवड्यातून दोनदाही, द्विसाप्ताहिक म्हणून 'माणूस' निघत होता. आकार लहानमोठे झाले. पण प्रकाशनात खंड कधी पडला नाही. अडचणी येत होत्या पण मार्गही निघत गेले. विक्री कधी समाधानकारक तर कधी तीन-चार हजारांपर्यंत खाली घसरलेली. जाहिरातीबाबत दुष्काळी-स्थिती कायमची. दिवाळी किंवा अशाच अधुनमधून निघणाऱ्या विशेषांकासाठी जाहिराती मिळत. एरवी खडखडाट. छापखान्याचा आधार होता, कधी पुस्तक प्रकाशन विभागाची जोड होती, म्हणून हे सर्व गाडे चालू राहिले. नाहीतर देणग्या, मदत वगैरे गोळा करण्यावाचून गत्यंतरच उरले नसते. चोवीस वर्षात असा प्रसंग सुदैवाने माणूसवर आला नाही. कर्जे काढली पण ती फेडलीही. बहुतेक सव्याज. ठेवी घेतल्या त्या परत केल्या. जाहिराती नसल्या, विक्री कमी असली तरी लेखकांनाही यथाशक्य मानधन अगदी पहिल्या अंकापासून दिले. आज श्रीशिल्लक शून्य असली तरी 'माणूस' कर्जबाजारी म्हणता येईल असा नाही, एवढे तरी समाधान आहे.

यापुढे थाबावे, की आहे त्या स्वरूपातच पुढेही 'माणूस' प्रसिद्ध होत राहावा, की नवे भांडवल, नवे तंत्र आणून त्याचा व्यावसायिक पद्धतीने विकास साधावा ? व्यक्तीच्या मर्यादा असतात व आहे त्या स्वरूपात 'माणूस' चालू ठेवायचा म्हटले तरी आज नाही उद्या या मर्यादांचा परिणाम अंकावर होणारच. अधिक व्यापक, चौफेर, व्यावसायिक स्वरूप 'माणूस' ला द्यायचे तर नवे भांडवल खूपच ओतातला हवे; व्यवसायाची म्हणून जी बंधने असतात ती पत्करावी लागतात. अशा स्थितीत माणूसचे आजचे जे काही विचारप्रधान, स्वतंत्र स्वरूप आहे ते टिकून राहिलच अशी शाश्वती नाही. नुकताच माणूसने सांगवी-सांडस येथील ग्रामायन संस्थेच्या कार्याविषयीचा एक खास अंक काढला. हा विषय माणूसला महत्त्वाचा वाटला म्हणून या अकात इतर नेहमीची सदरे, विविधता वगैरे सगळ्याला काट दिली. असा मनःपूतपणा, व्यावसायिकता आल्यावर जमू शकणार नाही. बाजारशी, जाहिरातीशी, वाचकांच्या बऱ्या-वाईट आवडीनिवडींशी अंक अपरिहार्यपणे आधिकाधिक बांधला जाईल व स्वातंत्र्याचाही त्याप्रमाणात संकोच ओघानेच होत राहील. कशासाठी हे सगळे करायचे? पैसा नाही. त्यामानाने कटकटी फार. त्यामुळे अशा अस्थिर व बेभरंवशाच्या क्षेत्राकडे सहसा कोणी वळत नाही. मग तो काळ जुना असो की नवा. त्यातून वाचणाऱ्यांची संख्या कमी. विकत घेऊन वाचणारे आणखी कमी. विचारप्रधान साहित्य विकत घेऊन वाचणाऱ्यांची संख्या तर अगदीच नगण्य. शिवाय टिव्हीचा प्रसार आता झपाट्याने होतो आहे. साऱ्या बौद्धिक संस्कृतीलाच हे एक आव्हान आहे. विनाश्रम ज्ञानप्राप्तीची, करमणुकीची ही एक चांगलीच सोय झाली आहे. वृत्तपत्राच्या वाचकसंख्येत वाढ होते आहे; पण वृत्तपत्रांना कोणत्या प्रकारचा मजकूर देणे भाग पडत चालले आहे ? वाचकांची संख्या वाढली तसा मजकुराचा भडकपणा, उथळपणा, सनसनाटीपणाही वाढला असे न करता, किंवा कोणत्याही बाह्य बंधनात न अडकता, 'माणूस' गेली चोवीस वर्षे नियमितपणे एकहाती प्रसिद्ध होत राहिला. रंजक पण उद्‌बोधक साहित्य भरपूर प्रमाणात 'माणूस' ने वाचकांना दिले. विकासात्मक पत्रकारितेचा हा एक वेगळाच प्रयोग होता. यात राजकारणाइतकेच महत्त्व विकासाच्या मूलभूत प्रश्नाना देण्याची दृष्टी होती. रगभूमी, चित्रपट हेही विषय माणूसमध्ये वरचेवर व दर्जेदारपणे येत राहिले. त्यामानाने क्रीडाक्षेत्र मात्र दुर्लक्षित राहिले. जे जे रसरशीत, ताजे, सकस, बुद्धीचा आवाका वाढविणारे, मनाचे उन्नयन करणारे,सत्याच्या अधिक जवळ जाणारे, ते ते वाचकांसमोर ठेवण्याचा 'माणूस' ने सतत प्रयत्न केला. पण शेवटी निसर्गाचा म्हणून एक क्रम असतोच. तो कोणाला चुकला आहे ? तो व्यक्तीला, तसाच सस्थेलाही लागू असतो. म्हणून पंचविसावे वर्ष सुरू होत असताना हे प्रकट निवेदन, विचारार्थ, वाचकांसमोर, माणूस-मित्र-परिवारासमोर ठेवले. यापुढे आहे त्याच स्वरूपाची वाटचाल चालू ठेवायची, व्यावसायिक पद्धतीचा अवलंब करायचा की थांबायचे ? निर्णयाची घाई नाही. पण यंदा, या पंचविसाव्या वर्षात, ह्यासंबंधीचा निर्णय घेणे कालमुसंगत ठरेल, असे वाटते.

—संपादक

मराठी बालकुमार साहित्य संमेलन पुरस्कृत

राजहंस पुस्तक हंडी

सुंदर पुस्तक हाती येते, त्यासी जडते अमुचे नाते

पुण्यातील एक नवा शारदोत्सव

सुधाकर प्रभु

पुण्यातील दैनिकातील बाल-नाटघाच्या जाहिराती पाहून आणि वाचून नाटकाला जाण्यासाठी आई-बाबांच्या पाठीमागे भुंगा लावणार नाही असा बालप्रेक्षक विरळा. शिबीर असो, बालनाटघ असो. मुलांपेक्षा पालकांनाच याचा अधिक आनंद. एका आनंदप्रवृत्तीशी त्याचे नाते जडते ह्या विचारापेक्षा 'चला तीन तास कुठंतरी गुंतून राहतोय' हा विचार अधिक बलवत्तर. त्या दिवशी एका आनंद शिबिरातील प्रश्नोत्तरात एका मुलाने बारा बालनाटचे पाहिल्याचं सांगून मला क्षणभर अस्वस्थ केलं. जाहिरातबाजीचं युग. त्याचा हा प्रभाव. सहज त्याच मुलाला सुट्टीत किती पुस्तकं वाचली असं विचारलं तेव्हा क्षणभर त्याचा, नंतर बराच वेळ माझाही चेहरा लंबोळका झाला. मराठी बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भा. रा. भागवतांनी केलेलं भाषण आठवलं. भागवत म्हणाले होते मुलांना समजून घेण्याची भूक असते. मुलांना आपण खाऊपिऊ घालतो; पण जिज्ञासेची त्यांची भूक आपण पुरवत नाही. त्यांनी काही विचारल्यावर 'गप रे! ते तुला कळायचं नाही?' असं सांगून त्याला चूप करतो. पालकमित्रहो, मुलांची ही जिज्ञासेची भूक मिटवू नका. तुम्हाला उत्तर देता येत नसेल तर तशा माहितीचे पुस्तक त्यांच्या हाती द्या.

अशा भाषणानी वर्तमानपत्रे मासिके यांचे रकाने भरतात फारतर टाळयाही मिळतात. पण पुस्तक आणि मुले यांची गाठ घालून देण्याचं काम अगदी हाताच्या बोटावर मोजण्याएवढे पालक करतात. मुलांच्या अभिरुचीचा डौल वाढवणारी त्याना विचार करायला लावणारी, त्यांचे भावपोषण करणारी पुस्तकं गुदामात पडून रहातात.

त्या दिवशी पुस्तकांचा असा विचार करत असताना अचानक पुण्यात मुलांसाठी एक भव्य पुस्तकप्रदर्शन भरवण्याचो योजना राजहंस प्रकाशनतर्फे समोर आली. पालक पुस्तकांपर्यंत येत नाहीत तर पुस्तकंच पालकांच्या दारात नेण्याची 'राजहंस' ची योजना होती. त्यांच्या पुस्तकप्रदर्शन आणि पुस्तकविक्री योजनेला उद्योगजगताने छान पाठिंबा दिला होता. कारखाना म्हणजे घाम वाहणाऱ्या श्रमजीवीचे चित्र डोळघासमोर येते पण आजच्या विज्ञानयुगात बुद्धिजीवी हा श्रमजीवी असतो आणि श्रमजीवी बुद्धिजीवी असतो. कारखान्या-कारखान्यातील पुस्तक–प्रदर्शने अत्यंत यशस्वी झाली कँटीनच्या शेजारी झाडाच्या सावलीत तर कधी चवन्य ढाळणाऱ्या उन्हात बसून पोटपूजा करून बाहेर पडणाऱ्या गिऱ्हाईकांना पुस्तकांचे गिऱ्हाईक बनवायचे ही नामी कल्पना. पण या कल्पनेला 'राजहंस' ने शिस्तबद्ध व्यवसायाचे रूप दिले.

इकडे शाळेला सुट्टी लागली होती. तरीही पुण्यातल्या प्रतिभा सभागृहातील पहिल्या जत्रेपासून पुस्तकहंडीची माझी कल्पना साकारणाऱ्या रजनी फणसाळकर, के. अ. देशपांडे व शंकर लोंढे हे शिक्षकमित्र सजावटीला लागले. कुठं कालियाच्या फडावर बसून बालमुकुंद पुस्तक वाचू लागला. कुठं मुलं फुलं झाली म्हणून पुस्तकं फुलपाखरू बनून त्यांच्याकडं झेपावू लागली. नव्या बालकृष्णाची पुस्तकहंडी चित्रित झाली तेवढघात लीलावती भागवतांना साकडं घातलं. 'पुस्तकहंडी या नावानं मराठी बालकुमार साहित्य संमेलन पुरस्कृत राजहंस पुस्तकहंडी भरवतोय. छान सुटसुटीत कवितेच्या ओळी तयार करून द्या'

'अगदी सुरस, सुबोध आणि सर्वोध हव्यात का?' लोलाताईनी फोनवर डिवचलं. सुरस, सुबोध, आणि सर्वोध साहित्यासाठी आहे मराठी बालकुमार साहित्य संमेलन. हे नेमकं वाक्य चार दिवसांपूर्वीच त्यांना ऐकवलं होतं त्याचं सव्याज उट्टं त्यानी काढलं पण छान, छान शीर्षकं फोनवरच ऐकवली.

द्या हो दुकानदार, पुस्तक छानदार

मुलांना शब्दांशी खेळायला शिकवलं पाहिजे.
–मंगेश पाडगावकर (उद्घाटक)

पाहुण्यांशी गप्पा मारण्यात मुले दंग झाली.

□

एक कथा एक चित्र
असे पुस्तक माझे मित्र
नको आम्हाला खाऊ फटाके
द्या आम्हाला छान पुस्तके
सुंदर पुस्तक हाती येते
त्याशी जडते माझे नाते

एकाहून एक सरस अशी शीर्षकं आणि तशीच हे प्रदर्शन पुस्तकांचं आणि पुस्तकांचंच आहे हे सांगणारं भव्य प्रदर्शन भावे प्राथमिक शाळेच्या नव्या करकरीत सभागृहात उभं राहिलं. शाळेच्या मुख्याध्यापिका लिमयेबाई म्हणाल्या 'आज या पुस्तकहंडीच्या रूपानं खरा शारदोत्सव या सभागृहात साजरा होत आहे.'

उद्घाटनाची संध्याकाळ उगवली. गावात रस्त्यारस्त्यावर पुस्तकहंडीचे फलक आणि पताका लागल्या होत्या. मुलांची बोटं पकडून पालक आत येत होते मंगेश पाडगावकर कुणाला स्वाक्षरी देत होते तर कुणाची जिज्ञासा आपल्या उत्तराने पुरी करत होते. ठीक ६॥ वाजता कार्यक्रम सुरू झाला. सौ. कमल प्रभुणे आणि जयश्री पातुरकर यांनी बसविलेली आनंद यात्रेची गीते सुरू झाली. या उद्घाटनाला ईशस्तवन आणि स्वागतगीत नव्हते.

सुरस, सुबोध व सबोध बालसाहित्याचा आग्रह मराठी बालकुमार साहित्य संमेलन घेते. आज प्रकाशकानी उमेदीने छापलेल बालसाहित्य ग्राहकाच्या दारात वाजतगाजत नेण्याचा गरज आहे. दूरदर्शनसारखी दृष्य माध्यमं मुलांवर प्रभावी मोहिनी घालत असल्याने पुस्तकहंडीसारखे उपक्रम ही काळाची गरज आहे असे विचार मराठी बालकुमारतर्फे मी व्यक्त केले. राजहंसतर्फे शलाका सोमणनी पुस्तके ग्राहकाच्या दारात नव्हे हातात देण्याच्या राजहंसच्या उपक्रमाची माहिती दिली. पाडगावकरांनी राजहंसने मांडलेल्या सरस्वतीच्या दरबाराची भरभरून प्रशसा केली आणि पालकांना उद्देशून म्हटलं, 'आठवा तुमचं माझं बालपण. अंकलिपी, मनाचेश्लोक, दासबोध याशिवाय पुस्तके नव्हती. आमच्यावेळी रविवार एरंडेलची बाटली घेऊन यायचा. खरोखर या पिढीचा हेवा वाटावा असं कार्यक्रमाचं नेटकं आणि रोचक संयोजन इथं घडलं आहे.'

मुलांच्या प्रतिभेचा मुक्त आविष्कार त्यांना अधिक भावला. आज आपल्या नातीसाठी त्यांच्यातला आजोबा जागा होऊन शब्दांच्या शलाकानी तो नातीला कसा रिझवतो याची उदाहरणं त्यांनी सांगितली. आजचं जग हे आनंद प्रवृत्तीचं जग आहे यावर त्यांनी भर दिला व राजहंसच्या पुस्तकहंडीने ही आनंद प्रवृत्ती सातत्याने अशीच वाढीला लावावी अशा सदिच्छा व्यक्त केल्या. 'सांग सांग भोलानाथ' सारखी बालगीते आणि पालकासाठी 'हात हवे मज असले सुंदर' सारख्या कविता म्हणून पसंतीची टाळी घेऊन पाडगावकरांनी पुस्तकहंडीचा शुभारंभ तर सुंदर करून दिला.

१२ ची संध्याकाळ 'ट्रॉक 'बहादूर फास्टर फेणेवाल्या भा. रा. भागवतांची होती मुलांच्या भेटीला त्यांचा आवडता लेखक असं या कार्यक्रमाचं स्वरूप होतं. भागवतांनी त्यांच्या बनेश उर्फ फास्टर फेणेचं बालपण आणि बालपणातला एक साहस–पराक्रम ऐकवला. आणि त्यानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम सुरू झाला. मुलं तयारीत होती. 'फास्टर फेणेला असा 'छोटा' किती दिवस ठेवणार' असा मोठा गंभीर प्रश्न एका धिटुकल्यानं विचारला. फास्टर फेणे अनेक उचापती आणि साहसं करतो; पण एवढा एवढासाही ओरखडा अंगावर निघत नाही असं आश्चर्य एकानं व्यक्त केलं.या मुलाच्या दोन्ही ढोपरावर बँडेजच्या पट्ट्या शोभत होत्या. मुलांचे प्रश्न खरोखर गमतीजमतीचे व वास्तववादी होते. अनेक मासिकांत चित्रकथा, फास्टर कथा एकाच वेळी लिहिताना उडला नसेल असा गोंधळ भा. रां. च्या डोक्यात पोरांनी उडवून दिला होता. एका मुलानं तर 'फास्टर फेणे शाळेत जातो, अभ्यास करतो, पास होतो पण त्याच्या पराक्रममालिकेतील एकही पराक्रम शाळेत वर्गात घडताना दिसत नाही तर शाळेबाहेरच्या जगात घडतो. तो शाळेत का घडत नाही असा प्रश्न केला.'

लेखक मुलांच्या भेटीला ह्या कार्यक्रमाचा शुभारंभ तर सुरेखच झाला. दुसरा दिवस होता अंतरीच्या नाना कळा खुलविणाऱ्या नकलाकार शिक्षक वि. र. गोडे यांचा. राजहंस पुस्तकहंडी ही एक आनंद प्रवृत्ती ठरावी असंच हे संयोजन होतं. वि. र. गोडे यांनी त्यांच्या प्रसिद्ध सनईवादनाने सुरवात व बालप्रेक्षकांचं स्वागत केलं. स्वत:चंच नाक दाबून हा समोरचा माणूस इतका सुंदर सनईनाद कसा काढतो हे पाहण्यासाठी मुलं कुतुहलानं पुढं सरकली. गोडे यांनी केवळ नकला व गाणी म्हटली नाहीत. छान छान कोडी घातली तशा पाठ्यपुस्तकातील कथाही साभिनय सादर केल्या. थोडक्यात 'एक संध्याकाळ नाना कळांची' असंच या सुंदर संध्याकाळचं वर्णन करावं लागेल.

चौदा तारखेला 'गम्मत गाणी' सादर करण्यासाठी आले ना. गो. शुक्ल. पुस्तक-हंडीला मुलं येणार म्हणून त्यांनी आपल्या खेळत्या, नाचत्या, बोलक्या बाहुल्याही आणल्या होत्या. दत्ता टोळ व ना. गो. शुक्ल यांनी बाहुल्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम सादर केल्यावर 'नाच ग घुमा कशी मी नाचू' हे गाणं बाहुली नाचवून ना. गो. नी सादर करून पसंतीची टाळी घेतली. त्यानंतर त्यांची गम्मत गाणी सुरू झाली.

आमच्या शेतात गवत वाढलं,
गवत वाढलं, गवत वाढलं ग
वाढलं गवत गाईनं खाल्लं,
गाईनं खाल्लं, गाईनं खाल्लं ग
गाईच्या दुधानं लोटलं भरलं,
लोटलं भरलं, लोटलं भरलं ग
लोटल दुधाचं तापत ठेवलं,
तापत ठेवलं, तापत ठेवल ग

अशा एका मागे एक अशा ओळी ना. गो चढत्या क्रमाने म्हणत होते व मुलाकडून म्हणून घेत होते.

पंधरा मे ची संध्याकाळ कवितांची संध्याकाळ होती. हा कार्यक्रम मुद्दाम आयोजला होता. पंधरा वर्षापूर्वीच्या बालसाहित्य जत्रेत एका कवयित्रीने व्यथा मांडली होती. इतक्या सुंदर पुस्तकाच्या गर्दीत माझी कवितांची पुस्तके उदासवाणी होऊन बसलीत. दुसऱ्या दिवशी त्यांच्या गाजलेल्या चार कविता मी पोस्टरपेपरवर सुंदर अक्षरात लिहून प्रवेश-द्वारावरच लावल्या. कवितेची सहा पुस्तकं त्या संध्याकाळी खपली होती. या पुस्तक हंडीत पंधराच्या संध्याकाळी लीलावती भागवत, संजीवनी मराठे, पद्मा गोळे आणि सरिता पदकी होत्या. या संध्याकाळचे संयोजन सरिता पदकी यांनी केले. त्या म्हणाल्या, 'भोवताली सुंदर सातरंगी मुख-पृष्ठांची लेणी लेऊन पुस्तके पसरली आहेत. ह्या सप्तरंगात रंगलेली मुले भोवताली आहेत. आता शब्दांचा सात रंगाचा खेळ आम्ही तुमच्यासाठी आणला आहे.'

प्रथम लीलावती भागवतानी आपला नजराणा सादर केला. प्रत्येकीने एक दोन कविता आळीपाळीने सादर करायचा हा कार्यक्रम होता. एक वेळ अशी होती की, कवी वा. गो. मायदेव आपली बालगीतं गाऊन सूस्वर आवाजात सादर करायचे.



प्रदर्शनात मांडलेली सुंदर पुस्तकं बघता बघता वेळ पुरत नसे.....

□

संजीवनीबाई मराठेनी आपली बालगीतं सुस्वर आवाजात सादर करून खुशीच्या पावत्या घेतल्या होत्या. मुलांच्या नव्या पिढीची आवड बदलल्याचं या संध्याकाळी जाणवत होतं. त्यांच्या मते हे युग फक्त ताल व ठेक्याचं होतं. तालात व ठेक्यात येणाऱ्या शब्दांना मान हालवायची सवय जाणवत होती; पण त्यांना शब्दांच्या जगात नेलं लीलावती भागवत व सरिता पदकी यांनी. लीलावती भागवत यांचा बंबवाला तर मुलांना फारच आवडला. ११५५ साली राष्ट्रीय पुरस्काराचं भाग्य लाभलेला हा कवितासंग्रह अनेक आवृत्त्या होऊन किमान तीन पिढ्या टाळ्या घेतोय. सरिता पदकी यांचे

कजा कजा मरू चला
कजा कजा मरू

हे उलटे गाणे देखील टाळ्या आणि भाव खाऊन आणि भाव मारून गेले. शेवटी त्यांनी 'बाळाला बरं नाही' व 'आईची फ' ही कविता म्हटली.एका बाळकोवाला बरं नसतं.अजीर्णच झालेलं असतं. उपास हाच उपाय; पण घरा-तले प्रत्येक जण बाळाचं उतरलेलं तोंड पाहून काहीन काही खायला देतं. शेवटी बाळ म्हणतो

आता औषध मी घेणार नाही
कारण पोटात मुळी जागाच नाही

एका पेक्षा एक सरस बहारदार आणि खटयाळ कवितांनी ही संध्याकाळ रंगली. त्यानंतर झालेल्या प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमाने कवयित्रीही रंगल्या. कवितांवर नाना प्रश्न विचारणारी मुले पाहून त्या संध्याकाळी खूप वर्षांनी साठी मत्तरीच्या उंबरठ्यावरील साऱ्या जणी परत एकदा कविता जगल्या.

१६ तारखेची सध्याकाळ खरोखरच अनेकांच्या लक्षात राहिली. सौ. शोभा भागवत यांनी मुलांना व पालकांना घेऊन ही संध्याकाळ गाजविली. आपण व आपली मुलं यावर शोभाताईंनी खूप विचार केलाय. त्या केवळ विचार करूनच थांबल्या नाहीत तर त्यांची काही उत्तरे, आडाखे तयार केले. आपण व आपली मुले हे त्यांचे पुस्तक अनेक आया आणि मावशांचे जीवाभावाचे गाणे झालेय. शोभाताईंच्या कार्यक्रमाला अनेक आया मावशा आणि त्यांच्या भाचरांनी गर्दी केली होती.

शोभाताईंनी आपल्या कार्यक्रमाची छान आखणी केली होती. सुसुत्रबद्ध सादर केलेला हा कार्यक्रम खूपच रंगला. शोभाताईंनी आई व बाळ किंवा बाबा व बेबी अशा सुमारे सात जोड्या मंचावर बोलवल्या. प्रेक्षकांना उद्देशून त्या म्हणाल्या, 'आपल्या मुलांना आपण फार जवळून ओळखतो असं आपण समजतो. खरोखर आपली मुलं आपल्या ओळखीची



आणि सातही दिवस बालमित्रांची पालकांना घेऊन अशी झुंबड उडायची.

आहेत का हेच आपण पहाणार आहोत. आज या मुलांना व पालकांना आपण बारा प्रश्न विचारणार आहोत. प्रथम हे प्रश्न मी मुलांना विचारीन तेव्हा इथं पालक नसतील. मुलाकडून उत्तर घेतल्यावर मी पालकांना बोलवीन व तेच प्रश्न पालकांना विचारीन. प्रत्येक प्रश्नाला दहा अंक मुलाचे व पालकाचे उत्तर बरोबर आलं तर पैकीच्या पैकी अंक. उत्तर चुकलं तर शून्य अंक. शोभाताईंनी पालकांना व मुलांना विचारलेले प्रश्न असे.

१) तुमचे बाबा किंवा आई तुमच्यासाठी रोज किती वेळ देतात एक तास, एका तासाहून कमी की तासाहून जास्त

२) तुमच्या टूथब्रशचा रंग कोणता ?

३) बाबा व आई यातलं आवडतं कोण ?

४) बाबा व आई तुमच्याशी गप्पा मारतात का ?

५) आईने केलेली भाजी तू खातोस का ?

६) तुमचा आवडता छंद कोणता ?

७) या आठवड्यात सिनेमा नाटक कोणतं पाहिलं ?

८) या सुटीचा उपयोग झाला असं वाटतं का ?

९) तुम्ही केलेला पसारा तुम्ही आवरता का ?

१०) घरात आईबाबांचं काही काम करता का ?

११) आई बाबा रागवल्यावर मारतात का ?

१२) पालकांनी लावलेली शिस्त तुम्हाला विचारांती हवीशी ? योग्यशी वाटते का ?

मुलाची उत्तरं नेमकी येण्यासाठी समर्पक मिळविण्यासाठी कार्यक्रम रेखीव आखला होता. मुलांची उत्तरं टिपण्याचं काम शलाका सोमण व रेखा माजगावकर करत होत्या.

या संयोजनात नेमक्या उत्तरांना आणि टिपणांना महत्त्व होतं. नंतर पालकांना हेच प्रश्न त्यांच्या लाडक्या मुलांच्या संदर्भात विचारले. मुलांनी आपली उत्तरं पालकांना कळू नये यासाठी दक्षता घेतली. तरीही एक आई, हो आईच हुषार निघाली.

सातपैकी पाच पालकांनी फक्त निम्मे अंक मिळविले. पहिला क्रमांक १२० अंक मिळविणाऱ्या सौ. पुरोहित यांना मिळाला. शोभाताईंनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून कोणतंही आगळंवेगळं भाष्य न करता आपण आपल्या मुलांना फार थोडं ओळखतो हे कौशल्याने दाखवून दिलं. शोभाताईच्या बारा प्रश्नात तुमचे बाबा तुम्हाला सणासुदीला, वाढदिवसाला पुस्तकाची भेट देतात का असाही एक प्रश्न असायला हवा होता असं मला वाटून गेलं. या कार्यक्रमानंतरचा पालकांचा प्रश्नोत्तराचा कार्यक्रमही रंगला. आपण आपल्या मुलांना ओळखत नाही. पण आपली मुलं आपल्याला अधिक ओळखतात. तेव्हा आपण आपल्या मुलांना ओळखावं यासाठी काय करावं या काळजीने अनेकांनी अनेक प्रश्न शोभाताईंना विचारले. शेवटी हे प्रश्न आवरावे लागले. दैनंदिन रगाड्यात आणि भोवतालच्या समस्याग्रस्त जीवनात आपण आपल्या मुलांच्या वाट्याला येत नाही. त्याच्या भावभुकेला, त्यांच्या वाढत्या वयाला कमी पडतो. याची खरीखुरी काळजी प्रत्येकीच्या प्रश्नातून डोकावत होती.

सतराची संध्याकाळ प्रश्नमंजूषाची होती. मुलांना जिज्ञासेच्या जगात नेणारे आणि त्यांना अधिक जिज्ञासाप्रवृत्त करणारं हे एक प्रभावी माध्यम आहे. हा कार्यक्रम सादर करणार होते दत्ता टोळ व श्रीधर राजगुरु. पुस्तकहंडीच्या माध्यमातून पुस्तकप्रियता वाढीस लागावी हाच संयोजकांचा हेतु होता. त्यासाठी वाचलेल्या पुस्तकावर हा प्रश्नमंजूषाचा कार्यक्रम आधारला होता. दररोज जत्रेत फेरी मारून मुलं कोणती पुस्तके वाचतात याचा शोध व अंदाज दत्ता टोळ घेत होते. त्यावर सुमारे तीनशे प्रश्न तयार करण्यात आले होते. यापूर्वी मराठी बाल कुमार साहित्य संमेलन व अमर चित्रकथा यानी असाच कार्यक्रम याच फेब्रुवारीत घेतला होता. तो निव्वळ पुस्तकावर आधारित होता. पण यावेळी खेळ, खेळाडू आणि सामान्यज्ञान यावरही श्रीधर राजगुरू यांनी प्रश्न तयार केले. दत्ता टोळ व राजगुरू यांनी हा कायक्रम पाचव्या फेरीपर्यंत कौशल्याने हाताळला. शेवटच्या तीन यशस्वी स्पर्धकांना शंभराची, पंचाहत्तरची व पन्नासची पुस्तके मिळणार होती. ही पहिल्या बक्षिसाचा मान प्राजक्ता महाजन या सर चिंतामणराव पटवर्धन विद्यालयात शिकणाऱ्या मुलीने पटकावला. या प्रश्नमंजूषा कार्यक्रमाला 'पुस्तकांची लयलूट' असंही सार्थ नाव शोभले असते. कारण दुसऱ्या फेरीपासून वरच्या फेरीत येणाऱ्या प्रत्येकाला पुस्तकाची अभिनव भेट मिळत होती. हा कार्यक्रम खूपच रंगला व संयोजकांनी रंगवला.

१८ मेची संध्याकाळ ही समारोपाची संध्याकाळ होती. या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते बालसाहित्यकार राजा मंगळवेढेकर. मंगळवेढेकर पुण्यात भरणाऱ्या सहाव्या बालसाहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्याची

घोषणा पुस्तकहंडीतच झाली. राजाभाऊंनी पालकांना आनंदप्रवृत्तीशी मुलांचा सहजमेळ कसा घालता येईल, यावर सुखसंवाद केला. मुलाशी बोलताना 'मातीची मस्ती व आकाशाशी दोस्ती' करण्याचा संदेश दिला. राजाभाऊ भरभरून बोलले. चार भितीच्या शाळेतल्या शिक्षणापेक्षा बिनभितीच्या शाळेतल्या शिक्षणाचे महत्त्व त्यांनी पटवले.

शेवटी काही गंमत गाणी सादर करून त्यांनी अनेक शिबिरात रंगवलेली गोड करून खा हो छोटयामोठयाची गोष्ट ऐकवली.

पुस्तकहंडी हे केवळ पुस्तक प्रदर्शन नव्हते दररोजच्या सांस्कृतिक उपक्रमाने त्याची रंगत व मूल्य वाढत होते. शेवटच्या श्रीधर राजगुरूंनी सादर केलेल्या 'वंदेमातरम्' कार्यक्रमाने याची रंगत वाढवलीच पण पुस्तकहंडी सोहळ्याचे सांस्कृतिक मूल्य आणखी वाढवले. राजाभाऊंनी देशाची मान उंच करण्याचे आवाहन केले होते. त्यासाठी हव्या असलेल्या देशनिष्ठेचा, देशप्रेमाचा संस्कार राजगुरुंच्या वंदेमातरम्ने दिला.

आज बालप्रवृत्तीवर, आक्रमण करणाऱ्या गोष्टी अनेक अहेत. अमेरिकेत दूरदर्शनने सादर केलेल्या मालिकांमुळे पुस्तकांचा खप दहा वर्षे घसरवला. १९७९ मध्ये अमेरिकन लेखिका मिस हिलमन मला चिल्ड्रन बुक ट्रसच्या मेळाव्यात भेटल्या. शाळाशाळात पुस्तक प्रदर्शने भरवून मुलांना कथा सांगून पुस्तके कशी विकली याची सफल कहाणी त्यांनी ऐकवली. आमच्याकडे आमच्या मराठी पुस्तकावर स्वस्त रशियन पुस्तकांचे व इंग्रजी पुस्तकांचे आक्रमण आहे. इंग्रजी पुस्तकांच्या बहुरंगी छपाईने मुले आकर्षित होतातच. उद्या दूरदर्शनवर मुलासाठी सुंदर कथामालिका येतील. मुलं दूरददर्शनसमोरची बैठक सोडणार नाहीत. शेवटी दृश्य माध्यम हे प्रभावी माध्यम आहे. पण आवडलेलं दृश्य दर्शक परत पाहू शकत नाही व तशी धावती दृष्ये चिंतनाला वेळ देत नाहीत ती प्रक्रिया फक्त पुस्तके आणि पुस्तकेच करू शकतात. विचारी पालकाने हे ओळखून मुलाची पुस्तकाशी गाठ घालून दिली पाहिजे. सुंदरसा फ्राक, क्रिकेटची बॅट, शाळेतली सहल, पाहुण्यांचे आतिथ्य या सर्वात पुस्तकांचे आतिथ्य करायचे आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. राजहंस पुस्तकहंडीने ग्रंथाची

प्रश्नांतून मुलांपर्यंत...शोभा भागवतांनी रंगवलेली संध्याकाळ



आणि अखेर समारोप...बोलताना बाल साहित्यकार राजा मंगळवेढेकर

□

गंगा दारात आणली पण त्यात बुडी मारायची हिम्मत आपणच शिकवली पाहिजे. आनंदीआनंद गडे जेव्हा पुस्तक हाती पडे अशी आनंदकल्लोळ उडवणारी मुलांची अवस्था मी पाहिली आहे. मुलांच्या अभिरूचीचा डौल वाढवणारं पुस्तक असो वा बालनाट्य असो ते आवर्जून पालकांनीच दाखवायला हवे. ते मार्गदर्शन पालकांनीच केले पाहिजे. मुलांना गोड आवडते म्हणून फक्त गोड वस्तूंनी मुलाचे ताट सजवले जात नाही. त्याला षड्रसाचा परिचय समजदार आई घडविते. आनंद प्रवृत्तीतही तीच गोष्ट महत्त्वाची आहे. या प्रवृत्तीतून एकदा मुलाला अभिरूचीमय बनवलं की पुढं चांगल्या वाईटाची पारख तोच करतो. एका बालनाट्यात प्रसंगा प्रसंगाला उड्या मारणाऱ्या राजाला 'बालीश' अशी पदवी एका किशोर प्रेक्षकाने दिली. त्या नाटका-

पुस्तकांचे स्वागत असे झाले

ग्रंथ आमुचा मित्र असे
सुंदर गोष्टी सांगतसे
हेच मागणे तुजशी देवा
दे आम्हाला पुस्तकमेवा
कथा कविता येती घरा
तोची आम्हा दिवाळी दसरा
नको खेळणी ही महागडी
पुस्तक माझा खरा सवंगडी

—सौ. लीलावती भागवत

तलं चांगलं आणि बालिश ओळखून त्याने नाटक पाहिलं.

पुस्तकहंडीत आजचं बालसाहित्य आणि आजचा बालसाहित्यकार ज्यांच्या खांद्यावर उभा आहे अशा दिवंगत बालसाहित्यकारांचा आवर्जून परिचय करवला. सानेगुरुजी, ना. घो. ताम्हणकर, वि. वि. बोकील, विनायक कोंडदेव ओक, का. रा. पालवणकर, वा. गो. आपटे, प्र. के. अत्रे, ताराबाई मोडक अशा एकेका दिवंगत बालसाहित्यकाराला आदरांजली वाहूनच कार्यक्रमाची सुरुवात झाली.

पुस्तकांची मांडणी, सजावट यासाठी सौ. हर्डीकर यांनी मेहनत घेतली. पुस्तकं सहजपणे डोळ्यात यावीत यासाठी त्या व त्यांचे कार्यकर्ते झटत होते. तरी पुस्तक हंडीतील प्रौढांची पुस्तके, इंग्रजी पुस्तके हे आक्रमण आहे असेही विचार व्यक्त झाले.'माझा अभिप्राय' सारखी वही ठेवून मुलांना त्यांची मते मांडायला सवड दिली असती तर उपयुक्त सूचना मिळाल्या असत्या; पण असे खूप राहून गेले; पण जे मांडले, आयोजले, संयोजले ते खूपच खूप होते. म्हणून नवी पिढी खरोखरच भाग्यवान आहे. या पिढीसाठी बालसाहित्य जत्रा आहे, पुस्तकहंडी आहे असे विचार राजा मंगळवेढेकर यांनी मांडले.

राजहंसचा वाढता आणि अमाप उत्साह हंडीत वेळोवेळी जाणवला. फक्त या उत्साहाला वेळ कमी पडला. नेटक्या संयोजनात पुस्तकहंडी परत येईल तेव्हा

नको आम्हाला खाऊ फटाके
आम्हाला हवी छान पुस्तके

याच शब्दात बालवाचक तिचे स्वागत करील.

□

डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

चार्ल्स डार्विन

व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती

लेखक : भा. रा. बापट

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार विवेचनासह प्रकाशित झालेली पहिली आवृत्ती.

किंमत : रुपये बत्तीस

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी त्वरित मागणी करावी.

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

अ.भा.वि.प. जाते कम, काम बहोत!

● मुलाखत : दि. वि. गोखले ●

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे नाव ठाऊक नाही, असे भारतात कोणतेही राज्य नसेल. खऱ्या अर्थाने ती अखिल भारतीय संघटना आहे. जवळपास सर्व राज्यांत या संस्थेच्या शाखा आहेत व त्या सक्रिय आहेत. परिषद जी कामे करते ती रचनात्मक स्वरूपाची आहेत. काँग्रेसप्रणीत नॅशनल स्टूडण्ट्स युनियनने अनेक शहरी जसे धिंगाणे घातले तसे विद्यार्थी परिषदेत अधिक विद्यार्थी असूनही घातले गेले नाहीत. एन. एस. यूचे अधिवेशन गेल्या वर्षी नागपूरला झाले, तेव्हा तेथील जनतेला मोंगल सैन्याची स्वारी आल्याचा भास झाला. विद्यार्थी परिषदेच्या स्थापनेला ३५ वर्षे पूर्ण झाली, या कालात तिची अनेक अधिवेशने विविध राज्यांच्या राजधान्यांत भरली; पण कोणाला भीती तर वाटली नाहीच, उलट परिषदेच्या तरुणांचा उत्साह व शिस्त बघून तेथील जनतेच्या मनात भारताच्या भवितव्याबद्दल आशा निर्माण झाल्या.

विद्यार्थी परिषद भारतात ख्यातनाम झाली, ती स्वर्गीय इंदिरा गांधींनी पुकारलेल्या आणीबाणीविरुद्ध, परिषदेच्या अकरा हजार सभासदांनी केलेल्या सत्याग्रहामुळे, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जन्मशताब्दीनिमित्त (मे, १९८३) तिने काढलेल्या समता ज्योतीच्या यात्रेमुळे आणि परकीय नागरिकांच्या आसामातील घूसखोरीविरुद्ध ८४ साली तिने गौहाटीत केलेल्या कणखर सत्याग्रहामुळे मात्र, परिषदेच्या खात्यात एवढीच कामे जमा नाहीत. अनेक प्रकारची कामे ती करीत आली आहे व तरुण पिढीच्या आणि देशहिताच्या दृष्टीने आवश्यक अशी नवनवीन कामे हाती घेण्याच्या पावित्र्यात ती उभी आहे.

विद्यार्थी परिषदेला हे रंगरूप देण्यात ज्यांचा मोठा वाटा आहे अशा ७-८ व्यक्तींमध्ये श्री. यशवंतराव केळकरांचे स्थान वरचे आहे. First among equals असे त्यांचे वर्णन करता येईल. यशवंतरावांनी वयाची साठी ओलांडून एकसष्टाव्या वर्षात नुकताच प्रवेश केला. इतरांनी सांगितले म्हणून हे सर्वांना समजले. केळकर स्वत:-बद्दल काही बोलत नाहीत व वृद्धत्वाच्या कोणत्याच छटा त्यांच्या चेहऱ्यावर वा शरीरावर दिसत नाहीत. टक्कल आहे ते जुनेच आहे. कामाचा झपाटा २०-२५ वर्षांपूर्वी होता तो वाढलाच असेल, कमी निश्चितच झालेला नाही. लोकसंग्रहाचा, नवनवीन कल्पना काढून त्या साकार करण्यासाठी तरुणांना कार्यप्रवण करण्याचा त्यांचा उद्योग अविरत चालू असतो दादरमधील त्यांचे घर म्हणजे विद्यार्थी कार्यकर्त्यांचे एक प्रकारे पॉवर हाऊस. कठिण समस्या घेऊन केळकरांकडे यावे व उपाययोजना नि त्याचेबरोबर उत्साह, हिंमत घेऊन परतावे. अनेक प्रश्नांच्या चर्चा तेथे घडत असतात. मात्र, गडबड, गोंधळ, त्रासणे, रागावणे नाही. यशवंतरावांचा आवाज कधीच उंचावत नाही. सर्व काही संयत, सौम्य आवाजात व आपुलकीच्या शब्दांत केळकरांच्या चेहऱ्यावरील मंद स्मित कधीच बाजूला होत नाही.

यशवंतराव शालेय वयातच रा. स्व. संघात आले व तेथे त्यांनी देशसेवेचे व्रत घेतले. मात्र, देशसेवेसाठी अभ्यासाची, विद्वत्तेची गरज असते याचा विसर त्यांना पडला नाही. महाविद्यालयीन जीवनात त्यांची परीक्षेतील उच्च श्रेणी चुकली नाही. एम. ए. परीक्षेत इंग्रजी विषयात पुणे विद्यापीठात ते पहिले आले. मात्र त्यांनी संघाची पूर्ण वेळ प्रचारकी पत्करली व सुमारे १२ वर्षं महाराष्ट्रात त्यांनी संघकार्यात व्यतीत केली.

विद्यार्थी परिषद हे संघाचेच अपत्य. संघावर महात्मा गांधींच्या हत्येनंतर झालेल्या बंदीच्या कालात काही तरुण संघ-स्वयंसेवकांनी विद्यार्थी परिषदेची स्थापना केली व केळकरांनाही त्या कार्यात ओढले. संघाच्या प्रेरणेने ज्या संस्था निर्माण झाल्या त्यांच्या नावात संघ हा शब्द आहे. उदाहरणार्थ, जनसंघ, भारतीय मजदूर संघ, कुष्ठरोग निवारण संघ इत्यादी. विद्यार्थी परिषद हा अपवाद. बंदीकालात परिषद जन्माला आली त्याचा हा परिणाम असावा.

यशवंतरावांना मी विचारले : विद्यार्थी परिषदेच्या उभारणीच्या वेळचे काही आठवते का ?

केळकर : हो. आठवते ना. संघावरचा बंदी-काल म्हणजे सन १९४८-४९. नागपूरचे प्रा. दत्ताजी डिडोळकर व दत्तोपंत ठेंगडी यांनी पुढाकार घेऊन ४८ सालीच विद्यार्थी परिषदेची स्थापना केली. ९ जुलै ४९ रोजी विद्यार्थी परिषद या नावानेच संस्था रजिस्टर करण्यात आली. हे काम केले सध्या अमेरिकेत असलेले डॉ ओमप्रकाश बहल व माजी आमदार श्री. हाशू अडवानी या दोघांनी. पुढे संघावरील बंदी उठली, तरी परिषदेचे काम थांबविण्यात आले नाही. ५९ सालपर्यंत भारताच्या सर्व राज्यात आम्ही काम नेऊन पोहोचविले. म्हणजे प्रमुख शहरी अ. भा. वि. प. च्या शाखा सुरू झाल्या.

प्रश्न : मूलभूत प्रश्नच विचारतो. विद्यार्थी परिषद नेमके काय करू इच्छिते ?

केळकर : एका वाक्यात उत्तर द्यायचे, तर राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या व्यापक संदर्भात विद्यार्थी क्षेत्रात जागृती व्हावी आणि समान परिवर्तनाची प्रक्रिया सुरू व्हावी, यासाठी विद्यार्थ्यांना संघटित करणे हे परिषदेचे उद्दिष्ट आहे.

प्रश्न : हे वाक्य ऐकायला उत्तम असले

मुंबईत २८ एप्रिल ८४ रोजी झालेल्या प्रा. य. वा. केळकर गौरव समारोहात, डावीकडून : श्री. प्रल्हादजी अभ्यंकर, प्रांत संघचालक, रा. स्व. संघ श्री. दत्तोपंत ठेंगडी, प्रा. यशवंतराव केळकर व सौ. शशिकला केळकर

तरी कोणाच्याही डोक्यावरून जाईल, असे नाही वाटत ?

केळकर : आपल्याकडून या उद्गारांची अपेक्षा होतीच; पण उद्दिष्ट म्हणून थोड क्यात सांगितले संस्था पंजीकृत झाली तेव्हा हे उद्दिष्ट नमूद केलेले आहे. विद्यार्थी संघटनेची आमची कल्पना सांगतो. अ. भा. वि प. वर्गविग्रह मानत नाही. विद्यार्थी अध्यापक, शिक्षणसंस्था यांच्यात आम्हाला सुसंवाद हवा आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या शक्तीचा विकास आणि उपयोग रचनात्मक कार्यासाठी व्हावा, विध्वंसक गोष्टीसाठी होऊ नये, ही आमची भूमिका आहे काही वर्षांपूर्वी ही कल्पना लोकांना अशक्य कोटीतील वाटे विद्यार्थी म्हटला की त्याचे रक्त गरम असणार व तो विध्वंसकच बनणार, अशी अनेकांची ठाम समजूत होती. आज परिस्थिती पालटली आहे. आमच्या संघटनेचे कार्य पाहिल्यावर विद्यार्थी रचनात्मक होऊ शकतो हे जनतेला पटत चालले आहे

प्रश्न : यशवंतराव, याचबरोबर हेही खरे आहे की, रचनात्मक काम करणाऱ्या लोकांना आंदोलन म्हटले की भीती वाटते. आंदोलन अखेर हिंसेत वा विध्वंसातच परिणत होणार अशी त्यांची धारणा असते. आपली भूमिका अशीच आहे का ?

केळकर : आमची भूमिका निश्चितच अशी नाही. आंदोलनांना आमचा विरोध नाही. विद्यार्थी परिषदेने लहान-मोठी आंदोलने किती तरी केली; पण आणीबाणीतील आंदोलन व आसाम आंदोलन ही ठळक उदाहरणे आमची भूमिका स्पष्ट करतील. केवळ आंदोलनासाठी आंदोलन करण्यास वा प्रसिद्धीसाठी आंदोलन पुकारण्यास मात्र आमचा विरोध आहे. याचे कारणही लक्षात घ्या. केवळ आंदोलने छेडत बसणाऱ्यांचे लक्ष सत्ता-राजनीतीकडे असते. संस्थेचा, आंदोलनाचा वापर ते सत्ता संपादनासाठी करून घेतात. अ भा. वि. प. सत्ता-राजकारणापासून अलिप्त राहू इच्छिते. म्हणूनच विद्यार्थी हा उद्याचा नागरिक आहे, या सबबीवर आम्ही जादा हक्क, सवलती (वेटेज) मागत नाही. तो आजचाच नागरिक आहे अशी आमची भूमिका आहे व म्हणून नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्या त्याने उचलल्या पाहिजेत, असे आम्ही सांगतो.

प्रश्न : आपल्या रचनात्मक कार्याची थोडी कल्पना द्याल ?

केळकर : कला, क्रीडा, संगीत आदी सर्व क्षेत्रात परिषद क्रियाशील आहे. वनवासी क्षेत्रात पाहणीचे कार्यही आम्ही केले. महाराष्ट्रात ७३ साली जो भीषण दुष्काळ पडला, त्यावेळी हजारो विहिरी सरकारतर्फे बांधण्यात आल्या. त्यातल्या ज्या अर्धवट होत्या त्या दुष्काळानंतर पूर्ण करणे जरूर होते; पण शासनाने तिकडे लक्ष दिले नाही. विद्यार्थी परिषदेने डॉ. केंदुरकर यांच्या नेतृत्वाखाली या विहिरींची पहाणी करून अहवाल प्रसिद्ध केला. अत्यंत उपयुक्त अहवाल म्हणून तो गाजला. सध्या विद्यापीठातील सत्र पद्धतीचे (सेमेस्टर सिस्टिम) मूल्यमापन आम्ही करीत आहोत.

प्रश्न : कला, क्रीडा क्षेत्रात तुम्ही आहात म्हणजे नेमके काय करता ?

केळकर : आमची 'कालिदास संगीत स्पर्धा' एक प्रतिष्ठेची स्पर्धा बनली आहे. या स्पर्धेसाठी परीक्षक वा पाहुणे म्हणून सर्व श्रेष्ठ संगीततज्ञ येऊन गेले. औरंगाबाद येथे आम्ही विद्यार्थ्यांच्या ऑलिंपिक स्पर्धा भरविल्या. त्यात १२३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. अगदी रेखीव पद्धतीने स्पर्धा पार पडल्या. पाहण्यांविषयी (सर्व्हे) सांगायचे तर वनवासी क्षेत्रातील सर्व पाहण्या आम्ही केलेल्या आहेत. विद्यार्थ्यांचा वनवासींशी संबंध यावा, यासाठी प्रतिवर्षी आम्ही आशागड, जांबिवली वा तलासरी येथे सहा दिवसांचे संपर्क शिबीर घेतो. यात शंभर विद्यार्थी–विद्यार्थिनी भाग घेतात. एका गंमतीदार पाहणीचा उल्लेख करायला हवा. गीर जंगलातील सिंहांच्या अभयारण्यात जे लोक राहतात, त्यांच्यापैकी पाल नामक गावच्या लोकांची सर्वांगीण पाहणी आम्ही केली होती.

प्रश्न : तुमच्या या प्रयत्नांतून स्फूर्ती घेऊन कोणी कायम स्वरूपाचे कार्य करतो का ? की विद्यार्थीदशेतील गंमत म्हणूनच सर्व काही संपते ?

केळकर : असे होत नाही. पुण्याचेच उदाहरण सांगतो. फर्ग्युसन महाविद्यालयासमोरील घोले रोड भागात दलितांची झोपडपट्टी आहे तेथे बालवाडीपासून प्रारंभ झाला व आज तेथे शालेय–महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभ्यासात मार्गदर्शन, स्त्रियांना शिवणकामाचे शिक्षण, प्रौढ साक्षरता वर्ग, आरोग्य सेवा आदी कामे चालू आहेत. गेली १२ वर्षे हे काम वाढत आहे. सुवर्णा उंब्रज-

कर, प्रमोद बेहेरे व ज्योती दाते तेथे काम करतात. अरुणाचल प्रदेश, नागभूमी या राज्यात आमचे काही कार्यकर्ते शिक्षक, डॉक्टर म्हणून गेले आहेत

प्रश्न : आंदोलने कोणती केलीत ?

केळकर : अलाहाबाद विद्यापीठात (उत्तर प्रदेश) अत्यंत किळसवाण्या व क्रूर पद्धतीने रॅगिंग चाले. आम्ही रॅगिंगविरुद्ध आंदोलन सुरू केले व प्रसंगी मारामारीस सिद्ध राहून ते बंद पाडले. हे प्रकरण उत्तरप्रदेशात खूप गाजले होते. ८३ साली मुंबई विद्यापीठातील प्राध्यापकांनी परीक्षावर बहिष्कार टाकला होता. आम्ही त्याच्या रास्त मागण्याना पाठिंबा दिला; पण save exams (परीक्षा झाल्या पाहिजेत) ही आमची घोषणा होती अखेर मागण्याबाबत तडजोड झाली व तीन आठवड्यानी परीक्षा घेण्यात आल्या.

प्रश्न : तुम्ही जे प्रश्न हाताळलेत व ज्यात तुम्हाला यश आले अशी काही प्रकरणे ?

केळकर : महाराष्ट्रात पॉलीटेक्निक्स म्हणजे यंत्रशिक्षण शाळा मोठ्या संख्येने आहेत. या संस्थातील शिक्षणाचा दर्जा व परीक्षा पद्धती याचा सखोल अभ्यास करून आम्ही काही दुरुस्त्या सुचविल्या. त्या जवळपास मान्य झाल्या आहेत. पुणे विद्यापीठाच्या सत्र पद्धतीतही आम्ही सुचविल्याप्रमाणे बदल घडले आहेत.

प्रश्न : अ. भा. वि. प. च्या कार्याबद्दल आपण बरेच सांगितेत. प्रत्यक्ष आपल्या संघटनेचा व्याप नेमका केवढा आहे ?

केळकर : देशाच्या सर्व राज्यांत आम्ही पोहोचलो आहोत. याचा अर्थ प्रत्येक विद्यापीठात आम्ही आहोतच असा नव्हे. उदा. जम्मूत अ. भा. वि प आहे; पण काश्मिर खोऱ्यात नाही. ईशान्य भारतात आमचे कार्यकर्ते आहेत. मात्र संघटना अशी नाही. जिल्ह्याच्या भाषेत बोलायचे तर देशाच्या ४१६ जिल्ह्यांपैकी ३२७ जिल्ह्यात आम्ही पोहोचलो आहोत. विद्यार्थी परिषद महाविद्यालयातील युवकामध्येच काम करते, त्यामुळे प्रमुख शहरातच आमचे काम असणार. १२५० नगरामध्ये आमचे प्रत्यक्ष काम आहे आणि तीन लक्ष विद्यार्थी आमचे सदस्य आहेत.

प्रश्न : वर्गणी वगैरे घेता की नाही ?

केळकर : वार्षिक वर्गणी ५० पैसे.

प्रश्न : सभासद संख्येत चढउतार कितपत होते ?

केळकर : आमचा अनुभव उताराचा नाही चढाचाच आहे. आणीबाणीनंतर सभासदसंख्या खूपच वाढली. ती सतत सावकाशीने का होईना, वाढतेच आहे.

प्रश्न : मुंबई शहरात आपला जोर कितपत ?

केळकर : मुंबईत आमचे काम मजबूत आहे. मात्र, या शहराच्या बकालपणाचा अनिष्ट परिणाम आमच्यावरही होतो. शहर लहान तेवढा अनुभव चांगला.

प्रश्न : तुमच्या संघटना-पद्धतीवर संघाचा प्रभाव असल्याचे जाणवते. म्हणून विचारतो, तुमच्याकडेही पूर्ण वेळ कार्यकर्ते आहेत काय ?

केळकर : केवळ महाराष्ट्रातच अठ्ठावीस पूर्णवेळ कार्यकर्ते आहेत यामध्ये काही विद्यार्थिनीही आहेत. असे कार्यकर्ते असल्याशिवाय सततचे कामे चालू रहात नाहीत आमचे काम वर्षभर अखंड चालू असते.

प्रश्न : देशात काही तुमचीच एकमेव विद्यार्थी संघटना नाही. नॅशनल स्टूडण्ट्स युनियन आहे, विद्यार्थी सेवा, क्रांतिदल आदी काही संस्था आहेत. त्याच्यात व तुमच्यात फरक कोणता ?

केळकर : बव्हंश संघटना राजकीय पक्षाशी बांधील आहेत. यामुळे संघटनातील विद्यार्थी राजकारणात उडी घेण्यास उत्सुक असतात आपल्या पक्षाला राजकीय सत्ता प्राप्त करून देणे हे त्या सर्वांचे ध्येय आहे. विद्यार्थी–विकास वा विद्यार्थीहित त्यांच्या दृष्टीने दुय्यम महत्त्वाचे. या उलट विद्यार्थी हे आमचे मुख्य लक्ष्य. राजकीय परिस्थिती, राजकारण याचा अभ्यास आम्ही करतो; पण पक्षबाजी व सत्ता–राजकारण यापासून कटाक्षाने बाजूला राहण्याचा आमचा प्रयत्न असतो

प्रश्न : यशवंतराव, सत्तेने सर्व समस्या सुटत नसल्या तरी अनेक प्रश्न सोपे होतात हे खरे ना ? मग सत्ता राजकारणापासून अलिप्त राहण्यासाठी एवढी धडपड तुम्ही का करता ?

केळकर : सत्ता – राजकारणाकडे लक्ष लागले की, संघटनेमध्ये अनिष्ट प्रवाह निर्माण होतात व मुख्य उद्दिष्टे साफ बाजूला पडतात. विद्यार्थी – विकासासाठी आमची संस्था निर्माण झाली राजकारण करायचे त्याच्यासाठी राजकीय पक्ष आहेतच की ! त्याना विद्यार्थी परिषद कशासाठी हवी ?

प्रश्न : सत्तेचा मोह तुमच्या संघटनेला नसेल. तथापि, राजकारणाचे तुम्हाला वावडे दिसत नाही. आणीबाणी आंदोलन, आसाम सत्याग्रह हे राजकारणच नव्हते का ?

केळकर : थांबा, एवढी लांब उडी मारू नका राजकारण आणि देशासमोरील महत्त्वाचे नि तातडीचे प्रश्न यात फरक आहे. ७५ सालच्या जयप्रकाशजींच्या नवनिर्माण आंदोलनात आम्ही सर्व सामर्थ्यानिशी सामील झालो कारण तो लढा मुख्यत्वे भ्रष्टाचार, लोकशाहीविरोध, दडपशाही याच्याविरुद्ध होता. मात्र, ७७ च्या निवडणुकीत जनतापक्षाने आमच्या कार्यकर्त्यांना तिकिटे देऊ केली असूनही त्यानी ती घेतली नाहीत. दिल्लीचे आमचे कार्यकर्ते श्री. अरूण जेटली याचे नाव त्याना न विचारताच, जनतापक्ष कार्यकारिणीचे सदस्य म्हणून श्री चंद्रशेखर यानी जाहीर केले. जेटलीना हा मोठा गौरव वाटेल, अशी चंद्रशेखर याची भावना असावी; पण राजकारण हे विद्यार्थी परिषदेचे काम नव्हे, असे सांगून जेटलीनी नम्रतापूर्वक चंद्रशेखरना नकार दिला आसामातील घूसखोराचा प्रश्न हा आसामच्या भवितव्याचा व पर्यायाने देशाच्या अखंडत्वाचा प्रश्न आहे म्हणून आम्ही साऱ्या भारतातून विद्यार्थी पाठवून आसामात सत्याग्रह केला. मात्र, तेथील निवडणुकीस आम्ही उभे राहू इच्छित नाही. आमची संघटना सत्तेसाठी नाही

प्रश्न : तुम्ही ज्या दोन आंदोलनाचा उल्लेख केलात ती फार महत्त्वाची आहेत. त्यातील तुमच्या सहभागाविषयी अधिक माहिती लोकाना मिळाली पाहिजे.

केळकर : ७५ साली आणिबाणी पुकारल्यानंतर आमच्या ३५० कार्यकर्त्यांना सरकारने अटक केली व 'मिसा' खाली १८ महिने तुरुंगात डांबून ठेवले. या काळात गुप्तपणे पत्रके छापणे वा सायक्लोस्टाईल करणे, ती घरोघर वाटणे, तुरुंगात गेलेल्याच्या घरी आवश्यक ती मदत पोहोचविणे भूमिगत काम करणाऱ्याना निरोप पोहोच-

विणे, त्याच्या प्रवासाची व निवासाची व्यवस्था करणे आदी कामे आमचे शेकडो सभासद करीत होते; पण आमचे खरे यश म्हणजे आमच्या अकरा हजार विद्यार्थी–विद्यार्थिनी सदस्यानी स्वयंस्फूर्तीने सत्याग्रहात भाग घेऊन लहान-मोठया मुदतीचा कारावास, आपला अभ्यास बुडवून भोगला. आसामात सत्याग्रह करण्यासाठी एक हजार विद्यार्थी विद्यार्थिनी गेल्या होत्या. अडचण द्रव्याची होती. नाहीतर आणखीही काही हजार गेले असते. आसामात तोवेळपर्यंत सत्याग्रह अनेक झाले; पण लाठीमार वा अश्रुधुराचा प्रयोग झाला की, सत्याग्रही पळून जात आमचे विद्यार्थी मात्र लाठीहल्ल्यामध्येही गाडून उभे राहिले. अनेक विद्यार्थी–विद्यार्थिनी जखमी झाले, तथापि त्यानी जागा सोडली नाही. अखेर, पोलीस–वरिष्ठाना शरम वाटली व त्यानी लाठीमार थाबविला. सत्याग्रहीना तुरुंगात नेण्याच्या मिषाने पोलिसाच्या मोटारीत कोबण्यात आले या मोटारी शहरापासून दूर जगलात गेल्या. तेथे मध्यरात्री सत्याग्रहीना सोडून देण्याचा पोलिसाचा बेत होता; पण विद्यार्थ्यांनी बसेसमधून खाली उतरण्यास नकार दिल्यामुळे पोलिसांचा बेत फसला. आसामी जनतेला सत्याग्रहाचे हे नवीनच दर्शन होते, असे तेथील इग्रजी व आसामी वृत्तपत्रानी लिहिले. देशकारण व राजकारण यातील फरक पुन्हा एकदा सागतो. आम्ही जयप्रकाशाच्या नवनिर्माण आदोलनात होतो. मात्र, महाविद्यालये सोडण्याच्या त्याच्या आदेशास आमचा सक्त विरोध होता. त्याना आम्ही तसे सागितले होते.

प्रश्न : आसामच नव्हे, तर एकूणच ईशान्य भारताबद्दल तुम्हाला आस्था दिसते. याबाबतीत आपले काही उपक्रम ?

केळकर : १९६६ साली 'छात्र जीवन दर्शन' नावाचा उपक्रम आम्ही सुरू केला. पद्मनाभ आचार्य व दिलीप पराजपे या आमच्या कार्यकर्त्यांना ईशान्य भारताचा दौरा करताना ही कल्पना सुचली. नागभूमी, मिझोराम, अरुणाचल व मणिपूर या भागात आमच्या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळाला. या भागातून ८० विद्यार्थी–विद्यार्थिनी मुबईस आल्या होत्या. त्यात १५ नागा–मिझो विद्यार्थी होते. नागा–मिझोना तेथील महाविद्यालयाकडून काही विशेष सूचना मिळाल्या असाव्यात. ही सर्व मुले विविध कुटुबात राहिली. सर्व विद्यार्थी येथील रीतीरिवाज शिकण्याचा प्रयत्न करीत. नागा–मिझो विद्यार्थी मात्र तन्हेवाईकपणे वागत. अर्थात् पहिले ३–४ दिवसच हा अनुभव आला नतर त्याच्यातही योग्य बदल झाला. हे विद्यार्थी परत गेल्यावर राज्यपाल श्री. विष्णु सहाय याना भेटले विद्यार्थ्यांचे अनुभव ऐकून ते अत्यंत प्रभावित झाले. या उपक्रमापासूनच 'बंबई हो या गोहाटी, अपना देश, अपनी मिट्टी' ही आमची घोषणा अस्तित्वात आली.

प्रश्न : याच भागातील काही विद्यार्थी बरेच दिवस पुण्या–मुबईत शिक्षणासाठी आले होते आपल्या बाबूजी फडक्याकडे (गायक सुधीर फडके) त्यापैकी एकजण होता ना कोणती योजना ?

केळकर : मगाशी उल्लेखिलेल्या योजनेची ती पुढची पायरी 'मेरा घर, भारत देश' (my home is India) असे नाव या योजनेस आम्ही दिले होते. अरुणाचलमधून ९–१० वर्षाचे ४८ विद्यार्थी महाराष्ट्रात शिक्षणासाठी आले व विविध विषयात पदव्या घेऊन परतले.

प्रश्न : देशाच्या एकात्मतेला ही योजना म्हणजे मोठाच हातभार होता. सध्या ही योजना चालू आहे का ?

केळकर : 'मेरा घर, भारत देश' ही योजना अद्यापही चालू आहे. मात्र काहीशा निराळ्या स्वरूपात. मणिपूर भागात पाटलासारख्या अधिकाऱ्यास 'गावगुडा' म्हणतात. असाच एक गावगुडा एकदा आमच्यापाशी बोलताना म्हणाला : आमच्या आर्थिक विकासाला मदत होईल असे काही तरी मुलाना शिकवा ! आता दरवर्षी ४–५ राज्यातले २० विद्यार्थी तंत्रशिक्षण घेण्यासाठी पुण्यामुबईस आणणार आहोत.

प्रश्न : विद्यार्थी आणण्याची ही योजना म्हणजे वन वे ट्रॅफिकच का ?

केळकर : एक तर देशात जेथे शिक्षणाच्या सोयी कमी आहेत तेथलेच विद्यार्थी अन्य राज्यात जाणार हे उघड आहे; पण आपल्याकडचे विद्यार्थीही ईशान्य भारतातील राज्यांत जात असतात. ६७ साली महाराष्ट्रातून २५ विद्यार्थी तिकडे गेले होते. गौहाटी स्टेशनवर त्यांचे प्रचंड स्वागत झाले. सारे स्टेशन लोकानी फुलून गेले होते.

प्रश्न : एक नाजुक प्रश्न विचारतो महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी संस्थांवर विरोधकाचा मुख्य आक्षेप म्हणजे सामाजिक समता, तळागाळातले समाज यांच्याकडे त्यांनी पाठ फिरविलेली असते.

केळकर : प्रश्नातली खोच लक्षात आली. पण मी सरळ उत्तर देतो. आम्हाला नागा, मिझोंबद्दल आस्था आहे, मात्र येथल्याच मागासवर्गीयाबद्दल नाही हा आरोपच मुळात क्षुद्रपणाचा आहे १९८२ सालापासून डॉ. आबेडकराचा महानिर्वाण दिन (६ डिसेंबर) हा आम्ही सामाजिक समता दिन म्हणून पाळतो. प्रारभी, महात्मा फुले पुण्यतिथी ते आबेडकर पुण्यतिथी (२९ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर) असा समता सप्ताहही साजरा करीत असू. हे सप्ताह वा दिन आम्ही दलिताना बरोबर घेऊन, त्याना पुढाकार देऊन साजरे करतो कित्येक दलित तरुण आमचे कार्यकर्ते बनलेले आहेत. ८३ साली स्वातत्र्यवीर सावरकर जन्मशताब्दीनिमित्त परिषदेने 'समता ज्योत यात्रा' काढली. १ मे रोजी रत्नागिरीच्या पतितपावन मंदिरातून या ज्योत–यात्रेस प्रारंभ झाला श्री. शकरराव खरातांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत यात्रेला निरोप देण्यात आला ४३७२ किलोमीटर प्रवास या यात्रेने केला महाराष्ट्रातील अनेक खेडी व नगरे वाटेत या यात्रेने घेतली. लक्षावधी स्त्री–पुरुष–मुलानी समता ज्योतीचे दर्शन घेतले सर्व जातीच्या, सर्व पक्षाच्या व सर्व सामाजिक सस्थाच्या प्रतिनिधीनी ज्योतीचे स्वागत केले २८ मे (सावरकरांचा जन्मदिन) दिनी मुबईतील सावरकर स्मारकाला अभिवादन करून चैत्य भूमीवर या यात्रेची सांगता झाली.

प्रश्न : हे सर्व उत्सवी कार्यक्रम झाले ?

केळकर : थाबा. अजून माझे निवेदन सपलेले नाही ८४ साली औरगाबाद येथे आम्ही मागासवर्गीय विद्यार्थी परिषद भरविली होती. ५७१ विद्यार्थी मेळाव्याला आले होते. या विद्यार्थ्यांना सरकार शिष्यवृत्या देते; पण त्या हाती पडण्यात अनत अडचणी येतात. मागासवर्गीय वसतिगृहांचा

प्रश्नही महत्त्वाचा आहे. या वसतिगृहांची आबाळ होते आम्ही विद्यार्थ्यांच्या तक्रारी समजावून घेऊन त्या योग्य जागी पोचवितो. ४०–५० प्रकरणे आम्ही हाताळली व अडचणी सोडवून घेतल्या. गेल्या वर्षीच दहा जिल्ह्यांत आम्ही जिल्हा मागणी परिषदा भरविल्या होत्या. या मेळाव्यांना प्रत्येकी हजार–बाराशे विद्यार्थी आले होते. जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या अडचणी अनेक आहेत. प्रयोगशाळा नाहीत, ग्रंथालये चांगली नाहीत, शिक्षकवर्ग अपुरा असतो व असलेले शिक्षक अध्यापनाकडे दुर्लक्ष करतात. खेळ, कला, विकास आदी बाबींचा विचारही ग्रामीण महाविद्यालये करीत नाहीत. या उणिवांचा प्रश्न आम्ही धसास लावू इच्छितो. एक विशेष गोष्ट म्हणजे घोषणाबाजीवर आमचा विश्वास नाही, आम्ही वाजवी तक्रारीच मांडतो, हे सरकार व शिक्षण क्षेत्रातल्या अधिकारी मंडळींना पटलेले आहे. परिणामी, आमच्या मागण्यांचा विचार अवश्य होतो. ग्रामीण महाविद्यालयांच्या अडचणी आमच्या प्रयत्नाने कमी होतील, अशी आम्हाला खात्री वाटते.

प्रश्न : हुंडा–बळी हा ज्वलंत प्रश्न बनला आहे. विशेषत: उत्तर भारतात. या संबंधात आपली काही हालचाल ?

केळकर : प्रत्येक क्षेत्रात आम्ही क्रांती घडवून आणू असा आमचा दावा नाही. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व व्यक्तित्व विकास सांभाळून किती प्रश्न हाती घ्यायचे याला मर्यादा आहे. एक गोष्ट नक्की. ती म्हणजे वि. प. चा कार्यकर्ता हुंडा घेत नाही व आमचा कार्यकर्ती आपल्या विवाहाच्या वेळी हुंडा देत नाही.

प्रश्न : हे केवळ महाराष्ट्राबाबत की उत्तर भारताबाबतही ?

केळकर : सर्व भारताबाबत. बोलायचे एक व करायचे दुसरे असला दुटप्पीपणा आम्हाला वर्ज्य आहे. अर्थात् स्त्री–मुक्ती हा विषय आमच्याही नजरेसमोर आहे. कारण, अ. भा. वि प. मध्ये स्त्रीला पुरुषांच्या शंभर टक्के बरोबरीचे स्थान आहे. श्रीमती गीता गुंडे या एक काळ ग्लॅक्सो कंपनीत अधिकारी होत्या. ह्या आमच्या पूर्ण वेळ कार्यकर्त्या आहेत. केवळ विद्यार्थिनींची संघटना ह्या बांधत नाहीत. पुरुष संघटकांसारखेच कार्य त्या विद्यार्थिनी करतात. एक आमची जिल्हा प्रमुख आहे. तिच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातले सर्व पदाधिकारी कामे करतात. विद्यार्थिनींनीच स्त्री–मुक्तीच्या प्रश्नावर पुढाकार घेतला आहे. जूनमध्ये नगर येथे होणाऱ्या शिबिरात या प्रश्नाचा विचार होईल. आमच्या संघटनेत स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान नाही.

प्रश्न : थोडे बाजूला जाऊन एक प्रश्न विचारतो. देशासमोरील अत्यंत महत्त्वाची समस्या म्हणजे भ्रष्टाचार. भ्रष्टाचाराने वर पासून खालपर्यंत समाज पोखरला असला तरी भ्रष्टाचार कमी करायचा तर शासन यंत्रणेपासूनच स्वच्छतेला प्रारंभ झाला पाहिजे. यासाठी तेथे असणारी माणसे, विशेषत: अधिकारी वर्ग सुसंस्कारित हवा. माझा प्रश्न असा की, आय. ए. एस., आय. पी. एस., रेल्वे सेवा, संरक्षण दले यामध्ये संस्कारित तरुण जाण्यासाठी आपण कोणते प्रयत्न करता ?

केळकर : काही व्यावहारिक अडचणी लक्षात घ्यायला हव्यात. आय. ए. एस., आय. पी. एस. परीक्षांना बसू इच्छिणारे विद्यार्थी स्वत:च्या अभ्यासात एवढे गढलेले असतात की, ते बाहेरच्या कोठल्याच चळवळींशी संबंध ठेवत नाहीत. तरीही सर्व क्षेत्रात विशुद्ध नेतृत्व निर्माण करावयाचे ही आमची आकांक्षा आहे व त्यादृष्टीने बुद्धिमान, कर्तृत्ववान तरुणांना सुसंस्कारित करण्याचा प्रयत्न आम्ही जरूर करणार आहोत. समाजातल्या सर्व क्षेत्रात, तसेच समाजाच्या सर्व थरातही नेतृत्व निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न राहील. काही वर्षांपूर्वी आम्ही हे बोलत नव्हतो. कारण समाजातले अनेक गट आमच्या संघटनेत नव्हते. सध्या तशी स्थिती राहिलेली नाही. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर चंद्रकांत पाटील, अशोक शिंदे, गोपीनाथ मुंढे, नीला पायरे, छाया सोनवणे अशी आमच्या अव्वल श्रेणीतील कार्यकर्त्यांची कितीतरी नावे सांगता येतील. सर्वजण विद्यार्थी परिषदेतून वर आलेले आहेत. ही प्रक्रिया उत्तरोत्तर वेगाने वाढत आहे. यामुळे आपण म्हणता त्याप्रमाणे शासन–यंत्रणेतही सुसंस्कारित तरुण अधिक संख्येने जावेत हे आमचे प्रयत्न नक्की यशस्वी होतील.

□

षष्ठब्दपूर्तीनिमित्त श्री. दत्तोपंत ठेंगडी यांच्या अध्यक्षतेखाली श्री. यशवंतराव केळकरांचा मुंबईत नुकताच हृद्य सत्कार करण्यात आला. वयाच्या दृष्टीने केळकर निवृत्त झाले आहेत. मात्र, ते थोडेही थकलेले नाहीत. नवनवीन योजना त्यांच्या डोक्यात घोळत असतात. आणि त्या योजना कृतिमान करू शकतील, असा विश्वासू व कर्तृत्ववान कार्यकर्त्यांचा संच त्यांनी जमविला आहे. विद्यार्थी परिषदेने गेल्या ३५ वर्षात केलेल्या कार्याचा त्यांच्या मुलाखतीतून प्रगट झालेला ओझरता आढावा पाहिला तरी मन थक्क होते. भारतातील एकही विद्यार्थी संघटना तिच्या जवळपासही उभी राहू शकणार नाही. मात्र, यामुळेच तिच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत. समाज परिवर्तनाच्या चक्राला तिने अधिक गती द्यावी, देशाच्या एकात्मतेचे महत्त्व उगवत्या पिढ्यांवर बिंबवावे व शिक्षण क्षेत्राबरोबरच देशातील भ्रष्टाचारी वातावरण शुद्ध करावे, अशी जाणत्या भारतीयांची अपेक्षा आहे. घोषणाबाजी व पक्षबाजी यापासून काही योजने दूर राहून ज्या कल्पकतेने व धडाडीने विद्यार्थी परिषदेने कार्य चालविले आहे ते पाहिले की, लोकांच्या अपेक्षा ती साकार करील याबद्दल शंका वाटत नाही. श्री. यशवंतराव केळकरांना उत्तम आरोग्य लाभो ही प्रार्थना. अ. भा. वि. प. ला मनपूर्वक शुभेच्छा. □

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

ह्या ना त्या निमित्ताने

शेक्सपियरने म्हटलंच होतं....

फिरोझ रानडे

'आता काहीही होवो, बॉम्बेचं नाव आम्ही मुंबई करून घेणारच घेणार. मग आमची शेंडी तुटो की पारंबी तुटो!'

अशी ऐतिहासिक नाटकात शोभेल अशी घोषणा अर्थातच श्यामचे उजव्या बाजूच्या शेजाऱ्यांनी म्हणजे कर्व्यांनी केली होती. कर्वे पूर्वाश्रमीचे पाढरा शर्ट व खाकी हाफ पॅन्टवाले. त्याना आपल्या पूर्वीच्या सस्कृतीची आणि पूर्वी आपले असे म्हणून जे जे काय होते त्याचा फार जाज्वल्य अभिमान होता. फक्त त्यांची 'आपले' ह्या शब्दाची व्याख्या वेळोवेळी व वेळेनुसार बदलत असे. जागतिक गोष्टी संदर्भात त्यांचे 'आपले' म्हणजे जे जे भारतीय असेल ते असे, भारताच्या संदर्भात मराठी असेल ते, महाराष्ट्राच्या संदर्भात ब्राह्मणांचे व ब्राह्मणांच्या संदर्भात जे काही चित्पावनी असेल ते त्याचे 'आपले' असे.

'मग तुमची शेंडीच तुटणार बघा!' अर्थातच हे वाक्य खडूसपणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या श्यामचे होते हे वेगळे सागायला नकोच. श्याम ते खडूस वाक्यच बोलून थाबला नव्हता तर त्याला जोड म्हणून खडूसपणे जोरात हसलासुद्धा होता.

पण त्या खडूस हास्याला तेथे जमलेल्यापैकी कोणीही साथ दिली नाही. म्हणजे हसले नाही. कारण त्या सर्वांचे मत कर्व्याप्रमाणे व इतर चार कोटी मराठी बांधवांप्रमाणे बॉम्बेचे मुबई व्हावे असे होते.

आणि तशी तीव्र इच्छा असणे साहजिकच होते. त्याच्या मते नावाला फार महत्त्व होते. आता 'नावात काय आहे?' असा प्रश्न भले शेक्सपियरसाहेब विचारो. शेक्सपियरसाहेबाला मराठी मनाची कल्पना येणे शक्य नव्हते. तो काही मराठी वा हिंदी बाधवांप्रमाणे वर्षोनवर्षं गुलाम नव्हता. त्यामुळे त्याच्या देशाचे वा गावाचे नाव बदलण्याचा कधी प्रश्नच निर्माण झाला नव्हता. नाहीतर त्याने 'नावात काय आहे' असा खुळा प्रश्न विचारला नसता व तोही अशीच 'शेंडी तुटो–पारंबी तुटो' घोषणा करता झाला असता.

आता शेक्सपियरला शेंडी नव्हती ही गोष्ट खरी असली तरी त्याचे डोकीवरले सगळे केसच शेंडी एवढे लांब असल्याने तशी काही तात्रिक अडचण निर्माण झाली नसती.

'तुटली शेंडी तर तुटो पण कर्वे भाऊजी म्हणतात ते बरोबर आहे. आम्ही मराठी लोक बॉम्बेचे मुंबई करून घेणारच घेणार!' राधापण आपला मराठी बाणा दाखवत म्हणाली. खरं म्हणजे ती कर्व्यांना नेहमी कर्वेच म्हणत असे; पण तूर्त ती मराठी मूडमध्ये असल्यामुळे कर्व्यांचे कर्वे भाऊजी झाले होते.

'मी मघा म्हटलेलं परत म्हणतो की, तुमची शेंडी तुटणार!' श्यामचे परत खडूस उत्तर आले.

'पण काय म्हणून आमची शेंडी तुटणार? त्याची पारबी का म्हणून नाही तुटणार?' तरुण व रागीट कामत रागाने म्हणाला. खरं म्हणजे तो मघाशीच हे म्हणणार होता पण श्यामच्या मघासच्या खडूस वाक्याने त्याचा राग इतका अनावर झाला होता की, त्याला शब्दही फुटत नव्हता.

'आम्ही संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी जसे हुतात्मे झालो तसे ह्यावेळी होऊ! त्यावेळी १०५ लोकांनी प्राणाहुती दिली, वेळ पडली तर ह्यावेळी आम्ही २१० जण आहुती देऊ!' जनतेचा आपल्याला पाठिबा आहे बघून कर्व्यांना जोर चढला.

'ते कराल हो!' श्याम शांतपणे म्हणाला, '२१० च काय पण ४२० हुतात्मे होतील! पण ह्या सगळ्याचा फायदा काय?'

'बघा बाई ह्याचा विचित्रपणा!' राधाला श्यामचा विचित्रपणा सहन झाला नाही. 'आपल्या राजधानीचं नाव आपल्याला हवं ते असण्याचा आमचा अधिकारच आहे. त्यात फायद्याचा प्रश्न येतो कुठे?'

आता फक्त कामतच नाही तर सगळे वातावरणच तापले होते.

'पण आम्हा मराठी माणसावरच हा अन्याय का? मद्रास प्रांताचं तामिल-नाडु केलं, म्हैसूरचं कर्नाटक केलं मग आमच्या बॉम्बेचं मुबई करायला काय हरकत आहे? मराठी माणसाच्या मागण्याच्या वेळीच ही खळबळ का?' परत एकदा कर्वे उफाळले व त्यांना बाकी सर्वांनी पाठिबा दिला.

मराठी माणसाच्या मनात जे काही समज व गैरसमज आहेत त्यात आपल्यावर सगळं जग, दिल्लीचे राज्यकर्ते अन्याय करत असतात हा गैरसमज क्रमांक एकवर आहे. कोणत्याही बाबतीत आपल्यावर अन्याय होतो ही त्याची नेहमीची मनोधारणा. कर्वे व तेथे असलेली मंडळीचीपण तीच भावना होती.

'पण मग तुमच्या मुबई प्रांताचेपण नाव महाराष्ट्र केलच की?' श्याम त्या दृष्टीने थोडा अ-मराठी होता. २०–२५ वर्षं महाराष्ट्राच्या बाहेर राहिल्यामुळे कदाचित् तो असा अमराठी झाला असावा. त्यामुळे सर्वसामान्यपणे ज्या गोष्टींनी मराठी माणसं पेटून निघतात तसा तो निघत नसे.

'तो आमचा मोठा विजय होता!' बर्वे म्हणाले.

'त्यावेळी आम्ही पडेलपणाचं धोरण स्वीकारलं नाही, त्यावेळी तुमच्यासारखे लोक आमच्यात नव्हते किंवा कमी होते, त्यामुळे आमचा विजय झाला!' कामतने जोड दिली.

'आणि तुमच्या पूनाचं नाव पुणे केलच की?' श्याम आपले म्हणणे पुढे रेटत म्हणाला.

'तो आमचा आणखी एक विजय होता.' विजयी कर्वे परत विजेत्याच्या स्वरात म्हणाले.

'आणि त्याच्याकरता हुतात्मे वगैरे होण्याची गरज पडली नाही.' श्याम वकिली वृत्तीने म्हणाला,

'म्हणजे दिल्लीकरांच्या मनात मराठी लोकांविषयी काही किल्मिष आहे हे म्हणणे तेवढे खरे नाही. आणि मी विचारतो की, मुबई प्रांताचा महाराष्ट्र झाला, पूनाच पुणे झाले. त्याचा फायदा असा तुम्ही ज्याचा एवढा कैवार घेता त्या सर्वसामान्य मराठी माणसाचा, काय झाला?'

श्यामने विचारलेल्या प्रश्नाने आता सगळेच प्रश्नात पडले.

पुणे आणि पूनामुळे काही फरक पडला नाही. लक्ष्मी रोडवरची हळूहळू सगळी दुकाने बिगर मराठी घेत आहेत. सगळी भारी हॉटेल्स पंजाब्याची तर साधी हॉटेल्स इडली-मसाल्याडोस्यावाल्यांची होत आहेत.

'कॅम्पात गेलं तर विश्वास बसत नाही

आपण मराठ्यांच्या सांस्कृतिक राजधानीत आहोत म्हणून ! तेव्हा सांगा काय फायदा झाला पूनाच पुणे होऊन ?'

'निदान पुण्याची माणसं बदलली असती वा त्याची वृत्ती थोडी बदलली असती तर काही तरी लाभ झाला असता पण तेही नाही.' श्यामने जाता जाता पुण्याच्या लोकांना चिमटा काढला व तो अपेक्षेप्रमाणे राधाला जाचला.

'तुमचे पुण्याच्या लोकाचं राहू दे !' राधा मोठ्या फणकाऱ्याने म्हणाली, 'पण नाही म्हटलं तरी आपल्या पूर्वीच्या संस्कृतीचा, इतिहासाचा, नावाचा अभिमान असायला नको ?'

'अग गावाची नावं अशी काय मोठी संस्कृतीला धरून ठेवली असतात की त्याचा इतिहासाशी अर्थपूर्ण संबध असतो ? आता आमच्या नाशिकचं बघा !' श्याम नाशकाचा होता हे सगळ्यांना माहीत होते. त्यामुळे नाशिकविषयी तो काय सागतो ह्याबद्दल सगळ्यांना उत्सुकता लागली.

'नाशिकच काय म्हणालात भाऊजी ?' कर्वेबाई राधाच्या पावलावर पाऊल टाकत म्हणाली. पण कर्वेबाईंनी 'भाऊजी' म्हटल्यावर श्याम थोडा खजिल झाला. पण त्याने तो खजिलपणा झटकून टाकला. तेवढ्यात कोणीतरी म्हणाले, 'लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक ह्या गावी कापले म्हणून त्याला नाशिक म्हणतात ना !'

'ती सगळी दत-कथा आहे. नाशिक म्हणजे गोदावरीच्या उगमाचा प्रदेश म्हणजे थोडा डोगराळच. तेथे पूर्वी नऊ लहान टेकड्या होत्या म्हणजे नऊ शिखरं होती त्यावरून नाशिक हे नाव आले.

पुढे ज्यावेळी शहाजहान उत्तरेतून आला व नाशिकच्या परिसरात मुक्काम केला व नाशिकचं नाव त्याने ठेवले गुलशनाबाद !

'आता शहाजहान फार थोडा काळ नाशिकला राहिला.' त्यामुळे गुलशनाबाद नाव मागे पडले व परत लोक शहराला नाशिक म्हणायला लागले.'

'पण त्याने काही फरक पडला नाही. तेथेही सगळी हॉटेल्स, नवे कारखाने मुख्यत: अमराठी लोकाचे आहेत. हजारोनी सिंधी, पंजाबी, केरळीच लोक तेथे आहेत.'

'आता औरगाबाद बघा ना, कोणतेही मोठे वाढते शहर बघा ! हेच दिसेल.'

'नाशिक शहराच नाव गुलशनाबादचे परत नाशिक झाले आणि औरंगाबादच तेच राहिल. तरी पण त्याने फार फरक पडला नाही.'

'औरंगाबाद, अजंठा व एलोराजवळ असल्यामुळे डझनाने पचतारांकित हॉटेल्स झाली आहेत. पण त्यातलं एकसुद्धा मराठी माणसाचं नाही. सगळे पंजाबी किंवा सिंधी!'

'आता सागा नाव बदलण्याचा किंवा पूर्वीचे परत करण्याचा कांही फायदा मराठी माणसाला झाला का ?'

श्यामच्या म्हणण्यात पुष्कळ तथ्य होते त्यामुळे त्याचे प्राध्यापकी आणि म्हणून लाबडे झालेले भाषण सर्वांनी शातपणानी ऐकून घेतले त्यामुळे काही वेळ शातता राहिली. पण मग राधालाच रहावल नाही. ती म्हणाली,

'पण मग एवढे मोठाले नेते मुंबई नावाची मागणी करताहेत ते उगाच काय ?' 'का त्यात त्याचा काही स्वार्थ आहे अस तुम्हाला म्हणावयाचं आहे ?' कर्वे जोड प्रश्न विचारते झाले.

'त्यात त्याचा काही वैयक्तिक स्वार्थ नाही हे खरे आहे. ते म्हणतात व मागणी करतात ती ही केवळ मराठी प्रेमापोटी हेही खरे आहे. पण आपल्या लोकाचे होते काय की आपण भावनेच्या आहारी चटकन जातो. त्यामुळे लाबवरचा विचार आपण करू शकत नाही.' श्यामची प्राध्यापकी परत सुरू झाली.

'पण त्याने काही नुकसान तर होत नाही ना, मग झालं तर !' राधालाच आता काही दुसरा मुद्दा सुचेना.

'अग, नुकसान होत आहे म्हणून तर हे सगळे.' श्यामने उत्तर दिले.

'ते कसे काय बाई ?' कर्वेबाईंनी विचारले.

'आता हे बघा, मुबईचे कितीतरी प्रश्न आहेत. शेकडो लोक मुबईत दररोज येत आहेत, दररोज जुग्या-झोपड्या वाढताहेत, पाणी नाही, गलिच्छपणा, चोरी-मारामाऱ्या वाढताहेत आता ते प्रश्न महत्त्वाचे की मुंबईच्या नावाचा प्रश्न महत्त्वाचा ?'

'आता होईल काय, की ह्या नाव बदलण्याच्या चळवळीमुळे लोकाचे ह्या महत्त्वाच्या प्रश्नाबरून लक्ष उडेल. राजकारणी, अगदी साम्यवादीसुद्धा ह्या मागणीला साथ देतील, लढा होईल परत १०५ हुतात्मे होतील. मग सरकार बॉम्बेचे मुबई करील पण तोपर्यंत मुंबई जास्त गलिच्छ होईल, जास्त जुग्या-झोपड्या वाढतील, चोऱ्या-माऱ्या वाढतील व आता मराठी ४०% आहेत ते २५% वर येतील.'

'व परत १०५ हुतात्म्यांना वदन करून माहिती आणि प्रसारण मत्री तिसरी किंवा चौथी वाहिनी सुरू करतील; पण मराठी माणूस आहे तेथेच राहील किंवा मागे हटेल. आणि परत प्रश्न उभा राहील की मुबई (पूर्वीची बॉम्बे) महाराष्ट्रात आहे पण मुबईत (म्हणजे पूर्वीच्या बॉम्बेत) महाराष्ट्र कुठे आहे ?'

'आणि तसं बघितल तर मराठ्यांचा अधिकार काय आहे.' आता श्यामला फिरकी घेण्याची हौस निर्माण झाली. 'प्रथम तेथे आध्रांच्या राजाचे राज्य होते. मग मुसलमानाचे, मग स्पॅनिश, मग इग्रज ! म्हणजे मुबईवर मराठी राज्य कधीच नव्हते. पुढे मुबईचा विस्तार व सुधारणा पारशी, गुजराती, भाटिया लोकांनी केली तेव्हा मुबईवर आपला अधिकारच काय ?'

हे ऐकताच सगळे चवताळून उठले व त्यानी मुबईवर मराठी लोकांचा कसा अधिकार आहे हे सिद्ध करायलाच तावातावाने सुरुवात केली. त्यांना थोड्या वेळ बोलू दिल्यावर श्याम म्हणाला, 'पण बॉम्बे नाव बदलून मुबईच का करायचं ?'

'बघा बाई ह्याचा प्रश्न !' राधा सगळ्यांना उद्देशून म्हणाली व मग श्यामकडे वळून म्हणाली, 'अहो मुबई हे ह्या शहराचे जुने नाव. येथे मुम्बादेवी म्हणून देवी आहे. त्याच्यावरून आलेले ! सगळ्यात जुने नाव म्हणून बॉम्बेचे मुबई करायचे !'

'पण ह्या शहराचे सगळ्यात जुने नाव मुम्बई नाही काही. येथे बुद्ध कालात ग्रीक लोक आले होते त्यानी ह्या गावाचे नाव ठेवले होते हेप्टानसिया ! आता जर जुनेच नाव ठेवायचे तर मुबई का ? चागले २-२॥ हजार वर्षापूर्वीचे ग्रीक नाव ठेवावे हेप्टानसिया म्हणून.'

हे सगळे सगळ्यांना नवीन होते ते श्यामकडे बघतच राहिले.

□

● अविनाश भगवंत धर्माधिकारी ●

तीन मे एकोणिसशे पंच्याऐंशी
मुक्काम बडोदा

कालच्या दिवसभरात डोळ्यासपोर बडोदा शहरही आलं आणि वर्तमान घडामोडींमधले महत्त्वाचे प्रवाहही ध्यानात आले. वाडी, रावपुरा मांडवी, अहमदाबादी पोळ अशा भागातून फिरताना पुण्याच्याच कसबा, सोमवार, घोरपडी पेठांमधून फिरल्यासारखं वाटत होतं. तसं बडोद्यात फिरताना अनेकदा पुण्याची आठवण व्हावी अशी शहराची रचना, हवामान आणि लोक आहेत. कालसुद्धा गप्पा मारताना 'पूनासे' म्हटलं की, बोलणाऱ्यानं मराठीतच बोलायला सुरुवात केली, असं वारंवार झालं. रात्री भोगीभाईंची मुलाखत संपल्यावर घरापर्यंत सोडायला त्यांचा मुलगा आणि पुतण्या आले होते. पुतण्या नाशिक रोडला नोकरीला आहे. जवळच्या रस्त्यानं आणण्यासाठी त्यांनी छोट्या गल्ल्यातल्या वाटानी आणलं. आसपास पसरलेली हरिजन वस्ती दाखवली. त्यातच वाटेत एक लग्न लागलेलं होतं. त्याचा मांडव रस्त्यावर होता, दिव्यांच्या माळा लावलेल्या होत्या. रस्त्यावरच पंगत थाटलेली होती. पत्रावळीवर वाढलेलं जेवण साधंच वरण–भाताचं होत. पण पंगत बरीच लांब पसरली होती. भोगीभाईंच्या मुलाला पाहिल्यावर तिथल्या एक-दोन जणांनी पंगती मधूनच वाट काढून दिली. पायात चप्पल घालून त्यातून चालताना संकोचून गेल्यासारखं तर होत होतेच जण दिवसभर ज्या सामाजिक प्रश्नांची मोठेमोठे शब्द वापरत चर्चा चालू होती त्याचं किती वेगळं भान त्या लग्नाच्या सोहळ्यावर ओझरती नजर फिरवताना जाणवत होतं.

बाहेर घडतंय ते सगळं यांच्या रोजच्या जगण्यावर परिणाम करणारं. याचं यांना भान असेल का? आपण आपले पत्रकार म्हणून वहीत भराभर टिपणं घेताना या माणसांचे चेहरे डोळ्यांसमोर येतात का? राखीव जागा, मुख्यमंत्रीपदाचं राजकारण, पोलिसांचे अत्याचार, वृत्तपत्रांवर हल्ले, हिंदु-मुस्लिम दंगली, सामाजिक समता; घटना, वैचारिक मांडणी असं कितीतरी... हे सगळं कुठे आपल्या कातडीहून खोल उतरतं का? लग्नाचं ते दृश्य मनात अस्वस्थता जागी करून गेलं.

आज किरीट भट यांची भेट होऊन चर्चा झाली तेव्हा अशीच अस्वस्थता ल्यायलेला 'माझिया जातीचा मज भेटे कोणी' असं वाटलं. किरीट भट हे 'लोकसत्ता' मधले एक ज्येष्ठ पत्रकार. साध्या खादीच्या वेशात असतात. पत्रकार म्हणून ज्येष्ठ पण अहंकाराचा कुठे स्पर्शही नाही. सुप्रसिद्ध बडोदा डायनामाईट केसमध्ये ते एक आरोपी होते. त्यांच्या प्रौढ चेहऱ्यावर गुजरातमधल्या परिस्थितीनं हृदयात उठलेली कळ स्पष्ट उमटलेली दिसत होता. कालच्या चर्चेतले कितीतरी मुद्दे त्यांच्याकडूनच स्पष्ट करून घेतले. एका चांगल्या पत्रकाराचा अभ्यास तपशीलवार असावा लागतो, नुसता पांडित्यपूर्ण अभ्यास पुरत नाही, त्या विषयाशी त्याचं अंतरीचं नातं असावं लागतं आणि त्याहून सर्वात महत्त्वाचं म्हणजे असा पत्रकार कसलीही व्याख्यानबाजी न करता, पण समाजाचा एक शिक्षक असतो. प्रबोधनाचा शिल्पकार असतो. याचं मूर्तरूप किरीट भट यांच्यात दिसलं.

दलित-मुस्लिम axis, वर्गयुद्ध आणि दलितस्तानची कुजबूज इथपासून प्रश्न विचारले. किरीटभाईंनी सांगितलं की, आपले दलित बांधव सहकारी चिडून ही भाषा वापरतात, तेव्हा त्यांची वेदना आपण ध्यानात घ्यायला हवी. भोगीभाईसारखा कार्यकर्ता घ्या. त्यांचं तळमळीचं नाणं खणखणीत आहे. त्यांच्या वक्तव्यांवर न जाता सामाजिक न्याय प्रस्थापित होण्याची निकड आपण ओळखायला हवी. तसं मला तुम्ही विचाराल तर असा काही दलित-मुस्लिम axis आजतरी अस्तित्वात नाही किंवा अचानक वर्गयुद्ध पेटायची शक्यता नाही. राजकीय पक्ष-निष्ठा बाजूला ठेवून विचार केला तर आपल्याला हे मान्य करायला पाहिजे की, स्वातंत्र्यानंतर मागासवर्गीयांच्या विकासाच्या दिशेनं थोडीफार तरी का होईना प्रगती झाली आहे. आर्थिकदृष्ट्या, सर्वसाधारणपणे दलित १९४७ पेक्षा १९८५ त अधिक बऱ्या स्थितीत आहेत. पण आर्थिकविकासाइतकंच महत्त्वाचं म्हणजे सामाजिकदृष्ट्या एकत्र वावरणं, विचारांची देवघेव, शिक्षणप्रसार. किरीटभाईंच्यामते मागासवर्गीयांतही सामाजिक संघर्षाच्या

गुजरात वार्तापत्राचा पूर्वार्ध गेल्या अंकात प्रसिद्ध झाला. हा उत्तरार्ध...

प्रश्नावर दोन तट आहेत : एका गटाला सवर्ण समाजाशी टक्कर घेणं नको आहे तर दुसऱ्या गटाला अशी लढाई हवी आहे. विशेषत: तरुणामध्ये ही खुमखुमी जास्त आहे. पण वर्गयुद्ध दलितांच्या हिताचं नाही. किंवा राष्ट्रविरोधी भाषा, राष्ट्रविरोधी घटकाशी हातमिळवणी यामुळे दलित आणखीनच अडचणीत येतील. जोपर्यंत हा समाज हा देश तुम्ही आपला मानता तोवरच समानता, समृद्धी मागायचा तुमचा हक्क आहे. पण एकदा का त्या देशाशी, समाजाशी वैर पत्करून द्रोह करायलाच ठाकलात की, तुमचा हा हक्क संपतो. मी स्वानुभवानं तुम्हाला सांगतो की, भोगीभाईंसारख्या कार्यकर्त्यांना याची जाण आहे. जसवत मकवाना नावाचा आणखी एक ज्वलत दलित कार्यकर्ता आहे. तो काँग्रेसमध्ये होता. पण सोळंकीविरोधक कोणत्यातरी एका भाषणात तो म्हटला की, राखीव जागा रद्द झाल्या तर आम्हाला दलितस्तानची मागणी करावी लागेल. याचं निमित्त करून त्याला पक्षातून काढून टाकण्यात आलं. म्हणजे खरं तर सोळंकी गटानं आपला राजकीय हिशोब या वाक्याच्या आवरणाखाली चुकता केला आहे. कारण जसवंतभाईंची खरी भूमिका आहे की, सर्व समाजानं आम्हाला समतेनं सन्मानपूर्वक वागवावं. माणसान माणसाला वागवावं तशी वागणूक दलिताना मिळाली तर आम्ही राखीव जागासुद्धा मागणार नाही. आज अजूनसुद्धा राखीव जागविरोधी आंदोलनात कुठे हिंसक प्रकार नाहीत, कुठे सवर्ण–दलित मारामाऱ्या नाहीत. एखादा अपवाद वगळता हिंसकतेचे मुख्य प्रकार हिंदु–मुस्लिम दंगलीचे आहेत अन् या दंगलीमागे राजकीय हात आहे. मागासवर्गीय समाज आज बहुसख्येने काँग्रेसच्या मागे आहे, कारण काँग्रेसच आपला उद्धार करू शकतो असं त्यांना वाटतं.

काही मुद्द्यांवर मतैक्य !

बडोदा आणि अहमदाबादच्या आदोलनविषयक परिस्थितीतही जरा फरक आहे. इथे बडोद्यात, हरिजन वर्ग सघटित आहे पण अहमदाबादमध्ये मात्र 'पँथर्स' चा एक मोठा गट आहे. तिथे सशस्त्र मुठभेड शक्य आहे.

पुढे काही काळ पोलीस अत्याचार, वृत्तपत्रं प्रकरण, भ्रष्टाचाराच्या केसेस, त्यात गुतलेले सोळकीचे हात अशा नव्यानव्या क्षितिजावर चर्चा विस्तारत गेली. कालच्या प्रामुख्यानं 'राखीव जागा' या अनुषगाने झालेल्या महत्त्वाच्या मुलाखतीनतर आजचा दिवस हे नवे नवे इश्यू समोर घेऊन उगवला ही चर्चा चालू असताना असं जाणवलं की, नकळतच आता प्रश्नाचो एक मालिका तयार झाली आहे कोणाशी चर्चा करायचो आहे आणि त्याला किती वेळ आहे या आधारे मुख्य भर कशावर द्यायचा हे ठरत; पण एकूण मिळून हाताळण्याचा आशय डोळ्यासमोर नीट असतो.

राखीव जागाविरोधी आदोलनाबाबतची भूमिका, त्यात गुतलेले राजकारण, पोलीस, वृत्तपत्र, जनता यांच्या खास 'गाठीभेटी' या घडामोडीचा शोध घेत घेतच मग नवनिर्माण आदोलन, १९८१ चं राखीव जागाविरोधी आंदोलन याचे सदर्भ येतात. महात्मा गांधी या व्यक्तीच आणि त्रिचारांच आजच्या गुजरातमधलं स्थान समजावून घेण्याची गरजही त्यामुळेच जाणवते. मग गुजरातमधलो दलित चळवळ, आर्थिक विकास, राजकीय अस्थिरता यावरून चर्चेचा प्रवास होतो. 'राणे आयोग' हाही चर्चेतला परवलीचा शब्द. असे सर्व मुद्दे मिळून तयार होते आशयाची master list.

यातल्या काही मुद्यांवर गुजरातमध्ये मतैक्य- consensus असल्यासारखी उत्तरं येतात. नवनिर्माण आंदोलन फारसं अर्थपूर्ण नव्हतं. महात्मा गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा आणि गांधीवादी विचारांचा फार थोडा प्रभाव गुजरातमध्ये शिल्लक आहे. इथल्या दलित चळवळीला – महाराष्ट्रातल्याप्रमाणे स्वत:चा असा ethos नाही. फुले, आंबेडकरांच्या उंचीचा नेता इथे निर्माण झाला नाही, हे काही मतैक्याचे मुद्दे, मुळात राखीव जागांच्या समस्येत काही तथ्य असले तरी आत्ता त्याचा वापर केवळ राजकीय कारणांसाठी करून घेतला जात आहे यावरही बरेचसं मतैक्य असतं. राखीव जागांच्या प्रश्नावरून सुरू झालेली चर्चा या सर्व मुद्द्यांची प्रदक्षिणा घालून परत त्याच प्रश्नावर येते. राखीव जागांचं समर्थन वा विरोध : त्यातून निर्माण होणारा सामाजिक पेच. याला उत्तर काय ? किरीटभाईंचं उत्तर ऐकलं तेव्हा वाटलं की, जवळजवळ निष्कर्षात्मक मानावी अशी माडणी ऐकायला मिळाली. ते म्हणाले :

'मागासवर्गीयांच्या विकासासाठी राखीव जागा ही अत्यंत आवश्यक तरदूद आहे. सवर्णांना आपल्या समाजव्यवस्थेत आजही अनेक फायदे आहेत. त्यांचा ते उल्लेख करत नाहीत आणि मागासवर्गीयांना मिळणाऱ्या सवलतीकडे बोट दाखवतात. तेव्हा राखीव जागा अजून तरी आवश्यक आहेत. प्रश्न असा आहे की, किती काळ ? ही तरतूद कायमचीच ठेवायची का ? तर निश्चितच नाही. चाळीस वर्षांपूर्वी राखीव जागांची तरतूद निर्माण करताना जी सामाजिक–आर्थिक परिस्थिती होती ती तशीच्या तशी आज नाही, त्यात खूप बदल झालेत. हे बदल ध्यानात घेऊन राखीव जागांच्या धोरणातही काही बदल हवेत. या धोरणाचा पुनर्विचार जरूर हवा. पण पुनर्विचार म्हणजे, जागा रद्द करणे किंवा सवर्ण सुचवतील तो फेरबदल म्हणजे पुनर्विचार नव्हे. राखीव जागाच्या धोरणात काही मूलभूत बदल करायचा असेल तर त्याचो योजना मागासवर्गीयामधून पुढे यायला हवी आणि बदलाची अमलबजावणी मागासवर्गीयाच्या संमतीने, सहकार्याने व्हायला हवी. अतिमत: समाजाच्या दीर्घकालीन व्यापक हिताचा विचार करता, राखीव जागा नाहीशा होऊन गुणवत्ता हा निवडीचा निकष ठरेल असा समतापूर्ण समाज निर्माण होण हे आपलं खरं उद्दिष्ट आहे.

'या प्रश्नाचा प्रामाणिकपणे सामना करायचं ठरवलं तर मार्ग सापडेलही. पण आज आम्ही काही मनापासून, प्रामाणिकपणे करतच नाही. प्रत्येक बाबतीत राजकारणाचा विचका आहेच. नेतृत्व हा घदा झालाय ३० जानेवारी १९४८ ला एका माणसानं गाधीजीच्या शरीराला गोळघा घातल्या .पण त्यानंतर आजतागायत आपण महात्माजीचा रोजच्या रोज खून करतो आहोत. ढोंगी आणि स्वार्थी राजकोय नेतृत्वानं गाधीजीच्या पुतळघाआड आपली पोळी भाजण्याचं कामच पद्धतशीरपणे चालवलं आहे'

□

किरीटभाईंच्या घरून निघून चालत चालत दैनिक 'सदेश' च्या ऑफिसात पोहचलो सदेश हे तूर्त काँग्रेसच्या बाजूचे वृत्तपत्र. त्याचे संपादक अमोनभाई कुरेशी हे सोळंकीचे दोस्त आहेत अशी माहिती मला देण्यात आली होती. 'राखीव जागा हा इश्यूच नव्हे. मुख्यमंत्री हटाव मोहीमेसाठी ते एक निमित्त आहे इतकेच,' हे उदघाटनपर

□

एका विद्यार्थ्याला बांगडचा भरताना आंदोलक विद्यार्थिनी – बडोदे

□

वाक्य त्या माहितीशी सुसंगत वाटलं. पण पुढे बडोदा, अहमदाबाद इथं घडलेल्या दंगली, त्यामागचे हात, पोलिसी कारवाया वगैरेविषयी त्यांनी दिलेली माहिती ऐकताना मात्र सोळंकींचा दोस्त बोलतोय असं वाटलं नाही. बरं ते देत असलेली माहिती, आधीच्या काही मुलाखतीमध्ये हाती लागलेल्या तुकडयांशी संगतवार जुळत होती. बडोदा आणि अहमदाबादमधल्या परिस्थितीचे पैलू निरनिराळे होते हे काल लक्षात आलं होतं. आज त्या पैलूंवर अमीनभाई अधिक प्रकाश टाकत होते.

राखीव जागाविरोधी आंदोलनाची पहिली प्रास्ताविक फेरी मार्चमधल्या निवडणुकांपूर्वी पार पडली होती. पण ते तर फक्त नमन होतं. निवडणुका संपल्यावर आंदोलनाचा मुख्य सूर लागला. १८ मार्चच्या गुजरातबंदनं प्रांतभर आंदोलन पसरवलं. बडोदा आणि अहमदाबादमधल्या परिस्थितीत फरक पडायला इथपासून सुरुवात झाली. अहमदाबादमध्ये १८ मार्चलाच परिस्थितीनं हिंसक वळण घेतलं. उर्वरित गुजरातमधूनही – विशेषतः सुरत, मेहसारा, सॉवरकाटा इ. हिंसक घडामोडींची एखाद दुसरी बातमी येत होती.

उत्तर गुजरातेत मेहसाणा, सॉवरकाटा या भागात पटेल कम्युनिटीचं प्रभुत्व बऱ्यापैकी आहे. सॉवरकाटा भागात रतुभाई अदानी ग्रुप बऱ्यापैकी जम बसवून आहे. शहरी भाग काँग्रेसविरोधी आहेत तर जवळजवळ सर्व ग्रामीण भाग हा काँग्रेसचा हुकमी इलाका. सौराष्ट्रात–राजकोट वगैरे भागात कुणबी विरुद्ध काठी (म्हणजे पटेल रजपूत : दोन्ही कडव्या जमाती) जातीय संघर्ष आहेच. तर दक्षिण गुजरातमधल्या आदिवासी भागात प्रथमच दलित संघटित होऊ लागलेत. सध्याचे गुजरातचे गृहमंत्री अमरसिंह चौधरी त्यातलेच. त्यांच्या आशीर्वादाने मागासवर्गीयांचा 'राखीव जागावादी' गट दक्षिण गुजरातेत, सुरतमध्ये जन्माला येऊ घातला आहे. १९८१ च्या आंदोलनापेक्षा यावेळच्या परिस्थितीत दिसणारा हा फरक आहे. त्या वेळी दलितांमध्ये संघटितपणाची निशाणीही नव्हती. अजूनही ते असंघटितच आहेत. पण आत्ता निदान जराजरा ते संघटित होऊ लागलेत. तिथे थोडचा फार सवर्णविरुद्ध दलित चकमकी घडल्या. पण त्या फारच किरकोळ. सर्व मुख्य हिंसक दंगली हिंदू–मुस्लिमांमधल्या आहेत. या हिंदू-मुस्लिस दंगली कशा पेटल्या या संदर्भात बडोद्याच्या परिस्थितीचा अभ्यास 'मनोरंजक' आहे. त्याविषयी अमीनभाईंनी माहिती दिली. ते म्हणाले–

१८ मार्चपासून पुढे महिनाभर बडोद्यातली परिस्थिती शांत होती. राखीव जागाविरोधी आंदोलन चालू होतं. पण शांतपणे. विद्यार्थ्यांचे मोर्चे निघायचे. त्यांना अटक करून संध्याकाळी सोडून दिलं जायचं. आंदोलनाशी संबंधित इतर कार्यक्रम, शाळाकॉलेज बंद, घेराओ वगैरे यात कसलेही गैरप्रकार झाले नाहीत. बडोद्याचा पोलीस कमिशनर पी. के. दत्ता यांनी परिस्थिती कुशलतेनं हाताळली. तेव्हा जुना बडोदा, म्हणजे Walled City सुद्धा सर्वसामान्य स्थितीतच वावरत होतं.

दरम्यान अहमदाबादच्या परिस्थितीला हिंसक वळण लागलं होतं. म्हणण्यापेक्षा लावलं होतं म्हणायला हवं. कारण काँग्रेस पक्षांतर्गत हितशत्रूंनी सरकारला पेचात आणायचा डाव टाकला होता. प्रथम राखीव जागाविरोधी आंदोलन बदनाम करायला काँग्रेसमधील सोळंकी विरोधी गटानं हिंदू मुस्लिम संघर्ष मुद्दामच पेटवला. मुळात राखीव जागाविरोधी आंदोलनालाही त्यांची फूस होतीच. कारण त्यामुळे सोळंकी आणि अमरसिंह चौधरी अडचणीत येत होते. हे काम प्रबोध रावळ यांचं असल्याचं बोललं जातं. त्यांचे एक मित्र माजी विधानसभा सदस्य महंमद हुसेन बरेजिया यांच्या मदतीनं त्यांनी दंगल भडकवली. मागल्या निवडणुकीत महंमद हुसेन यांनाही तिकिट नाकारण्यात आलं होतं. त्यांचा मतदारसंघ अहमदाबादमधला दर्यापूर मतदारसंघ. दर्यापूर मधूनच अहमदाबादमधली हिंदू मुस्लिम दंगल भडकली. त्यातच पोलिसी अत्याचाराच्या बातम्यांनी आगीत तेल ओतले. जातीय दंगल भडकल्यावर वास्तविक राखीव जागाविरोधी आंदोलन स्थगित करण्यात आलं होतं. पण पोलिसांनी नागरिकांना अंदाधुंद बडवणं, घरात घुसणं, स्त्रिया, म्हातारे, बालकं

यानाही न सोडणं यामुळे परिस्थिती बिघडतच गेली. वृत्तपत्रांनी याविषयीच्या बातम्या उठाव देऊन छापल्या, कडक निषेध नोंदवले आणि अस्वस्थ जनमत पेटवलं. याच काळात राखीव जागावादीसुद्धा संघटित होऊ लागले होते. पण परिस्थितीतल्या हिंसकपणामुळे ते अजून दबून होते, पृष्ठभागावर येत नव्हते. केंद्र सरकारचे गृहमंत्री शंकरराव चव्हाण येऊन परिस्थितीची पहाणी करून गेले. नंतर राजीवजीसुद्धा आले. त्यांच्या भेटीचा खूपच चांगला परिणाम झाला असता. ते स्वतः दर्यापूर भागात गेले होते. सरकारी अधिकाऱ्यांच्याच डोळ्यांनी दंगल पहाण त्यांनी नाकारलं होतं. त्याकरता पार पोलीस कमिशनरपर्यंत सर्वांना आणायलाही त्यांनी कमी केलं नाही. एका ठिकाणी पोलीस कमिशनर त्यांना घाई करू लागला तेव्हा राजीवजीनी त्यांना सांगितल, 'तुम्हाला घाई असेल तर विमानतळावर चालू लागा.' प्रत्यक्ष लोकांमधे जाऊन त्यांनी विचारविनिमय केला होता की, या परिस्थितीवर काम करायला हवे आधी त्याना कोणी तरी विचारलं होतं की, तुम्ही दोष कुणाला द्याल, तेव्हा राजीवजीनी समतोल उत्तर दिल होत की, इतक्या थोड्यावेळाच्या पहाणी दौऱ्यानंतर काही सागण कठीण आहे. शांतता प्रस्थापित करणं एवढाच माझ्या येण्याचा उद्देश आहे. आधी राजीवजीची इथली इमेज खूप चागली होती. लोकसभा आणि विद्यानसभा निवडणुकीतही लोकानी सोळंकीकडे बघून नव्हे तर राजीवजीकडे पाहून हाताला मत दिल होते. राखीव जागांच्या धोरणाचा पुनर्विचार करायला त्यांची तात्त्विक अनुकूलता आहे हे माहीत असल्यामुळे आंदोलक अन् त्याचे सहानुभूत मुख्यतः मध्यमवर्गीय याना राजीवजीकडून विशेष अपेक्षा होत्या. त्याच्या भेटीचा उपयोग झालाही असता. पण अचानक पत्रकार परिषदेत सोळंकीच्या सांगण्यानुसार राजीवजीनी जाहीर केलं– 'दगलीमागे निवडणुकीत हरलेल्या विरोधी पक्षांचा हात आहे.' असं उथळ स्टेटमेंट राजीवजीकडून अपेक्षित नव्हतं. लोकांचा अपेक्षाभंग झाला, आशेच्या उच कड्यावरून एकदम फेकून दिल्यासारखं झालं. परिस्थिती सुधारायला त्याच्या भेटीचा जो काही उपयोग झाला होता, झाला असता तो शून्यावर येऊन ठेपला.

दंगलीचा हिशोब !

तरी इथपर्यंत बडोदा शात होतं पण आता जरा जरा तंग बनलं होतं. अहमदाबादमधल्या हिंदू-मुस्लिम दंगली एप्रिलच्या मध्याला थंडावल्या तेव्हा राखीव जागाविरोधी आदोलन परत सुरू झाल. त्यावर पोलीस निर्दयपणे तुटून पडले. पोलिसी अत्याचाराचा निषेध करायला १९ एप्रिलला बडोद्यात एक रॅली काढायचं ठरलं. त्याचं नेतृत्व जसपालसिंगकडे होतं. ही रॅली मांडवीपासून सुरू होऊन महात्मा गांधी रस्त्यानं, वाटेत मुसलमान इलाक्यातून जाणार होती. कमिशनर दत्ता जरा काळजीत पडले. त्यानी मोठा पोलीस फोर्स बोलवून तैनात केला. इथल्याच मिलिटरी इजिनियरिंगमधल्या प्रशिक्षणार्थींचा एक सशस्त्र सर मार्च बडोद्यातून फिरवला. त्यामुळे लोक दबायच्या ऐवजी वातावरण जास्तच तग बनलं. रॅली निघाली पण व्हायचा तो गोंधळ झालाच. लाठीमार, गोळीबार झाला. त्यात काही निरपराध नागरीक मारले गेले. बडोदा अहमदाबादच्या रागेत येऊन बसलं.

गावातल टेन्शन लक्षात घेऊन दत्तांनी काही गुंड, दारू–जुगाराचे अड्डेवाले इत्यादीना राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली बंद करायचं ठरवलं. त्यात दोन मोठ्या टोळ्यांचे म्होरके होते. त्यातल्या एकाचे पालक माधवसिंग सोळंकी तर दुसरा गट सनत मेहता पुरस्कृत. मुद्याची बात ही की, पहिला हिंदु आहे, दुसरा मुसलमान. याचे अड्डे समोरासमोर आहेत. त्यामुळे तिथे सततच किरकोळ मारामाऱ्या चालू असतात. कशी कुणास ठाऊक पण ही अटकेची ऑर्डर लीक झाली आणि दोनातला हा मुसलमान टोळ्यांचा म्होरक्या भूमिगत झाला. हिंदु गुड आणि त्याचा साथीदार याना मात्र पोलिसानी पकडले. तेव्हा मुसलमान गुंडांनी विचार केला की, आपले मागचे सर्व हिशेब करायला हीच नामी सधी आहे त्या रात्री त्यानी सोडावॉटरच्या बाटल्या, चेन्स, चाकुसुरे लाठ्यांसहित विरोधी अड्डयावर हल्ला चढवला. हिंदु–मुस्लिम दंगल बडोद्यात भडकल्याची ही अशी स्टोरी.

'हे अस चालयचंच, गुजरातमध्ये हे असच चालत आलं आहे. आमच्याकडे नवं नेतृत्व याच प्रक्रियेतून उदयाला येण्याचो पद्धत आहे.' नेमक्या वक्रोक्तीपूर्ण सुरात डॉ. नेनेंनो पुढे गप्पा मारता मारता सागितलं. 'दंगलीच्या काळात अनेक गरीब कुटुंब दुकानं लुटून घरं भरतात. दुकानदारांचंही काही फारसं बिघडत नाही. त्यानी मालाचा विमा उतरवलेला असतो. शाळा–कॉलेजेस बद पडतात; पण म्हणून काय झालं ? सर्वच्या सर्वजणाना वरच्या वर्गात बढती मिळते. दादा लोकांना जुने हिशोब फेडून नवे फ्रेश हिशोब माडायची सधी मिळते. तोटा कोणाचाच होत नाही. समाजालाही जरा धक्के सोसायची सवय होऊन तो टणक बनतो !'

मी विचारलं, 'मृगेश जयकृष्ण केसविषयी हेच म्हणाल का.. असंच चालायचं वगैरे ?' 'ऑफ कोर्स, मृगेश जयकृष्ण केस हा भ्रष्टाचाराच्या हिमनगाचा फक्त वरचा छोटासा दर्शनी भाग आहे,'

अमीनभाईंनी मृगेश–जयकृष्ण भानगडीविषयी थोडी माहिती दिली होती. हा एक बडा उद्योगपती. तो, सोळंकी, आणि 'गुजरात समाचार'चे मालक–संपादक श्री. शहा हे एकमेकांचे दोस्त; पण अहमदाबादच्या जवळ एक स्टेडियम बाधण्याच्या प्रकरणावरून मृगेश आणि शहा यांचं फाटलं म्हणे. त्यातच सौ शहाना हवी असलेली एक पोस्ट सौ. मृगेशना मिळाली, तेव्हा तर सबध तुटले आणि 'गुजरात समाचार'नं मृगेश–विरोधी मोहीम सुरू केली बेकायदा परकी चलन भारताबाहेर नेण्याच्या प्रयत्नात मृगेश अडकण्याची घटना मार्चमध्ये घडली. तो पैसा सोळकोचा होता अशी लाईन गुजरात समाचारनं पकडली. शिवाय दिल्लीत गाजलेल्या गुप्तहेर प्रकरणातली फर्म 'योगेश माणेकलाल' ही मृगेश जयकृष्णशी संबधित असल्याचं या वृत्तपत्रानं उघडकीस आणल. आरक्षण विरोधी आंदोलन सुरू होऊन त्यातही 'गुजरात समाचार'नं सोळकीना चागलच धारेवर धरलं होतं. पोलिसाच्या दमनशाहीविरुद्ध मन पेटवल होतं. या सगळ्याची गोळाबेरीज होऊन 'बाविस एप्रिल'चा हलकल्लोळ घडला.

मृगेश जयकृष्ण, सोळंकी आणि गुजरात समाचारचे श्री. शहा एकमेकांचे दोस्त !

हे ऐकत असताना मनात नोदवून ठेवलं की, अहमदाबादमध्ये याबाबतचा तपशील मिळवून 'स्टोरी' तयार करायला हवी. तर डॉ. नेने म्हणतात, 'अशा कितीतरी स्टोरी देतो मी तुम्हाला. पद्धतशीर दंगली कशा पेटवल्या जातात, सत्ताधीशाना बाया कशा पुरवल्या जातात, पैसे देऊन धंदेवाईक गुंडाकडून हव्या त्या हिंसक कारवाया-खून कसे घडवून आणले जातात. It is money that counts. तुम्हाला ती श्रावणबाळाची गोष्ट माहितीय किनई? आईवडिलाची कावड घेऊन चालता चालता श्रावणबाळ मधेच कावड टाकून म्हणतो की, मी आता तुम्हाला वाहून थकलो, आता माझ्याच्यानं होणार नाही, मी इथेच धंदा टाकतो आणि स्थायिक होतो. आईवडील समजूतदार असतात. ते म्हणतात बेटा थोडा चार मल पुढे चल, आम्हाला माहितीय तू नुसतंच साबरमतीचं पाणी प्यायलायस, ते उतरू दे, जरा हवा बदलू दे! मी तुम्हाला गॅरेंटी देऊन सागतो, CM च्या पट्टेवाल्याला तुम्ही एक हिरवी नोट द्या, पहा दुसऱ्या दिवशीच्या CM च्या भेटीच्या यादीत तुमच नाव पाहिल असतं की नाही. आहो, इथपासून तिथपर्यंत वरपासून खालपर्यंत हेच भरून राह्यलंय. कधीतरी एखादी मृगेश केस उघडकीस येते, तेवढ्यापुरती खळबळ माजते. परत सगळं शांत.'

दंगलीचे संदर्भ

'त्यामुळे एवढे राजीवजी, मिस्टर क्लिन म्हणून अजून तरी ओळखले जातात त्यांना सुद्धा सोळंकीबाबत जरा सबुरीनं घ्यावं लागतंय.' अमीनभाईंनी दिलेला शेवटचा मुद्दा. 'लोकसभा निवडणुकीत सोळंकीनी काँग्रेसला मिळवून दिलेल्या यशाबद्दल विधानसभा निवडणूक मुक्त हस्ते त्यांच्यावर सोपवण्यात आली होती. सोळंकीनी आपले स्पर्धक खडयासारखे बाजूला सारले आणि एकूण ६० टक्के तिकिटं 'खत्री' जातीच्या लोकाना दिली. त्यामुळे विधानसभेतल्या काँग्रेस पार्टीत आज अनुभवी, कार्यक्षम सदस्यांची उणीव आहे. मन्त्रिमण्डळाचा स्तरही उतरला आहे; पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे गुजरातमधली काँग्रेसची सत्ता चालू ठेवायची तर सोळंकीची उचलबागडी करता येणार नाही.'

'पण काही काँग्रेसी आमदारच आम्हाला सागतात की आता हा गेला तर बर,' इति डॉ. नेने. त्यामुळे राष्ट्रपती राजवट लागू होणं शक्य आहे यावर अमीनभाई आणि नेने यांचं एकमत. म्हणजे आजचा फोकस जरा 'राखीव जागा प्रश्ना'वरून सरकून राजकारण पोलीस, वृत्तपत्रे, दगली यावर येऊ पहात होता; पण या गोष्टी फोकस करायला बडोद्यापेक्षा अहमदाबाद-राजधानीच शहर जास्त योग्य आहे. दिवस मावळून गेला तरी बडोद्यातली हरदासाची कथा 'राखीव जागा' प्रश्नाच्या मूळ कथेवर परत आली.

आज रोटरी क्लबची 'विकली मीटिंग अँड डिनर प्रोग्रॅम' होता. डॉ. नेने-पालक-रोटरी क्लबचे प्रेसिडेंट ते मला तिथे बरोबर घेऊन गेले. इथे सगळे वकील, डॉक्टर्स, पत्रकार, प्राध्यापक, मोठे व्यापारी उद्योगपती, बडोद्याच सगळं 'एलीट' हजर होतं. बडोद्याच्या गर्दीपासून दूर, पोलो ग्राऊंडच्या पॉश 'कॉर्नर' वर ही सभा होती. मुलायम हिरवळ, थंड हवा, स्वच्छ प्रकाश, शेजारी एक गार्डन रेस्टॉरंट, त्याच्या शेजारी पोहण्याचा तलाव. सर्व काही गुजरातमध्ये सध्या काय चाललय हे पार विसरायला लावेल असं होत; पण विसरता मात्र येत नव्हतं. कारण लोक. प्रत्येकाच्या बोलण्यात हाच एक विषय. गुजरातच्या सद्यस्थितीचे विविध पैलू. त्याचे उद्योग-व्यवसायावर झालेले परिणाम. पालक संघ आणि प्राचार्य संघ यासारख्या जबाबदार संस्थानीसुद्धा 'बंद'च्या प्रकारात सहभागी व्हावं याचं एका पालक-डॉक्टरना सखेद आश्चय वाटत होतं. 'यामुळे मुलांचं एक वर्ष वाया जाणार' याची काळजी त्यांना वाटत होती. तर दुसरा एक पत्रकार सांगत होता की, पेपरामधून येणाऱ्या बातम्या एकतर्फी आहेत. त्या फक्त राखीव जागाविरोधी आंदोलनाची बाजू उचलून धरतात, पोलीस अत्याचाराच्या बातम्या बढाचढाके देतात. म्हणजे पोलीस नग्न होऊन स्त्रियांसमोर अश्लील हावभाव करत नाचले, हे खरं नाही. खरं उलट लोकांनी आधी खूप खोडसाळपणा केला हे कोणी सागत नाही. लोकानी, जमावाने अनेकदा पोलिसावर हल्ले केलेत, दगडाचा वर्षाव-त्याला पथराव असा मस्त शब्द आहे,-"पथराव केला. पेट्रोल, बाँबज्, गावठी मिसाईल्स, खिळे लावलेले सिमेंटचे बॉल्स् वगैरेचा शिस्तीत वापर केला आहे. अन् सर्वांत गंमत म्हणजे हे सर्व करून पोलीस चाल करून आले की हा जमाव पहात पहाता आजूबाजूच्या 'पोळा' मध्ये (गल्ल्या) पसर व्हायचा आणि पोळाच्या तोंडाशी स्त्रिया येऊन उभ्या रहायच्या. तुम्ही सांगा काय करावं पोलिसानी! वगैरे.

हे सगळं ऐकताना जाणवल की, अत्यंत योग्य वेळी आपण इथे पोचलो आहोत. अजून लष्करी, निमलष्करी फौजा तर तैनात आहेत. पण दिवस काळातली संचारबंदी उठवली आहे. त्यामुळे हालचालीवर प्रतिबध नाही; पण वातावरणात ताण आहे. नुकत्याच घडून गेलेल्या घटनाच्या स्मृती, जखमा अजून ताज्या आहेत. त्याचं 'फॉसिल' तयार झालं नाहीये. त्यामुळे लोक भराभर उफाळून बोलतात. जीभ बद ठेवावी एवढा ताण आता शिल्लक नाही आणि सगळं विसरून जावं एवढं अजून जुनं झालं नाहीये. आंदोलन, दंगली, पोलीस, सरकार या सर्वांचे सदर्भ अजून ताजे आहेत अन् सर्वात महत्त्वाचं म्हणजे घडामोडीना कधीही पूर्ववत वळण लागू शकेल, दंगली उसळू शकतील किंवा दंगलीमुळे स्थगित केलेलं आंदोलन परत भडकू शकेल आजच रोस्टर पद्धतीच्या निषेधार्थ गांधीनगरमधले सरकारी कर्मचारी संपावर गेले होते. त्यामुळे गांधीनगरमधलं कामकाज थंडावल्याची कबुली सरकारनेही दिली आहे. या कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी बेमुदत सप करण्याचा इशारा दिला आहे. काल सोळंकीनी अहमदाबादजवळ साबरमती नदीवर बांधलेल्या 'इदिरा गाधी' पुलाचं उद्घाटन केलं. तो समारंभ कसाबसा पार पडू शकला. राखीव जागाविरोधी आदोलनाच्या भट्टीत लोखड तापलंय तोवरच 'रोस्टर पद्धत रद्द करा'चा घाव घालून घेण्याचं टायमिंग साधण्याचा सरकारी कर्मचाऱ्याचा रागरग दिसतो आहे. 'असं झाल तर सरकारला जड जाणार आहे. राखीव जागाच्या धोरणाचा सरकारला पुनर्विचार करावाच लागेल' अस डॉ. चद्रकांत सुरा सागत होते.

डॉ. चद्रकांत सुरा. वाली मंडल (पालक सघ) बडोदा शाखेचे अध्यक्ष. अर्थातच राखीव जागा विरोधाचे पुरस्कर्ते. ही आजची आणि बडोद्यातली शेवटची मुलाखत. 'वाली मडल' ही संस्था प्रथम स्वयसेवी स्तरावर सुरू झाली. आपणहून काही शाळांनी वाली मंडलच्या शाखा सुरू केल्या. शैक्षणिक विकासासाठी पालक आणि

शाळांमधील सहयोग अधिक चांगला घडवून आणणे हा वाली मंडलच्या स्थापनेचा हेतू १९७७ मध्ये–म्हणजे जनता पक्षाच्या कारकिर्दीत सरकारने कायदा करून सर्व शाळामध्ये या पालक संघटनेची शाखा अमावी असं ठरवलं. वाली मडलने आतापर्यंत, प्रवेश देताना देणगी घेणे, क्लासच्या रूपात समातर शाळा काढणे या प्रकाराना विरोध करण्याबाबत काही काम केले आहे मोठ्या प्रमाणावर आदोलन उभे करण्याची ही पहिलीच वेळ अशा या वाली मंडलचे डॉ. सुरा हे महत्त्वाचे प्रवक्ते. ते स्वत: व्यवसायाने डॉक्टर आहेत त्याच्या तोंडून प्रथमच राखीव जागा विरोधाची अधिकृत सैद्धातिक भूमिका ऐकायला मिळाली नाही तरी या आधी बहुतेक पेपरमधूनच सर्व वाचली होती. सर्वसाधारणपणे वृत्तपत्रांनी राखीव जागा विरोधी आदोलन इतक उचलून धरलं आहे की, त्या मागच्या भूमिकेचं समर्थन वृत्तपत्रात बरच तपशीलवार वाचायला मिळतं म्हणून मुलाखतीच्या सुरुवातीला मी त्याना म्हटलं की, तुमच्या भूमिकेचा गोषवारा मीच सागतो, मलाही तो एक चागला एक्सरसाईज होईल. नतर त्यात काही बेरीज वजाबाकी करायची असल्यास तुम्ही सागा. चक्क डाव्या हाताची बोटं मोजत सागितल–

परस्परविरोधी विचार

कारण एक : राखीव जागा आतासुद्धा भरत नाहीत मग टक्केवारी वाढवायच कारणच काय ? दोन : कारण हेच की मागासवर्गीय मताची वोट बँक नेहमी आपल्या मागेच रहावी एवढाच सरकारचा हेतू आहे, दलितांचा विकास वगैरे थापा आहेत. तीन : मेरिटोक्रसीचं प्रतिपादन. राखीव जागा पद्धतीमुळे गुणवत्ता मार खाते, एकूण शैक्षणिक आणि प्रशासकीय कार्यक्षमतेचा स्तर घसरतो चार: राखीव जागाच्या पद्धतीमुळे जातीच्या भिंती पक्क्या होतात त्यामुळे जातीय तेढ निर्माण होते आणि पाच : यामुळे आपला देश वर्गयुद्धाच्या दिशेनं वाटचाल करू लागला आहे. वेळी राखीव जागाना आवर घातला नाही तर राष्ट्रीय एकता धोक्यात आहे.

डॉ. सुरा म्हणाले : अगदी बरोबर या आधारावर आता पुढच्या शका प्रस्तुत करण्यापूर्वी म्हटलं जरा ते काय सागतात ते ऐकू. डॉक्टर सागू लागले : राखीव जागांची सवलत खरं तर मर्यादित काळासाठी–दहा वर्षांसाठी होती. आता 'ते' म्हणतात ही कायमच हवी आणि टक्केवारीही वाढवून हवी असं कसं चालेल ? मग आमच्या मुलानी काय करावं ? मागासवर्गीय विद्यार्थी ५० टक्के मिळवून मेडिकलला प्रवेश मिळवू शकतो आणि माझा मुलगा मात्र ८५ टक्के मिळवूनही बाजूला फेकला जातो का ? तर हा सवर्ण आहे, तो हरिजन म्हणून. म्हणजे हा जातीभेदच झाला की ! यानं कशी समता येणार ? घटनेनुसार तर 'जात, वश, लिंग, धर्म' या आधारावर भेद केले जाणार नाहीत असं आश्वासन आहे म्हणजे राखीव जागाची तरतूद घटना विरोधी ठरते' असं त्यानी वरील पाच कलमाच विस्तृत प्रतिपादन केल.

ते ऐकताना 'राखीव जागा विरोधक' विरुद्ध 'राखीव जागावादी' असं सैद्धातिक ध्रुवीकरण डोळ्यासमोर स्पष्ट झालं गंमत वाटली, की उपलब्ध टक्के भरत नाहीत आणि राखीव जागाच्या इश्युचा फक्त राजकीय वापर केला जातो. यावर दोन्हीकडे एकमत आहे. इथपासून पुढे मात्र दक्षिणोत्तर वाटचाल सुरू होते. राखीव जागाच्या विरोधाला किंवा समर्थनाला दोघेही राज्यघटना आधाराला घेतात· एकाच्या मते राखीव जागा घटनाविरोधी, दुसऱ्याच्या मते त्या घटनेनुसारच देऊ केल्यात एकाच्या मते राखीव जागामुळे जाती पक्क्या होतात, दुसऱ्याच्या मते त्या ढिल्या होतात. एक गट म्हणतो या धोरणाचा पुनर्विचार आवश्यक आहे, दुसऱ्याच्या दृष्टीने पुनर्विचार अजिबात आवश्यक नाही. पहिल्या गटातले म्हणतात, 'राखीव जागांच्या धोरणाचा पुनर्विचार झाला नाही तर जातीय संघर्ष अटळ आहे, दुसऱ्या गटातले हत्यार उपसतात की, पुनर्विचार झाला तर जातीय सघर्ष अटळ आहे हे म्हणतात, आहे हे चालू राहिल्यास देशाची एकता धोक्यात आहे. ते म्हणतात आहे हे चालू न राहिल्यास देशाची एकता धोक्यात आहे. वैचारिकदृष्ट्या दोन परस्पर विरुद्ध टोकाच्या या भूमिका आहेत मागल्या चाळीस वर्षांच्या सामाजिक अनुभवामधून या भूमिका तयार झाल्या आहेत. आता या भूमिकामधून आकार घेणाऱ्या चळवळींमधून या पुढची सामाजिक स्थिती जन्माला येणार आहे. वैचारिक भूमिकांचा विचार करता त्यात जातीय संघर्ष लपलेला दिसतो.

आताच काही मोर्चेबदी सुरू झालेली दिसते. संघटित 'राखीव जागावादी' गट गुजरातमधे उदयाला येऊ लागला आहे त्यांच्या विरोधकाशी किरकोळ चकमकी झाल्याच्या बातम्या काही नवीन नाहीत गुजरातबाहेरही विविध सघटनांनी आपापल्या वैचारिक भूमिकानुसार रेषा आखून घेतल्यात. रिपब्लिकन पक्ष इशारा देतोय की, महाराष्ट्रात राखीव जागांना विरोध झाल्यास लढा उभारावा लागेल. तर मराठा महासंघाचे अध्यक्ष श्री. शशिकात पवार राखीव जागाविरोधाच्या मुद्यावर एक अखिल भारतीय सूत्रचालन समिती तयार करण्याच्या प्रयत्नात दिसतात. मराठा महासघाने परवा मुंबईत काढलेल्या 'मोर्चा' विषयी इकडे बरोच उत्सुकता आहे दोन्ही 'बाजू' त्याची चौकशी करतात. खरं तर कर्नाटकात राखीव जागाचं प्रमाण ६०% तर तामिळनाडूमध्ये जवळजवळ ७८% आहे. तिथे निषेधपर आदोलन नाही. पण गुजरातमधल्या ३१ किंवा ४९ टक्क्याचा विरोध करायला केवढं प्रखर आदोलन उभं रहातं. अशात अजून तिथे सरळ सरळ हरिजनाच्या कत्तली होतात अशा 'मध्यगुणीन' प्रातामध्ये ही चळवळ पसरली तर ? म्हणून डॉ सुराच्या या शब्दानी समाधान होत नव्हत की, आमचं हे आदोलन हरिजनांच्या विरुद्ध नाही हरिजनाना आम्ही आपले मानतो. ते आमच्या घरी येतात, बरोबर जेवतात. इकडे आंतरजातीय विवाहाच प्रमाणही वाढत आहे त्याचं आम्ही स्वागत करतो. आम्ही विषमतेचे पुरस्कर्ते नाही हरिजन समाज शैक्षणिक, आर्थिक, सामाजिकदृष्ट्या आमच्या बरोबरचे व्हावेत असंच आम्हाला वाटतं. पण एक प्रकारचा अन्याय दूर करायला दुसऱ्या प्रकारचा अन्याय रूजवणं हा उपाय नव्हे आज राखीव जागा हा असा अन्याय आहे.'

वैचारिकदृष्ट्या दोन परस्परविरुद्ध टोकाच्या भूमिका तयार झाल्या आहेत....

एक तर्कशुद्ध भूमिका म्हणून डॉ. सुराच्या नजरेतून हे सर्व बरोबर असेलही. मी विचार करत होतो की, या प्रकारच्या आंदोलनांमधून कशा प्रकारचं सामाजिक अभिसरण गतिमान होत असेल? कमी टक्क्यांवर इंजिनियरिंग, मेडिकलला प्रवेश मिळविलेल्या मागासवर्गीयांविषयी इतर विद्यार्थ्यांच्या मनात आताच दुरावा असतो. नोकऱ्यांमधे मागासवर्ग याचा उल्लेख सरकारी ब्राह्मण असा झालेला ऐकायला मिळतो. 'पानी लोनी' वाले ऑफिसर्स असा तुच्छ उच्चारही होत असतो. आता जेव्हा सवर्ण विद्यार्थ्यांचे मोर्चे राखीव जागांचा धिक्कार करतात तेव्हा त्याच कालेजात त्या विद्यार्थ्यांबरोबर शिकणारा मागास वर्गीय विद्यार्थी काय विचार करीत असेल? त्याला वाटत असणार ही लढाई आपल्या विरुद्ध छेडली जातेय, आपल्या इथल्या अस्तित्वाला त्याचा आक्षेप आहे. यानंतर या विद्यार्थ्यांमधे परस्परांबद्दल मैत्री राहू शकेल का? म्हणून मी डॉक्टरांना विचारलं–

डॉक्टर, सामाजिक विषमता दूर व्हावी याला कोणाचाच आक्षेप नाही. निदान उघडपणे विषमतेचं समर्थन करावं अशी सामाजिक स्थिती आता राहिलेली नाही. म्हणजे समता हे साध्य राखीव जागा हे साधन. तुमचा आक्षेप साध्याला नाही साधनाला आहे. मग तेच साध्य प्राप्त करायला काही पर्यायी साधन तुम्ही सुचवू शकता का?

शैक्षणिक गुणवत्ता मिळवायला हरिजनांना खूप सवलती द्याव्यात. पंचवार्षिक योजनेतले कोटयवधी रुपये त्यांच्यासाठी घरबांधणी, अभ्यासिकांची सोय, वसतीगृह, शिकवण्या, मोफत पुस्तक, शैक्षणिक साधन यावर ओतले जावेत; पण गुणवत्तेवर तडजोड नसावी. घटना वयं वर्षे चौदापर्यंत सक्तीचं शिक्षण अमलात आणण्याविषयी बोलते. ते कलम अमलात आणलं जावं. शिक्षणप्रसार होईल तशी विषमतेची पकड सैल होत जाईल. राखीव जागांची तरतूद चालू ठेवायलाही हरकत नाही. पण ही सवलत एकाच पिढीला मिळावी. ज्या पित्यानं राखीव जागांची सवलत वापरली आहे त्याच्या मुलाला ती सवलत मिळू नये, तो समाजात इतर मुलांच्या बरोबरीनं मोजला जावा. वाटल्यास दोन पिढ्या ही चालतील पण कुटेतरी सीमारेषा ठरवली जावी. यामुळे आत्ता राखीव जागांचा गैरवापर होतो तोही थांबवता येईल या सवलतीचे फायदे मागासवर्गीयांपैकी वरच्या २–५ टक्क्यांपर्यंत पोचतात, ते समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत नेता येतील. या पद्धतीनं टप्प्याटप्प्यानं राखीव जागांची टक्केवारी कमी करत न्यावी. सुमारे एका पिढी अखेर समाज केवळ गुणवत्तेच्या निकषावर मोजता येईल राजीवजींनी येत्या ऑगस्ट सप्टेंबरमधे नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर करण्याचं आश्वासन दिलं आहे. त्यात या सर्वांचा विचार होईल अशी आम्हाला आशा आहे.

डॉक्टर सुरांनी दिलेले हे उत्तर घेऊन घरी परतलो.

चार मे एकोणिसशे पंच्याऐंशी
मुक्काम अहमदाबाद

अहमदाबादला निघालो तस सहजच आठवलं की, या शहराचं मूळ नाव कर्णावती. तेराव्या शतकात वाघेला नावाच्या राजपूत वंशातल्या कर्ण नावाच्या राजानं वसवलेली नगरी. तेराव्याच शतकात गुजरातमधे भयकर दुष्काळ पडला होता, तेव्हा द्वारकेच्या यात्रेला मोठ्या सख्येन आलेल्या जाट लोकाना तिथल्या चालुक्य नावाच्या राजानं हात जोडून विनती केली की, इथेच रहा आणि दुष्काळ दूर करायला मला मदत करा, मी तुम्हाला मोठी शेतं देतो, ती तुमच्या कष्टान पिकवा आणि समृद्धी निर्माण करा. तेराव्या शतकात स्थलांतर करून गुजरातमधे आलेले हे जाट म्हणजेच पटेल. अशी एक कथा आहे. ही ऐतिहासिक मिथ्यकथा आहे. तिला पुराव्याचा आधार नाही. पण मिथ्यकथामध्ये अनेकदा तत्कालीन इतिहासातील मुख्य प्रवाहाचं दर्शन होत. पटेल समाजाची मनोवृत्ती जमिनदारी पहाता या कथेत काही तथ्यांश असणं शक्य आहे. त्या राजाच्या अपेक्षेप्रमाणे जाटांनी पटेल बनून राज्याच्या समृद्धीला हातभार लावला तो आजतागायत. महत्त्वाचा लक्षणीय मुद्दा असा आहे की, राज्यातला दुष्काळ दूर करायला दुरून आलेल्या यात्रेकरूंपुढे ज्या राजाला हात जोडावे लागले त्या राज्याचा स्तर किती खालवलेला असणार! अस राज्य शत्रूच्या भक्ष्यस्थानी न पडलं तरच नवल.

अल्लाउद्दीन खिलजीनं गुजरात लुटलं तेव्हाही असलेल्या राजाचं नाव कर्णच होतं. त्याची पत्नी देवलदेवी. तिच्याभोवती कितीतरी रम्यकथा गुंफलेल्या आहेत. दिल्ली आक्रमकाच्या ताब्यात पडण्यापूर्वीच्या पृथ्वीराज–संयोगिताच्या कथाप्रमाणे. पौरुष संपन्नता हरवून शत्रूच्या हाती पडणाऱ्या समाजाला नेहमी शृंगारातच पौरुष सापडतं काय? दुसरी अशीही एक कथा आहे की, गुजरातच्या या मोहिमेत अल्लाउद्दिनने दोन अस्पृश्यांना पकडून गुलाम केलं आणि पुढे आपले विश्वासू सरदार केले. त्यानी मुस्लिम धर्म स्वीकारला. त्यातलाच एक अल्लाउद्दीन खिलजीचा उजवा हात, मलिक कफूर. मी विचार करत होतो की पूर्वाश्रमी तो अस्पृश्य असण्याचा आणि उत्तरायुष्यात इस्लाम स्वीकारून हिंदू राज्याचा त्यानं धडाधड सफाया करण्याचा काही परस्पर सबंध असेल का? नाही तरी बहुसंख्य भारतीय मुसलमान इथलेच रहाणारे आहेत. आज भारतात असलेल्या मुसलमानांपैकी फार थोडे जण खैबरपलिकडून आलेल्यापैकी आहेत. बाकीचे सर्वजण काही शतकापूर्वी केव्हा तरी हिंदू असणार. मग धर्मांतरित सर्वच मुसलमान हे केवळ सक्ती, छळ अथवा प्रलोभनामुळे बाटले की काहीजण अस्पृश्यतेला वैतागून इस्लामच्या आश्रयाला गेले?

पुढे दिल्ली सलतनत दुबळी पडत गेली तसं गुजरातमध्ये एक प्रांतिक मुस्लिम राज्य उदयाला आल. त्यातील एक पराक्रमी आणि अत्याचारी राजा अहमदशहा पहिला (१४११–१४४३) याने 'सणीवती' नगरी साफ केली आणि तिथे नव शहर वसवलं त्याचं नाव अहमदाबाद. हा सगळा ऐतिहासिक सदर्भ वर्तमानाशी संबधित वाटला म्हणून आपोआपच आठवला

समोर अहमदाबाद उभं ठाकलं पहिल्या काही मिनिटातच जाणवलं की, जनजीवन सुरळीत होऊ लागलय. A city limping back to normlcy– धडपडत, ठेचकाळत पूर्ववत होऊ लागलेलं जनजीवन म्हणजे अहमदाबाद शहर. काही दुकान उघडी, काही बंद, एस. टी. वाहतूक चालू पण प्रवाशाचा अभाव दिसत होता. रिक्शा रस्त्यावरनं धावत होत्या; पण मेनरोड सोडून गल्ल्यामध्ये शिरायला तयार नव्हत्या. काळूपूर, दर्यापूर या भागात तर मेनरोडलासुद्धा यायला

तयार नव्हत्या. पोटापाण्याचा धंदा म्हणून रिक्शा पळवण भाग होतं पण प्रवाशाना सोडायला म्हणून गेलेल्या रिक्शावाल्यालाच भोसक-ण्याके इतके प्रकार घडले होते की, रिक्शावाल्यानी धास्ती घेतली. शहरातली बस सेवाही चालू होती पण त्याची काही निश्चिती नव्हती. या सर्व दृश्यांमध्ये मधून रस्त्यावरून सावकाशपणे सरकत जाणारा लष्करी ट्रक दिसायचा. ट्रकच्यामागे मशीनगन लावलेली. मशीन-गनच्यामागे चार जवान भावनाविहीन चेहऱ्यानं उभे. अहमदाबाद शहर लष्कराच्या ताब्यात दिलेलं होतं.

मे. ज. रणजितसिंग दयाळ

हात फ्रॅक्चर झाला तर प्लॅस्टर घालण्यापूर्वी प्रथमोपचार म्हणून दोन्ही बाजूना लाकडी फळ्या लावून पट्टीन त्या बांधून टाकतात. असलेल फ्रॅक्चर वाढू नये, साध्याचं काम्पाऊंड फ्रॅक्चरमध्ये रूपांतर होऊ नये म्हणून ही व्यवस्था असते. तसं फ्रॅक्चर झालेलं अहमदाबाद आणखी लुटू नये म्हणून लष्कराच्या फळ्यांमध्ये बांधून घातलं होतं. लष्कराच्या ताब्यात दिलेलं शहर सर्वांत प्रथम पहायला मिळालं होतं पाच वर्षांपूर्वी, इंफाळ. त्यावेळी त्या गाड्या, जवान, शहरातलं जबर-दस्त टेन्शन या सर्वांच फार थ्रिल वाटलं होत. पण तेव्हाही मनात हा प्रश्न उभा राहिला होता की, आपल लष्कर आपल्याच देशात वापरावं लागण यात काही तरी पराभव आहे. या बदुका सीमेपलि-कडच्या शत्रूंवर रोखलेल्या हव्यात, त्याची भीती त्या शत्रूला हवी. इथे त्या सीमेअलिकडच्याच शत्रूंवर रोखलेल्या आहेत, त्यांची त्या शत्रूला भीती तरी आहे की नाही कोणास ठाऊक. कारण हा शत्रू बिनचेहऱ्याचा आहे, आपल्याच घराघरात आहे पुढे पाच वर्षांत देशांतर्गत लष्कराचा वापर वाढतच गेलेला दिसला. काश्मिरमध्ये, मुंबईत पोलिसाच बंड झालं तेव्हा, भिवंडीच्या दंगलीनंतर ब्ल्यू स्टार ऑपरेशनसाठी पंजाबमध्ये आणि अखेर सर्वांत शेवटी इंदीराजींच्या हत्येनंतर साक्षात दिल्लीतच. तेव्हा तर फ्रॅक्चरच काय छातीच्या फासळ्या तुटून लोबतायत असच वाटलं होतं. पाच वर्षांत आपल्याच लष्कराचा सीमेपासून आपल्याच राजधानीपर्यंत झालेला प्रवास हादरवून टाकणारा वाटला. हाडं सारखी सारखी मोडतात तेव्हा फळ्या तरी किती बांधून घालणार ! हाडातलं कॅल्शियमच रक्त शोषून घेत असलं तर हाड ठिसूळ व्हायचीच. प्रशासन भ्रष्ट, पोलीस अकार्यक्षम, गुन्हेगार सर्वदित आणि 'वर' पर्यंत हात पोचलेले. नागरी–गडबड नागरी प्रशासनाला आवरता यायला हवी. ती येत नाही याचा अर्थ ?

लष्कराचा देशांतर्गत वापर करण्याचही एक अलिखित तंत्र आहे. मुंबईत किंवा ईशान्येत शिखांच्या कत्त्या पाठवायच्या. पंजाबमध्ये दक्षिण भारतीय सैनिक तैनात करायचे काश्मिरमध्ये बिहारी भैय्याची फौज दबाव ठेवून असले तर गुजरातमध्ये ईशान्येकडे सैनिक प्रशासन-नाला कुबडी लावायला पाठवायचे. ज्या भागातले सैनिक त्याच भागात ठेवले तर प्रसंगी गोळ्या घालताना त्याचे हात ट्रिगरवर थरथरतील, आताच्या यंत्रणेत तस होणार नाही. सैन्यातर्गत विद्रो-हाची शक्यता टाळायलाही हा एक उपाय आहे. घरापासून दूरवर डयूटीत गुंतवणे भारतीय लष्कराबद्दल नागरिकाच्या मनात अजून तरी आदर आहे. या आपल्या लष्कराचं शौर्य, शिस्त, झपाटा याबद्दल दबदबा आहे. गुजरातमधल्या जनतेन तर पोलिसी अत्याचारानतर आलेल्या सैन्याच स्वागत केलं होतं असंच ७४ मध्ये नवनिर्माण आंदोलनाच्या वेळी झालं होतं. पण अस किती काळ होईल ? ईशान्ये-तले आणि आसाममधले नागरिक एव्हाना लष्कराच्या उपस्थितीबद्दल कुरकूर करू लागले आहेत पंजाबमध्ये मुख्यत: शीख जनता आणि लष्कर याच्यात दुराव्याची एक भिंत उभी आहेच. नागरी प्रशास-नाशी लष्कराचा सतत सपर्क येऊ लागला तर त्या यंत्रणेतही भ्रष्टा-चार शिरायला वेळ लागणार नाही. गुन्हेगार, अड्डेवाले दादा, व्यापारी, उद्योगपती, राजकारण आणि नोकरशहा सर्व मिळून लष्कराला ही सडवून टाकतील कारण माणूस विकत घेण्याच्या तंत्रांमध्ये हे सर्व तज्ज्ञ आहेत. भारताच्या 'व्यवस्थे' मध्ये ज्याला शुद्ध, कार्यक्षम म्हणता येईल असा बहुदा एवढा एकच स्तंभ शिल्लक राहिला आहे तोही पोखरला गेला म्हणजे भारत पुन्हा एकदा ठग–पेंढाऱ्याच्याराज्यामध्ये रूपांतरित व्हायला मोकळा झाला ब्ल्यू स्टार ऑपरेशननंतर झालेल्या शीख सैनिकाच्या विद्रोहान काही ओरखडे उमटले आहेतच. तसा लष्कराचा चेहरा कधी फारसा बोलत नाही; पण काही वरिष्ठ अधि-कारी गप्पामध्ये सागतात की, त्यानंतर आपल्या लष्करात एक प्रका-रची नैतिक उदासीनता पसरली होती.

मला नियतीच्या या योगायोगाचीही अजब किमया भासली. ब्ल्यू स्टार ऑपरेशनचे मुख्य सूत्रधार मेजर जनरल रणजितसिंग दयाळ सदर्न कमाडचे प्रमुख म्हणून बदलून आले, अन् त्यांना पहिलं काम कोणतं लाभलं तर गुजरात शांत करण्याचं. त्या सदर्भात गव्हर्नरशी चर्चा करण्याचा माझा अदाज असा आहे की, मुरलेल्या लष्करी अधि-काऱ्याच्या सफाईदारपणे भावनारहित चेहऱ्यानं रणजितसिंग या परिस्थितीला सामोरे गेले असतील. पण मन ? माणूसच आहे ना. काय वाटलं असेल त्याना. ब्ल्यू स्टार ऑपरेशनचा वृतात कळेपर्यंत जेवणार नाही म्हणणाऱ्या आईचं समाधान करताना अंतःकरणात कशी कालवा कालव झाली असेल. आता तर त्यांचं नाव 'हिट लिस्ट' वर आहे म्हणे १९६५ च्या युद्धात अतर्क्य कौशल्य लढवून हाजी-पीरची खिंड जिंकणारा हा पराक्रमी योद्धा राजकारणाच्या टेबलवर हाजीपीरची खिंड तर परत द्यावी लागलीच पण रणजितसिंगाच्या वाटघाला ही कसली युद्धं येऊ लागलीत

लष्कर म्हणजे रेजिमेंटेशन, शिस्तीन चालू असणारं संचलन म्हणजे फॅसिझम आणि आकाश चिरत जाणाऱ्या 'सावधान' आज्ञे-सहित हजारो बुटाचा एक आवाज येण म्हणजे हुकूमशाही असं समजणाऱ्या काही गबाळ्या बुद्धिवाद्यांना वाटतं की, लष्कराचा देशांतर्गत वापर असाच वाढत गेला तर एक दिवस लष्करी हुकूम-शाही येईल. तसं होणार नाही या देशातल्या लोकशाहीची पाळमुळं आणि भारतीय लष्कराची परंपरा अशी शक्यता दाखवत नाही. खरी चिंतेची बाब अशी आहे की, लोकशाहीची ही सडलेली पाळ-मुळं पहाता अनेक लोकंच म्हणून लागलीत की लष्करी हुकूमशाही येऊन एकदा सगळं साफ झालं तर बरं.

लष्कराचा देशांतर्गत वापर करण्याचंही एक अलिखित तंत्र आहे.

'लोक मानसिक दृष्ट्या पोलीसविरोधी आहेत' इथपासून श्री. विष्णु पंड्याशी चर्चा सुरू झाली. 'म्हणून ते आमचं स्वागत करतात.' पोलीस, त्यांच्या कारवायांचा अतिरेक, वृत्तपत्र जग, 'गुजरात समाचार'च्या संदर्भात या बाबी फोकस व्हायल इथपासून सुरुवात झाली. विष्णु पंड्या हे या सर्व घडामोडीशी अत्यंत जवळून संबंध राखून असलेले एक पत्रकार. आता 'जनसत्ता'त (Express गटाचं गुजराती वृत्तपत्र) असतात. यापूर्वी आणीबाणीच्या काळात ते 'साधना' या गुजराती साप्ताहिकाचे संपादक होते. त्या काळात सरकारपुढे लोटांगण घालणाऱ्या पत्रकार विश्वाप्रमाणे न होता ज्यांनी लोकशाहीतली लढाई चालू ठेवली त्यांपैकी श्री. पंड्या एक. त्याकाळी मराठीत जी कामगिरी 'माणूस'नं बजावली ती तिकडे 'साधना'नं. विष्णु पंड्यांशी चर्चा झाल्यावर लक्षात आलं की, एक समान लढा एवढाच 'माणूस' आणि 'साधना' मधला दुवा नाही. तर श्रीभाऊंप्रमाणेच पंड्याजींची विषयाची मांडणी सरळ, सुबोध, कमी शब्दात खूप आशय मांडणारी, घडामोड उकलून दाखव्याकडे कल असणारी, 'काय' पेक्षा 'कसे' चा विचार मांडणारी असते. आजच इंडियन फेडरेशन ऑफ वर्किंग जर्नालिस्टची टीम गुजरातमधल्या घडामोडींची चौकशी करायला आली आहे तिथे पंड्याजींना निवेदन सादर करायचं आहे. ते तयार करण्याच त्यांचं काम चालू होतं; पण 'माणूस'कडून आलोय म्हटल्यावर हातातलं काम थांबवून त्यांनी वेळ दिला.

केवळ 'राजकीय' नाही

'बावीस एप्रिल' ही शब्दरचना एखाद्या म्हणीप्रमाणे कानावर पडू लागली ती इथपासून. बावीस एप्रिलच्या अराजकाचं 'सानुभव' वर्णन पंड्याजींनी सांगितलं. पोलिसी गुंडगिरी, लोकांना–पत्रकारांना बडवून काढणं, वृत्तपत्राच्या कचेऱ्यांवर हल्ले, कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडण या सर्वांचा आँखो देखा हाल त्यांनी दिला आणि पटकन या घडामोडीच्या 'कसे' कडे त्यांनी लक्ष दिलं. ते म्हणाले–

गुजरात राज्य बनल्यापासूनच इथल्या पोलीस खात्याची एक परंपरा डेव्हलप झाली पोलीस खात्यानं निष्पक्ष राहून कायदा व सुव्यवस्था जतन करण्यापेक्षा राजकीय पक्षाशी, पुढाऱ्याशी वफादार रहाणं जास्त महत्त्वाचं ठरू लागल. जे उच्च स्तरीय पोलीस अधिकारी होते त्यानी राजकीय सत्ताधीशाशी गठबंधन केल. मध्यमस्तरीय–इन्स्पेक्टर्स वगैरे यांनी आपलं नातं गुन्हेगार जगत, स्मगलर्स, अड्डेवाले याच्याशी जोडून हप्ते बांधून घेतले. या सर्वात निम्नस्तरीय हवालदाराची स्थिती हलाखीची बनली. एक तर त्याना पगारही तुटपुंजा असतो. त्यातच लोकाची चीड नेहमी त्याच्याच अंगावर निघते वरिष्ठ अधिकाऱ्याचे हात कुठे कसे बांधले गेलेत हे माहीत असल्यामुळे हवालदार लोक काही करू शकत नाहीत लोकानाही भ्रष्टाचाराचा खेळ माहीत असतो. त्यामुळेच ते मानसिक दृष्ट्या मुलातच पोलीस विरोधी असतात. या राखीव जागा विरोधी आदोलनाच्या निमित्तानं पोलीस आणखीनच पेचाच सापडले. पोलीस खात्यात निम्नस्तरावर मागासवर्गीयाची संख्या खूप मोठी आहे वृत्तपत्रानीही पोलिसाविरुद्धचे रिपोर्टस् ठळकपणे आणि भडकपणे छापले. म्हणजे ते खोटे होते असं नव्हे, खरेच होते; पण वृत्तपत्रानी विशेषत: 'गुजरात समाचार'ने पोलिसाना धारेवरच धरलं होतं. जनमत खवळेल अशा पद्धतीनं फोटो, वृत्तांत छापले होते. त्यामुळे लोक तोंडावर पोलिसाची छीथू करू लागले होते. अशा सर्व कारणांमुळे साठलेला असतोष बावीस एप्रिलला उसळून बाहेर आला. मी दोष पोलिसाना देणार नाही, त्यांना ज्या राजकीय नेतृत्वानं 'वापरून' घेतलय ते खरं गुन्हेगार आहेत. इथलं शेंबडं पोरही सागू शकेल की, राजकीय 'अभयदान' लाभल्याशिवाय पोलीस एवढा वेडाचार करणं शक्यच नाही. बावीस एप्रिलच्या पोलिसी विद्रोहाची न्यायालयीन चौकशी करायला मुख्यमत्र्याचा नकार कशासाठी आहे? ही जी नवी 'मारो पीटो' राजकीय शैली जन्माला येऊ लागलीय ती आपल्या राजकीय संस्कृतीला घातक आहे.

राखीव जागाविरोधी आदोलनानाही 'केवळ राजकीय' म्हणून निकालात काढता येणार नाही; पण व्यक्तिश: मी या आदोलनाला अनुकूल नाही, प्रतिकूलही नाही लोकमत या प्रश्नावर संवेदनशील बनू लागलय हे मला जास्त लक्षणीय वाटत आहे. शेवटी आता चालू असलेलं आदोलन कदाचित यशस्वी होईल, कदाचित फसेल पण यापुढे राखीव जागाच्या धोरणावर सवर्ण समाजाला गृहीत धरून राजकीय निर्णय घेता येणार नाही. राखीव जागांमधलं राजकारणही खपवून घेतलं जाणार नाही. राखीव जागाचा वापर करून मागासवर्गीय मतांचा पाठलाग करायचा तर सवर्ण समाजाची मतं गमवायची तलवार यापुढे कायम टागती राहील ही एक नवीनच सामाजिक–राजकीय प्रक्रिया आहे. ती कशातून गतिमान होते हे समजावून घ्यायला हवं. आताचं आदोलन मुख्यत: मध्यमवर्गीय सवर्णांचं आहे. त्याची शेती नसते, स्वत:ची इंडस्ट्रीही नसते नोकऱ्या हाच त्याचा आर्थिक आधार आहे. तिथे पावला पावलावर त्यांना राखीव जागा आणि रोस्टर पद्धतीचा जाच होऊ लागला. त्यातून निर्माण झालेल्या असतोषाच रूप म्हणजे आताच आदोलन. राखीव जागा ३१ वरून ४९ टक्के करण्याचा निर्णय स्थगित केल्यानतर आंदोलन थांबायला हव होतं. पण हीही धूळफेक आहे अस लोकाना वाटत, म्हणून आदोलन थाबत नाही.

नतर गप्पा स्वरूपात बराच वेळ चर्चा चालू राहिली. पूर्वीच्या चर्चा, मुलाखतीमधन येऊन गेलेल्या अनेक मुद्याचा पंड्याजींनी पुनरुच्चार केला. दंगलीमागे प्रबोध रावळ याचा हात, राखीव जागावादी गटाचा उदय, किरकोळ चकमकी पण जातीय लढाई नव्हे. आता चालू आहे ही लढाई मुख्यत: सरकार विरुद्ध सरकारविरोधी अशी आहे, सवर्णांविरुद्ध हरिजन अशी नाही. आदोलकानी ७४ च्या धर्तीवर नवनिर्माण युवक मडळ स्थापन करायची घोषणा नुकतीच केली होती त्या संदर्भात प्रश्न विचारला पंड्याजींच्या मुलाखतीतला हा शेवटचा मुद्दा आणि बाबूभाई पटेलांच्या मुलाखतीला पहिला मुद्दा इतके समान होते की, आपोआपच उत्कृष्ट 'एडिटिंग' सहित झूम शॉट घेत आधीच्या दृश्यावर पुढच दृश्य सुपरइंपोज होऊन पुढचा सीन होतो तसं झालं.

'नवनिर्माण आदोलन हे प्रारंभी प्रामाणिक होत भ्रष्टाचार, किमतवाढ याच्या विरोधी होते. पुढे त्याला केवळ 'चिमणभाई हटाव' एवढाच रंग प्राप्त झाला; पण गुजरातमधल्या चळवळीच हे वैशिष्ट्य आहे. नवनिर्माण आदोलनानं सर्वसाधारणपणे देशभर आणि मुख्यत: गुजरातभर एक नवी राजकीय जागृती निर्माण केली.

हे त्याचं सर्वांत मोठं योगदान आहे.' वाक्यांची सुरुवात पंड्याजींच्या मुखातून. रिले रेसमधल्या आधीच्या टप्प्यावर धावणाऱ्यानं येऊन बेटन पुढच्याच्या हवाली करावा तशी बाबूभाई पटेल यांची मुलाखत सुरू झाली. त्यांनी सहजपणे 'स्टार्ट' आधीच घेतलेला होता.

'गुजरातमधल्या आंदोलनांना नवनिर्माणपूर्वीच्या पन्नास वर्षांची पार्श्वभूमी आहे. गांधीजींचा अहमदाबाद मिलचा सत्याग्रह, खेडा बार्डोलीचे सत्याग्रह, दांडी यात्रा या महत्त्वाच्या टप्प्यांमधून एक फिजा–एक माहौल तयार झालं. आमच्या स्वभावाचं एक वैशिष्ट्य आहे. आम्ही शत्रुत्वाच्या फार टोकाला जाऊ शकत नाही. विरुद्ध विचाराच्या व्यक्तींशीसुद्धा एका टेबलावर बसून आम्ही विचार-विनिमय करू शकतो. इथे विविध विरोधी पक्षातले कार्यकर्ते, नेते एकमेकांना ओळखतात, त्यांचे आपसात मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामुळे इथे आम्ही सहजपणे एकत्र येऊ शकतो. म्हणून तर जनता आघाडीचा प्रयोग इथे सर्वात आधी सुरू झाला–१९७५ मध्ये आणि केन्द्रात जनता पक्ष फुटल्यानंतरही काही काही इथे तो प्रयोग टिकून राहिला. अजूनही विरोधी पक्षीय इतर कोणत्याही प्रांतापेक्षा गुजरातमध्येच जास्त सहजपणे जवळ येऊ शकतात.'

विविध प्रांतांचा प्रवास करताना असं जाणवलं आहे की, लोकांमध्ये एखाद्या व्यक्तीबद्दल आदर वसत असतो. त्या व्यक्तीचा किंवा आदर बाळगणाऱ्या व्यक्तीचा पक्ष, दृष्टिकोन, विचार, व्यवहार यापैकी कशातही मतभेद असले तरी सन्मानाबाबत मतैक्य असते. उदाहरणार्थ, आसाममध्ये प्रफुल्ल महंतबद्दल सर्व लोकांमध्ये असा आदर आहे. पंजाबमध्ये प्रकाशसिंग बादल (आता असेल?) कर्नाटकात रामकृष्ण हेगडे, तसं गुजरातमध्ये हे स्थान बाबूभाई पटेल यांचं आहे. अनेकांशी चर्चा करताना ते बाबूभाईंचं नाव निघालं की एक मूक मानवंदना देतात : नुसता 'बाबूभाई' असा उल्लेख करत नाहीत. ओह, बाबूभाई जशभाई पटेल' असं संबोधन असतं. नवनिर्माण आंदोलनामुळे चिमणभाई पटेलांचा पाडाव झाल्यावर काही काळ गुजरातला एक चांगलं सरकार 'बाबूभाई जशभाई पटेल' यांनी दिलं. आता ते सक्रिय राजकारणाशी संबंधित नाहीत. पण जागरूक लोकमत संघटित करायला 'लोकसमित्या' बांधण्याची जी जयप्रकाशजींची कल्पना घेऊन 'गुजरात लोकसमिती' काम करते तिचे ते अध्यक्ष आहेत. बडोदा डायनामाईट केसमधले एक आरोपी, नंतर जनता काळातले तामिळनाडूचे राज्यपाल आणि एक सन्माननीय गांधीवादी श्री. प्रभुदास पटवारी उपाध्यक्ष आहेत. पोलीस अत्याचारांच्या निषेधपर एक निवेदन द्यायला गेलेले असताना पटवारींना नुकतीच मारहाण झाली होती. वृद्धत्वाकडे झुकलेले पटवारीजी तसेच गुजरात लोकसमितीच्या कार्यालयात कामाला येऊन बसलेले होते. वृद्धत्वानं आपली मुद्रा बाबूभाईंच्या चेहऱ्यावर आणि आवाजावर उमटवली होती. पण अजून तळमळीला वृद्धत्व आलं नव्हतं. बाबूभाईना चालू आंदोलनात कुठलीच बाजू घ्यायची नाही. राखीव जागा विरोधी आणि जागावादी दोन्ही आंदोलनांचा त्यांनी 'निकम्मे' असा उल्लेख केला आणि कान पकडून सर्व राजकीय पक्षांनाही त्या शीर्षकाखालच्या रकान्यात आणून बसवलं. 'कार्यक्षमता आणि गुणवत्ता मारली न जाता मागासवर्गीयांचा विकास कसा घडवून आणायचा' यावर विचार व्हायला हवा अशी त्यांची अभिनिवेश-

बाबुभाई पटेल – सर्वांचे आदरस्थान

□

रहित भूमिका. या भूमिकेतून त्यांनी पंतप्रधानांशी पत्रव्यवहार चालवला आहे. गुजरातमधल्या काँग्रेस सरकारचा नादानपणा आणि त्याचं अपत्य–पोलीस अत्याचार–इकडेही त्यांनी राजीवजींचं लक्ष वेधायचा प्रयत्न केला आहे. राखीव जागांच्या प्रश्नावर राष्ट्रीय मतैक्य–national consensus तयार करण्याच्या आवश्यकतेवर ते भर देतात. राष्ट्रीय मतैक्य तयार होऊ शकलं नाही तर जातीय संघर्ष–वर्गयुद्ध या रस्त्यावर आपला देश खेचला जाणार आहे. Caste war has already began असं बाबूभाई म्हणतात तेव्हा त्यांचं साध्या स्वच्छ खादीच्या कपड्यातलं वृद्ध शरीर काळजीनं थरथरत असतं. अनुभवी डोळ्यांमध्ये भवितव्याचं भयानक चित्र उमटलेलं असतं.

त्या विचारात सहजच समोरच्या भिंतीवर लावलेल्या जयप्रकाशजींच्या life size जिवंत तस्वीरीवर काही काळ त्यांची नजर स्थिरावते. माझ्या डोक्यात येतं की हळूहळू ज्या विषयांवर राष्ट्रीय मतैक्य होण्याची आवश्यकता आहे–ज्या विषयांचा विचार करताना सर्वांनी जात, प्रांत, पक्ष भेद बाजूला ठेवून विचार करायला हवा–अशा विषयांची संख्या वाढत चालली आहे. आसाममधल्या परकी

नागरिकांच्या प्रश्नावर राष्ट्रीय मतैक्य तयार व्हायला हवे. पंजाबच्या समस्येवर, काश्मिरशी सबधित कलम ३७० किंवा 'पुनर्वसन विधेयका'-वर, समान नागरी कायद्याविषयी. आता राखीव जागाबाबतच्या धोरणावर. सहजच वाटून गेलं की आधी 'राष्ट्र' या विषयावर consesus तयार होईल का ?

हाच विचार आपोआप ओळखल्याप्रमाणे बाबूभाई सावकाश एकेक शब्द उच्चारत सागू लागतात- '१९३० मध्ये आम्ही स्वातंत्र्य-लढ्यात सहभागी झालो तेव्हा डोळ्यासमोर आधी देश असायचा; मग काँग्रेस पक्ष, सर्वात शेवटी स्वत:. आता बरोबर उलट झाल आहे. आताचे राजकीय नेते म्हणतात आधी मी स्वत:, मग पार्टी, सर्वात शेवटी देश. हे बदलल तर समाजपरिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे.' तसे हे शब्द हल्ली कुणीही बोलत; पण फार थोड्या जणाच्या बोलण्यात सच्चेपणाची साक्ष पटते. या मुद्यानंतर उगीच काहीतरी विचारण्याच प्रयोजन नव्हतं. त्यामुळे जरा वेळ गप्प बसलो. मग त्यांनीच पाठीवर हात ठेवत मराठीत विचारलं, 'पुण्याला घर कुठय तुझं' मी अरेच्चा केल्यावर त्यानी सांगितल की, शिक्षण पुण्यातच, फर्ग्युसनमध्ये झाल आहे ना. ग. गोरे, एसेम हे माझं सुहृद. मी पुण्याला अनेकदा येतो. थोडावेळ हवापाण्याच्या गप्पा झाल्यावर, मी हळूच त्याना विचारलं, 'इथूनच चिमणभाई पटेलाची मुलाखत घ्यायला चाललोय. त्यांना काय प्रश्न विचारू काही सुचवता का ?' हसले. म्हणाले, 'नाही, तू विचार काहीही.'

एकच उपाय

काहीही विचार ही पडत्या फळाची आज्ञा घेऊन ठरवलं की, चिमणभाईशी जरा खटपाळ खेळ करून पाहू. म्हणून त्यानी दिलेल्या वेळी त्यांच्या अतीव पॉश हॉलमध्ये संपूर्ण भितीवर विराजमान झालेल्या अप्रतीम निसर्गदृश्याकडे पाठ करून मुलायम कोचमध्ये सहा इच रुतलो तेव्हा आधी परवानगी काढली की, 'if you don't mind मी तुम्हाला फ्रँकली काही प्रश्न विचारू इच्छितो.' तेव्हा ते म्हणाले–अर्थात, अर्थात–तो तुमचा हक्कच आहे. नि:सकोचपणे विचारा. पण आधीपासून तुम्ही प्रश्न विचाराल की, आधी मी काही ब्रिफीग करू ? मी कसही म्हटल्यावर त्यानी 'तुम्हाला हव तस' म्हणणं असा 'पहले आप पहले आप' खेळ थोडा वेळ चालू राहिल्यावर मी सुचवलं की, आधी तुम्ही तुमची भूमिका माडा. चिमणभाई समोरच्या सोफ्यावर आरामात शेषशायी विष्णु पोजमध्ये बसले होते. त्याच्या गोल, गोड गुजराथी चेहऱ्यावर चक्क बालिश भाव वाटले. एकदा तळव्यानी चेहरा झाकून ते म्हणाले 'पत्रकाराशी बोलून किती थकायला होतं !' तेव्हा तर ते भाव' अधिकच खुलले. मलमलचा ओपन कॉलरचा झब्बा आणि सुरवार घातलेले चिमणभाई स्वस्थ मूडमध्ये वाटले. खोलीत थड हवा होती. बहुधा एअर कडीशनर चालू असावा. त्यामुळे कडक उन्हातून आल्यानतर डोळ्यावर मस्त सुस्ती येत होती. म्हणून त्यानी 'चहा घेणार का कॉफी' विचारल्यावर बरं वाटल. याचा अर्थ उगीच काहीतरी दोन वाक्य बोलून कटवायचा त्यांचा विचार नाही. नतर समोरच्या टीपॉयवर दोन फोन्सच्या आश्रयाला चहाचे कप, बिस्किटाची बशी, पलीकडे सावरून बसलेले चिमणभाई शॉटसाठी तयार.

'राखीव जागांच्या धोरणाला माझ्या पक्षाचा विरोध नाही. अन्य मागासवर्गीयांसाठी वाढीव १० टक्के जागाची तरतूद माझ्या पक्षानंच केलीय. त्यावेळी जनतेनं निषेध केला नाही. या आताच्या १८ टक्के मुळे असंतोष आहे. कारण निवडणुकांवर डोळा ठेवून हा निर्णय जाहीर करण्यात आला. ज्या त्वरेन तो निर्णय स्थगित करण्यात आला त्यावरून सरकारची चलाखीच स्पष्ट होते. आता एक नवीन आयोग नेमायच चाललय. आधीच राणे आयोगाचा विकृत वापर केला आहे. राणे आयोग 'मागासवर्गीय' ची व्याख्या ठरवायला आर्थिक निकषाचा आग्रह धरतो. यानी ते सोडून त्याच नावाखाली जातीयता जोपासू घातलीय. मुख्यमंत्री म्हणतात वाट्टेल ते करून मी ही चळवळ चिरडेन. त्यासाठी नागरी स्वातंत्र्यावर घाला घालण्याचीही त्याची तयारी आहे. ही पोलिसी अत्याचारांचीच प्रकरणे पहा ना. त्यांच्या पक्षाविरोधी वातावरण असलेल्या–खाडिया मतदारसघात लोकांना बडवून काढण्याचं सत्र आरंभल आहे. पाण्याचे नळ, वीज तोडणे, ड्रेनेजस् तुंबवणे, स्त्रियाच्या वाटेला जाण. काही करायचं बाकी ठेवलेल नाही. या प्रकारांची न्यायालयीन चौकशी करायची तयारी नाही. हायकोर्टानं स्वत:च कमिशन नेमलं तर त्याला कचऱ्याच्या टोपलीत टाकायची यांची तयारी. आपला एक भ्रष्टाचार लपवायला दुसरा भ्रष्टाचार, असला प्रकार चालवलाय. मृगेश प्रकरणात सोळंकीचेच हात लडबडलेत.'

कुशल तीरंदाजाप्रमाणे शरसंधान चालू होतं. समोरच्या मोठ्या फिरत्या तबकडीवर सोळंकीना बांधून घातलेलं असावं आणि सुमारे पंचवीस फुटावरून सटासट बाण मारत सोळंकीभोवती 'शरपजर' तयार करावा तशी चिमणभाईंची नेमबाजी चालू होती. 'वर्गयुद्ध-सोळकीना वर्गयुद्ध पेटवायच आहे. पटेलाचा खातमा करायचा आहे. 'खम' KHAM (क्षत्रिय, हरिजन, आदिवासी, मुसलमान या शब्दाच्या इग्लिश स्पेलिगचं पहिल अक्षर घेऊन तयार होणारा शब्द) सिद्धातानुसार त्याना एक पटेलविरोधी फळी उभी करायची आहे. मेहसाणा जिल्ह्यात जिथे पटेल सख्येन कमी आहेत तिथे ठाकूरांनी पटेलावर सशस्त्र हल्ले करण आताच चालू केलय. समाजकटकाना सरकारी सरक्षणच नव्हे तर प्रोत्साहन आहे.' असं तबकडीवर लटकवलेल्या माणसाच्याभोवती बाण रुतवून झाल्यावर ते थोडे थांबले, सावकाशपणे शेवटचा वर्मी बाण धनुष्यावर चढवला नीट प्रत्यचा ताणली. अन् सणाणत सुटलं 'सोळंकीनी खाली उतरायला हवं एवढा एकच उपाय आहे. मुख्यमत्रीपदाचा माधवसिंग सोळंकीनी राजिनामा देणे.'

'केवळ एक व्यक्ती दूर केल्यानं प्रश्न कसा सुटेल ?'

'कारण तो व्यक्तीच प्रश्न निर्माण करते आहे.' असं सागून 'राखीव जागाना आक्षेप नाही, मुख्यमत्री बदला' एवढीच आमची मागणी आहे हे त्यानी स्पष्ट केलं. वाली मंडलची भूमिका याच्याबरोबर उलट 'मुख्यमत्री कोण रहातो कोण जातो याच्याशी आम्हाला फारसं कर्तव्य नाही. राखीव जागा रद्द व्हायला हव्यात'ही वालीमडल आणि नवरचना समितीची भूमिका. इकडे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा सप आज सुरू झालाय, तस आदोलन पसरू लागल्याची चिन्हे दिसतायत. पुन्हा 'नवनिर्माण आदोलन' आठवू लागलंय. समोर चिमणभाई आहेतच. त्यावेळी 'नवनिर्माण' च्या शरसंधनात तेच तबकडीवर बाधून घातलेले होते. विचारून तर पाहू–

'आताच्या आदोलनातून 'नवनिर्माण' च्या धर्तीवर चळवळ

उभी रहाण्याची शक्यता– या आंदोलनाची आणि त्या नवनिर्माण चळवळीची तुलना तुम्ही कशी कराल ?'

'कसलं नवनिर्माण. या आंदोलनाशी त्याची तुलना होऊच शकत नाही. हे आंदोलन कितीतरी मोठ आहे. त्यावेळी सरकारवर पोलिसी अत्याचार, स्त्रियांचा विनयभंग, न्यायव्यवस्था धुडकावून लावणं असे आरोप नव्हते. इथे एक दिवसात सरकारनं बावन जणांचे खून पाडलेत.'

'मग त्यावेळच्या तुमच्या सरकारविरूद्ध आंदोलन का उभ राहिलं नाही ?'

'७४ मध्ये काँग्रेस बहुमतानं निवडून आल्यावर इंदिराजीना मी मुख्यमंत्री झालेलं नको होतं; पण मी पक्षातर्गत निवडणुकांचा आग्रह धरला. विधानसभा काँग्रेस पार्टीचा नेता म्हणून माझी बहुमतानं निवड झाल्यावर मला मुख्यमंत्री करावंच लागलं. पण त्या दिवसापासूनच मला उडवायचे डाव चालू होते. 'नवनिर्माण' त्यातूनच उभं राहिलं. त्याला हायकमांडचेच आशिर्वाद होते. आता तसं नाही. आता काँग्रेसचं हायकमांड माधवसिंगच्या मागे उभी आहे. नवनिर्माणपेक्षा आमचं आंदोलन 'जेनुईन' आहे.'

'नर्मदा प्रॉजेक्टची काही केस त्यावेळी होती ?'

'हं, ते मान्य होत आलं होत. पार्टीतल्या माझ्या शत्रूंनीच पतप्रधानाना सल्ला दिला ते मान्य न करण्याचा. म्हणून मला नाईलाजानं काँग्रेसचा त्याग करावा लागला.'

'त्यानंतरच्या काळात ज्या प्रकारचं राजकारण चालू आहे त्याबाबत तुम्ही समाधानी आहात का ?'

'अजिबात नाही. रोजच्या रोज हे राजकारण वाईटाकडून अधिक वाईटाकडे चालू आहे. चांगले, ध्येयप्रवण लोक राजकारणात आल्याशिवाय हा प्रवाह रोखता येणार नाही. तोवर हे सडलेलं राजकारण असच चालू रहाणार.'

'वाईटाकडून अधिक वाईटाकडे असं तुम्हाला का वाटतं ?'

'भ्रष्टाचाराचं प्रमाण केवढं वाढलंय. पूर्वीच्या भ्रष्टाचारात आणि आताच्यात खूप फरक आहे. पूर्वीचा भ्रष्टाचार व्यक्तिशः सुटासुटा चालायचा. आता छुपा आणि सघटित भ्रष्टाचार चालतो. काँग्रेसचा निवडणूक फड कसा उभा रहातो ? श्री. क्लिन राजीवजीनी आदेश दिला की, काँग्रेसचा कोणताही पदाधिकारी निवडणूक फड जमा करणार नाही. लोकांना वाटलं भ्रष्टाचाराला केवढा आळा घातला! मग निवडणूक खर्चाचे कोटयवधी रुपये कुठून आले ? तर या मल्टिनॅशनल कपन्याशी जे करार होतात त्याच्या कॉंट्रॅक्टपैकी १ टक्का रीतसर काँग्रेसच्या तिजोरीत जमा होतो. म्हणजे पूर्वी पैसा गोळा करायचं काम महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेशात व्हायच. आता इटली जर्मनी, फ्रान्स इथे होतं.'

नोटस् घेत होतो ती मान वहीतून वर घेतली. पेनचं क्लिक् दाबल. अन् मग सरळ चिमणभाईंकडे पहात विचारलं, 'फक्त काँग्रेसच भ्रष्ट आहे का ? इतर पक्ष भ्रष्टाचारापासून स्वच्छ आहेत का?' याला त्यांनी काय उत्तर दिलं ते आठवत नाहीये. इतकंच आठवतं की, त्यानी सुसंस्कृतपणे निरोप दिला. बाहेर पडल्यावर मला लक्ष्मणचं एक व्यगचित्र आठवल. दोन पुढारी एकमेकाशी भाडतायत. एक दुसऱ्याची गचाडी पकडून मूठ उगारून सांगतोय. 'माझ्यावर भ्रष्टाचाराचं छत्तीसच आरोप आहेत. तुझ्यावर एकशेपाच आरोप आहेत.' आणि कोपऱ्यात लक्ष्मणचा बिचारा सामान्य माणूस चिरडून दिडमूढ होऊन बसलाय.

□

एका नागरी युद्धाची कहाणी

दृश्यंही अशी भेसूर की, सामान्य माणूस दिडमूढच होऊन जावा. त्या दृश्यामागचा हलकल्लोळही एवढा प्रचंड की त्यात सामान्य माणसाचा आवाज चिरडून जावा. ते दृश्य नजरेत नोट यावं म्हणून चिमणभाईंकडून परतताना नेहरू पूल पार केल्या केल्या रिक्षातून उतरलो. बावीस एप्रिलला पोलिसी विद्रोहाचा उद्रेक झाल्यावर याच जागी उभं राहून पोलिसाच्या टोळक्यानं येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकाना अडवून बडवून काढल होतं. त्यातही पत्रकारांना वेचून तुडवल होतं. त्या दिवशी त्या अभद्र वेळात खांद्यावर शबनम घेऊन वावरणं म्हणजे मार खाण्याची हमी होती. समोर मुख्य रस्ता 'भद्र' कडे जाणारा होता. तर डावीकडचा रूंद रस्ता 'गुजरात समाचार' कडे जाताना. नेहरू पूलावरच्या या जागेवरून 'गुजरात समाचार' ची तीन मजली वास्तू, त्यावरची मोठी पाटी नजरेत भरत होती. चालत चालत त्या वास्तूपाशी पोचलो.

फाटक बंद. फाटकावर सशस्त्र राखीव पोलिसाचा पहारा चालू. महेश शहाना भेटायचंय सागितल्यावर फाटकाचं दार किलकिलं झालं. ओळख मागण्यासाठी बदुकीभागचा हात पुढे झाला. महेश शहा (गुजरात समाचारचे एक ज्येष्ठ वार्ताहार) 'सकाळ' साठी गुजरात वार्तापत्र लिहितात. त्या सदर्भातली ओळख दाखवली. पोलिसानं विचारलं त्यात काय आहे पाहू. शबनममधली वही, इडियन एक्स्प्रेस आणि 'टुडे' चे अक दाखवून आत शिरलो. आवारातच उजवीकडे जळलेल्या न्यूजप्रिंटचा प्रचड ढीग उपसण्याचं काम चालू होतं. सगळा कागद जळालेला नव्हता, पण अर्धवट जळालेलं दृश्यच जास्त विदारक वाटतं. डावीकडे जळून पार लोखंड झालेल्या दोन मोटरी, स्कूटर्स आणि सायकली पडल्या होत्या. पोर्चमध्ये शिरलं की, वास्तूवरचा धुरकट थर, जळालेल्या यंत्राचा वास अगावर येत होता. तिथेच बाकडं टाकून पेपरच्या स्टाफपैकी काहीजण येणाऱ्या जाणाऱ्याची चौकशी करत होते. माणसाचं वावरण, बोलणं यात अजूनही दडपण जाणवत होतं. मतिकाला आल्यासारखे मौन. अस्वस्थ पणे त्या खडहरामध्ये मोजकेच लोक फिरत होते.

तसंच समोर चालत गेलं की, Western Times या वृत्तपत्राची कचेरी– नव्हे राख लागत होती. दिनेशभाई फिरून उध्वस्त Western Times दाखवतात. बावीस एप्रिलला हल्ला झाला तेव्हा दिनेशभाई इथेच कामाला होते.

आवारात उजवीकडे जळलेल्या न्यूजप्रिंटचा प्रचंड ढीग उपसण्याचं काम चालू होतं.

□

एस्. आर्. पी. बंदोबस्त – बडोदा

□

सुमारे १ वाजता पहिला हल्ला आला तेव्हा मी 'इथे' बसलो होतो असं दिनेशभाई सांगतात. तिथे आता एक वेडीवाकडी खुर्ची, मोडक्या टेबलाचा लोखंडी सांसाडा आणि काळी ठिक्कर जमीन आहे. 'त्यातच मी दिसत नाहीये नशीब समजा' दिनेशभाई सांगतात. कारण खालून असा काही तरी रानटी हल्ला येतोय म्हटल्यावर या वरच्या मजल्यावरच्या संपादकीय विभागातून त्यांनी समोरच्या घराच्या छतावर रस्ता शोधला. तिथून पलिकडच्या गल्लीत उतरून ते दफा झाले. पहिल्या हल्ल्याची वेळ एकची साधली होती. कारण त्यावेळी 'लंच आवर' चालू असतो. बहुसंख्य कामगार वास्तूबाहेर गेलेले असतात. पहिल्या हल्ल्यात सुमारे १००–१५० माणसंच होती. कमांडोच्या हल्ल्याप्रमाणे वीस-एक मिनिटात त्यांनी काम उरकलं. दुसरा मोठा हल्ला दुपारी तीननंतर झाला. त्यात मात्र हजार-एक-जणांचा अंदाधुंद जमाव होता. हे लोक जीप्स, महापालिकेच्या ट्रक्स इ. तून आले होते. कित्येकांच्या अंगावर अजून खाकी ड्रेस होते. काहींच्या डोक्यावर हेलमेट्स होतो. त्यावेळी शहरभर कर्फ्यू चालू होता. या हल्ल्यात मात्र आगडोंब उसळला. 'गुजरात समाचार'ची यंत्रसामुग्री तर पद्धतशीरपणे निकालात काढण्यात आली; पण ना अध्यात ना मध्यात, फक्त गुजरात समाचारच्या सान्निध्यात असलेल्या Western Times लासुद्धा जळून खाक व्हावं लागलं. अजूनही धुमसत्या आगीची धग जाणवत होती. कोणाशीही बोलायचा प्रयत्न केला तर धुमसत्या मनांचीही धग जाणवत होती. बावीस एप्रिल ! बावीस एप्रिल !

पण ही कथा फक्त एक दिवसाची नाही. या शेवटाकडे तिची प्रकरणशः वाटचाल तीन वर्षांपूर्वी सुरू झाली· दिनेशभाई आणि त्यांच्यासारखे अनेकजण, महेश शहा, महेशभाई ठाकर (न्यूज एडिटर), सौ. स्मृतिबेन शहा (सहाय्यक मॅनेजिंग एडिटर), श्री. शांतिलाल शहा (चीफ एडिटर) तशा सर्वांशी बोलून, इतर नागरिकांकडून त्यातला तपशील तपासून घेऊन, मागल्या पुढल्या माहितीचे तुकडे नीट जागी जुळवले की 'गुजरात समाचार'ची– एका नागरी युद्धाची कहाणी तयार होते.

तीन वर्षांपूर्वी अहमदाबादला भारत–वेस्टइंडीज क्रिकेटची मॅच झाली. ही मॅच गुजरात क्रिकेट असोसिएशनच्या सरदार पटेल स्टेडियमवर झाली. तेव्हा मृगेश जयकृष्ण GCA चे उपाध्यक्ष होते तर त्याचे वडील हरिवल्लभ जयकृष्ण अध्यक्ष.पुढे निवडणुकीत मृगेश यांच्या हातून ते पद गेले. तेव्हा त्यांनी स्वतःच्या हिंमतीवर दुसरं स्टेडियम बांधायचं ठरवलं. अहमदाबादजवळ १८ कि. मी. वर मातेरा नावाच्या गावी हे स्टेडियम बांधायचा घाट घालण्यात आला. मृगेश आणि CM एकमेकांचे मित्र. त्यांचं या स्टेडियम बांधण्यात साहाय्य होतं. हरिवल्लभ जयकृष्ण गुजरात फर्टिलायझर कॉर्पोरेशनचे अध्यक्ष आहेत. सौ. पारूल मृगेश गुजरात टुरिझम्च्या संचालिका आहेत. (सौ. शहा यांना गुजरात टुरिझमचं संचालकपद हवं होतं ? अशी शंका मी विचारल्यावर महेशभाई ठाकर सांगतात की तशी अफवा 'त्यांनी' मुद्दाम उठवलीय. सौ. शहांनी कधीच कोणत्याही सरकारी पदावर काम केलेलं नाही असं ते म्हणतात.) हे पहाता सरकार दरबारी मृगेश कुटुंब काय वजन राखून आहे हे समजतं. इतक्या दूरवर आणखी एक स्टेडियम बांधावं की नाही असा एक वाद सुरू झाला. त्यात 'समाचार'नं आपली बाजू घ्यावी, लोकमत तयार करावं अशी मृगेश यांची अपेक्षा होती. कारण मृगेश आणि शहा हेही दोस्त होते.

श्री. शहा यांनी बाजू घ्यायचं नाकारल्यावर ही दोस्ती संपली. मृगेश यांनी मुख्यमंत्र्यांद्वारा दबाव आणायचा प्रयत्न केला. त्यालाही शांतिलालजींनी दाद दिली नाही म्हटल्यावर मैत्रीचं रूपांतर शत्रुत्वात झालं. युद्धाची ठिणगी पडली.

१९ ऑक्टोबर १९८३ पासून गुजरात समाचारच्या सर्व जाहिराती थांबवण्यात आल्या. या वृत्तपत्राचा खप गुजराती वृत्तपत्रात सर्वात जास्त, तीन लाख इतका आहे. सरकारी जाहिराती का थांबवण्यात आल्या याचं काही कारण देण्यात आलं नाही. जाहिराती थांबवण्याविषयी लेखी सरकारी ऑर्डरही नव्हती–गुजरात समाचारचा वार्षिक २० लाख रुपयांचा घाटा होऊ लागला.

१९८४ च्या मध्यास 'समाचार'ने 'प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया'

कडे तक्रार नोंदवली. १६ जानेवारी १९८५ ला कौन्सिलनं 'समाचार' आणि सरकार दोघांनाही पाचारण करून त्याची बाजू ऐकून घेतली. त्या आधारावर २२ फेब्रु ला निकाल 'समाचार'च्या बाजूनं होता. प्रेस कौन्सिलनं सरकारी निर्णयाला Political victimisation हटलं. सरकारनं जाहिराती देण सुरू करावं असा तो निकाल होता. गुजरात सरकारनं हा निकाल धाब्यावर बसवला.

उन्मत्त आव्हान

'परकी चलन' गुन्ह्यामध्ये मृगेश जयकृष्ण याचे हात सापडणे आणि राखीव जागाविरोधी आदोलन पेटण या दोन घडामोडी एकदमच घडल्या. या दोन्ही उचलून धरून जनतेसमोर सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभ करण्याचं काम गुजरात समाचारनं केलं. १८ मार्चला 'गुजरात बद' होतं तिथपासून राखीव जागाविरोधी आंदोलन वाढत पसरत गेलं. याच आंदोलनाची यापूर्वीची आवृत्ती १९८१ साली निघाली होती. त्यावेळी 'समाचार'नं कोणतीच बाजू घेतली नव्हती आता आदोलनाला इधन पुरवण्याचं नेतृत्व गुजरात समाचारकडे गेले. त्याच्या दुसऱ्या दिवशी १९ मार्चला मुबईच्या सहार विमानतळावर कस्टम अधिकाऱ्यानी आशुतोष नानावटी आणि चंद्रकात अमीन या दोघाना ३६ लाख रु परकी चलन बेकायदेशीर मार्गानं हांगकांगला पाठवण्याच्या प्रयत्नात पकडलं. हा पैसा मृगेश जयकृष्ण यांचा होता आणि त्याच्याच सांगण्यावरून तो भारताबाहेर नेला जात होता असं बाहेर आल. गुजरात समाचारनं असं माडल की, याचे धागेदोरे माधवसिंग सोळकीपर्यंत जातात; निवडणूक फंडाचे हे पैसे आहेत. काँग्रेसचा निवडणूक फड उभा करायच काम मृगेश जयकृष्ण यांच्याकडे होतं. त्यातच 'समाचार'न हेही उघडकीस आणल की मृगेश याचे 'योगेश माणिकलाल' (C/o हेरगिरी प्रकरण, नवी दिल्ली) या फर्मशी सबध होते.

मृगेश प्रकरणावरून उठू शकणारा गदारोळ टाळण्यासाठी सरकारनं राखीव जागाविरोधी आदोलनाला प्रारभी फुंकर घातली आणि नंतर ते हाताबाहेर जातंय म्हटल्यावर ते चिरडण्यासाठी झोडपून काढायला प्रारंभ केला असं 'समाचार'चे लोक सांगतात. आदोलन आणि पोलीस मारहाणीचे वृत्तांत गुजरात समाचारनं फोकस केले.

आपल्या वास्तूला काही धोका आहे म्हणून सरक्षण मिळावे| असं पहिलं पत्र 'समाचार'न १९ मार्च रोजी पोलीस कमिशनरांना दिलं. याला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. १० एप्रिलला परत दुसरं पत्र दिलं की, गुजराय समाचारला सतत धमक्या मिळतायत, पत्र, फोन, चिठ्ठ्यांद्वारा कळवलं जातंय की तुमचे प्रकार बंद केले नाहीत तर प्रेस जाळून टाकू. उत्तर नाही. परत १२ एप्रिलला गव्हर्नरना सविस्तर पत्र दिलं, त्याच्या प्रती मुख्य सचिव, गृहसचिव, पोलीस कमिशनर आणि IGP ना पाठवल्या. या वेळी पत्राची पोचसुद्धा आली नाही. म्हणून तार केली कारण तारेची पोच द्यावीच लागते. १८, १९, २० एप्रिलला 'गुजरात समाचार'च्या संरक्षणार्थ स्टाफ देण्यात आला. कोणतीही पूर्वसूचना न देता २१ एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वा. काढून घेण्यात आला. याविषयी 'समाचार'नं तक्रार नोंदवली. नंतर बावीस एप्रिलचा इतिहास एव्हाना सर्व दूर पसरलाच आहे.

ज्या पद्धतीनं हे 'ऑपरेशन' उरकण्यात आलं ते पहाता ते पूर्वनियोजित होतं हे लक्षात येतं. प्रेसच्या ज्या भागात कधी कोणता बाहेरचा माणूसच काय पण समाचारचीच माणस जात नाहीत, तोही पद्धतशीरपणे मोडून ठेवला होता. या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करायला सरकारचा नकार आहे. या प्रकरणानंतरसुद्धा 'गुजरात समाचार'कडे धमक्या येतायत की इतक्यानही शहाणे झाला नाहीत तर तुमच्या माणसाकडे बघून घेऊ यापुढे आपल्यावर हल्ले होण्याची शक्यता आहे, या छायेत आता तो स्टाफ वावरतो पण वादळात सापडलेल्या नौकेवरच्या प्रवाशानी एकमेकाला धरून रहाव तस टीमस्पिरिट गुजरात समाचारमध्ये जाणवतं.

सध्या गुजरात समाचारच्या बडोद्यातल्या छोट्या प्रेसमधून दोन पानी आवृत्ती निघते, काही हजार प्रतीची. अहमदाबादमधल्या मालमत्तेचा विमा उतरवलेला होता. इन्शुरन्स कपनी रीतसर चौकशी करून नुकसान भरपाई देईल न देईल. गुजरात समाचार आज ना उद्या पुन्हा पूर्ववत सुरू होईल, अशी वाट लोकसुद्धा पहातायत. गुजरात समाचार मिळत नाही म्हणून दुसऱ्या कोणत्या वृत्तपत्राचा खप वाढलेला आहे असं झालेलं नाही. उलट सरकारवादी 'सदेश'च्या प्रतीची अहमदाबादच्या काही भागात होळी करण्यात आली. पण हे सर्व महत्त्वाच नाहीच मुळी. महत्त्वाचं हे आहे की भारतीय पत्रकार विश्व या आव्हानाला सामोरं कसं जाणार आहे? आविष्कार स्वातत्र्याच्या दिशेने फेकलेलं हे उन्मत्त आव्हान आहे. या ना त्या प्रकारे आज 'गुजरात समाचार' जात्यात आहे इतर वृत्तपत्र सुपात मुबईत निवडणुकीनंतर काँग्रेसच्या बैठकीत जो गोंधळ माजला त्याचा फोटोसहित वृत्तांत लोकसत्ताने छापला तर कोणाचा तरी लोकसत्ताला फोन आला होता. 'तुमचाही गुजरात समाचार' करू. भारतीय पत्रकारितेच्या इतिहासात 'बावीस एप्रिल'ला जोड नाही. 'बिहार प्रेस विधेयक'चा सामना भारतीय पत्रकार जगतानं एक होऊन केला होता आणि जिंकला होता. (किंवा सरकारनं जिंकू दिला होता.) 'बावीस एप्रिल' प्रसगात लपलेल्या अर्थाचा शोध घेतला तर ते आव्हान 'बिहार प्रेस विधेयक'हून गभीर स्वरूपाचं असल्याचं लक्षात येईल. 'अखिल भारतीय सपादक परिषदे'ने ठपका 'समाचार' वर ठेवला आहे की त्यांनी फार मडक सरकारविरोधी बातम्या छापल्या. इडियन फेडरेशन ऑफ वर्किंग जर्नालिस्टस्ने चौकशी चालवली आहे. काय निष्पन्न होईल हे एक प्रश्नचिन्ह आहे. पण त्यापूर्वी निदान हे नोंदवून ठेवू यात की, इंग्रजी सत्तेच्या काळात इंग्रजावर कडाडून टीका करणाऱ्या वृत्तपत्रांचे प्रेस जळाल्याचा इतिहास नाही. असलाच तर नाझी राजवटीत सरकारविरोधी वृत्तपत्राची नासधूस, मुस्कटदाबी झाल्याचा इतिहास आहे.

रात्री टीव्हीवरचे कार्यक्रम थांबवून राज्यपाल बी. के नेहरूंचं भाषण प्रसृत करण्यात आलं. रजेवर गेलेले राज्यपाल रजा सोडून परतले. त्यानी टी. व्ही वरून लोकाना अत्यंत उत्कट शब्दात शांत रहाण्याचं, जातीय सलोखा पाळण्याचं आवाहन केलं. गाधीजींची आठवण करून दिली. पोलीस अयोग्य पद्धतीने वागल्याचं त्यानी कबूल केलं. ते सगळे उत्कट शब्द साबणाच्या फुग्यासारखे वाढत होते. त्यानतर रात्री टीव्हीवर दोस्तोव्हस्कोच्या 'क्राईम अँड पनिशमेंट'ची फिल्म होती हा योगायोग किती अर्थपूर्ण होता!

नोंदवही मिटल्यानंतर

१९७२ मधे बडोद्याला एक विद्यार्थी शिबीर होतं. सपूर्ण भारतातून प्रत्येक प्राताचे विद्यार्थी प्रतिनिधी बोलावले होते. शिबिराचा विषय होता 'राष्ट्रीय एकात्मता.' त्या शिबिराला महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून आम्ही काहीजण गेलो होतो. त्यावेळी राष्ट्र म्हणजे काय, एकात्मता कशाशी खातात आणि भारत नावाच्या या आपल्या देशापुढे राष्ट्रीय एकात्मता नावाची काही समस्या आहे वगैरे काही म्हणता काही कळत नव्हतं. तेव्हा एवढच कळलं की तीन दिवस मजा झाली, बडोदा–अहमदाबाद पहायला मिळालं. आता त्याला बारा वर्ष–म्हणजे एक तप लोटलं. आता काही फार कळायला लागलं आहे अस नाही. पण निदान काय काय कळत नाही, कळेनासं होतंय याचा काहीसा अदाज येऊ लागलाय. त्यावेळी मनाची पाटी कोरीच होती. आता त्यावर प्रश्नचिन्हं उमटलेली असतात. आसाममधे, ईशान्य भारतातल्या पहाडी राज्यामध्ये, काश्मिरमधे किंवा पंजाबमधे, केरळमधे किंवा गुजरातमधे ही प्रश्नचिन्हे सोबत घेऊनच प्रवास चालतो. दर प्रवासात पाटीवर उमटणारी प्रश्नचिन्हं ठळक होत जातात. मोठी होत जातात.

अशा प्रश्नचिन्हासमवेतच अहमदाबादमधे आणखी एकदोन दिवस काम झालं. पण जी. ए. कुलकर्णीची आधी अनेकदा वाचलेली कथा परत वाचताना नवनवीन आशय, अर्थ सापडतो तसेच हे उरलेले दिवसही झालं. जीएंच्या कथाही मानवी अस्तित्व, त्याचा अर्थ, नियती या सर्व गूढ कोड्याविषयी मनात प्रश्नचिन्ह उमटवून सपतात तसंच आता झालं किती तऱ्हाची माणसं भेटतात त्याच्या परस्पर सपर्कातून इतिहास घडत जातो. सामाजिक घटनांच्या प्रवाहात जो तो आपल्या वाट्याला आलेली जागा पकडून असतो. इतिहास प्रवाहाचा दूत बनून असतो. माधवसिंग सोळकीसारखा माणूस घ्या. आताच्या सर्व नाट्याचा 'खलनायक' म्हणून कोणी रंगवला जात असेल तर सोळकी. हेच माधवसिंग हे एक सुसस्कृत व्यक्तिमत्त्व आहे. स्वत: गरिबीतून वर आले आहेत. नेतृत्वाच्या प्रारभीच्या काळात तर त्यांची विद्वान–enlightened अशी ख्याती होती. त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी अभ्यासूपणाची आहे सातव्या दशकाच्या उत्तरार्धात वकिली करण्याकरता त्यानी सक्रीय राजकारण सोडलं होत. स्वत: पत्रकारही होते. गुजराती आणि उर्दू काव्यावर त्याच प्रेम आहे. सुप्रसिद्ध गुजराती साहित्यिक उमाशकर जोशी आणि सुदरम् यांच्या काव्यपक्ती पाठ असलेला आणि स्वत:च्या नावे काही रचना रचलेला असा माणूस. पण इतिहासाचा प्रवाह 'माणूस' माधवसिंग सोळकीला विचारत नाही, जाणत नाही. सामाजिक, राजकीय समस्याच्या गुतागुतीमधून शेवडो तऱ्हाचे स्वार्थ, हितसबंध अशा सर्वामधून समूहाच्या असतोषाला तोड फुटतं तेव्हा ज्या 'व्यवस्थे' विरुद्ध उद्रेक घडतो तिच्या केंद्रस्थानी असलेला माणूस. त्याचे कदाचित चुकीचे ठरलेले काही निर्णय माधवसिंग सोळकी. मुख्यमत्री आणि ससदर्भ माहिती म्हणजे : जात खत्री.

या जातीव्यवस्थेमधून तर राखीव जागाविरोधी–जागावादी अशा आंदोलनाचा जन्म आहे. त्याच्याशीच आर्थिक गरीबी आणि बेकारी या समस्या निगडित आहेत. भारत हे एक महाप्रचड कोडं आहे. एक खंडप्राय आकाराच प्रश्नचिन्ह आहे. त्यातली जातीव्यवस्था ही एक अथांग गुतागुत आहे.

असा हा भारत त्याच्या गुणावगुणासहित ज्यांना थोडाफार कळला होता, भारत ज्यांच्याशी बोलला, ज्याच्या हसण्यासहित हसला, अश्रूंसमवेत रडला अशा नेत्यामध्ये एक नाव : मोहनदास करमचंद गांधी. त्यांच्या काही पाऊल खूणा कुठे सापडतात का हेही गेले आठवडाभर इथे वावरताना शोधत होतो. त्या पुसलेल्या किंवा पुसट होत चाललेल्या दिसल्या. ज्या अस्पष्ट पाऊलखुणा शिल्लक होत्या त्यांच्यात आज आवश्यक असलेला रस्ता दाखवायची शक्ती आहे की नाही हे समजले नाही. उलट असंच वाटल :

शातीचे शेकडो फिरते ताबूत ज्यांनी उभारले
पण नवनिर्मितीचा एकही किबुत्स
ज्यांना उभा करता आला नाही
त्या या फलशून्य त्यागाच्या व दानाच्या नावाने
इतिहास काय लिहील ?

आता ते शातीचे ताबूतही उध्वस्त होत आलेत. ज्या अंगणात गाधी वाढले ते अगणच अशातता अस्वस्थता आणि हिंसा यानी गजबजून गेल आहे. दोन दिवस अहमदाबादमधे वेड्यासारख चिवकार वणवण भटकताना ही गजबज नजरेला दिसली. भद्र, मिर्झापूर, नेहरू पूल, एलिस ब्रिज, रायखड, पालडी, नवरगपुरा, लाल दरवाजा या भागातल्या गर्दीमधे अशातता फिरतेय असं वाटलं. भितीवरच्या घोषणामधे चुना लावून अशाततेचा आक्रोश चालू असलेला ऐकू आला सर्व दंगलग्रस्त भागात खाद्यावर शबनम अडकवून भटकताना–खाडिया, अरटोडिमा, बापूनगर, गरीब नगर, इदिरा नगर, दर्यापूर, काळूपूर, गोमतीपूर, सरसपूर सर्वत्र ते शातीचे ताबूत कापरासारखे जळत असलेले वाटले. बापूनगरची पाच हजाराची पार उध्वस्त झालेली वस्ती पहाताना किंवा अमीन चौकमधला 'दगलग्रस्त रिलिफ कॅम्प' पहाताना गाधीजींच्या 'सर्वधर्म समभावा'ची थडगी पहात असल्यासारख वाटल. रिक्षा ड्रायव्हर युनियनचा लीडर अहमदखान पठाणनं जेव्हा सागितल की, दगल हिंदुनी नाही केली, सरकारन चिथावली, राखीव जागाविरोधी आदोलन बदनाम करायला; तेव्हा ती 'सत्तेच्या सटोडिया'ची व्यापारी गर्दी गाधी स्मारकाआड सौदे करताना दिसली. ती ही दगल प्रत्यक्षात पेटली कशी ? अडुचावरून पोलिसांना नियमित रवाना होणारा हप्ता पोचला नाही. त्याची चौकशी करायला पोलीस आले तेव्हा दादान सागितलं 'सध्याच्या आदोलनामुळे पुरेसा धदा नाही, तुम्हाला हप्ता कोठून देऊ ?' त्यावरून पद्मतशीर दगल उसळली. किरीट भट म्हणाले ते अधिकाधिक उलगडत होतं, 'आपण रोजच्या रोज गाधी जीना मारतो आहोत.' त्यामुळे गाण्याच्या ओळी आठवत होत्या

'सुन ले बापू ये पैगाम। मेरी चिट्ठी तेरे नाम
चिट्ठीमें सबसे पहले। लिखता तुझको राम राम'

हे गुणगुणतच साबरमती आश्रमाच्या दारात उभा राहिले शहरापासून जरा दूर, शात साबरमती आश्रम गाधीजीच एक 'फॉसिल' बनून राहिला होता. दारात साबरमती आश्रमाची स्थापना, विसर्जन,

हेतू, कार्य इ. ची माहिती देणारा एक बोर्ड होता. त्यातल्या सत्याग्रह, सदाचार, शुचिर्भूत, ईश्वरप्रणिधानता यांना फारसा अर्थ उरला नव्हता. बोर्डवरची गिरवलेली काही अक्षरं मात्र. आश्रमात राज्य-राखीव पोलिसाच्या एका करनोचा सशस्त्र तळ पडलेला होता. मोठं गांधी म्युझियम सुस्त पडून होतं. त्यातल्या फोटोंवरून बोट फिरवलं तर धुळीची रेष उमटत होती. म्युझियमच्या प्रवेशद्वाराशी गांधीजींच्या काठीला पकडून दुडदुडत पुढे धावणाऱ्या बालकाचं अत्यंत निरागस सुरेख चित्र होतं. मागून गांधीजी येत होते रिचर्ड अटेनबरोनं हेच चित्र 'गांधी' च्या जाहिरातीमध्ये उचललं. रिचर्ड 'अंकल' ला वाटलं असेल ते बालक नव्या पिढ्याचं रूप आहे. पण नव्या पिढ्याचं साधारण त्याच वयाचं रूप तिथे म्युझियमबाहेर होतं, आश्रमातल्या झाडाखाली, विड्या ओढत. गांधीजींची सव्वाशे वर्षे जगायची महत्त्वाकांक्षा होती. तो खरी ठरली असती तर ते आज जिवंत असते. कसे असते? म्युझियममध्ये नौखालीत एका झोपडीच्या दारात उभ्या असलेल्या गांधीजींचा फोटो होता. आधारासाठी हाताची झोपडीच्या दाराची चौकट पकडून, थरथरणारी झोपडी, थरथरणारे गांधीजी बाहेर बघतायत, कुठे काही विवेकाचा प्रकाश दिसतोय का? या 'वन मॅन बटॅलियन' च्या चेहऱ्यावर पार उध्वस्त, सुन्न भाव. गांधीजी आज असते तर असे दिसले असते. बर झालं ते नाहीत ते.

साबरमती आश्रमात ते शिल्लक आहेत 'लाईट अँड साउंड' शोच्या रूपात. साडेसातला अंधार पडला की हा शो चालू असतो. त्यांच्या 'हृदय कुंज' समोर खुर्च्यांमध्ये आम्ही मोजकेच पाचसातजण बसलो की हृदयकुंजवर साबरमतीच्या लाटांचा प्रकाश आणि ध्वनी खेळ चालू लागतो 'ईशावास्यमिदं सर्वं' हा श्लोक आणि दांडीची ऋषींची गोष्ट यासहित सुरू झालेला हा ध्वनीप्रकाशाचा खेळ वर्तमानाचा कसा निर्व्याज उपहास करून जातो. गांधीजींची गोष्ट पुढे सरकत जाते तसा काही काळ सगळा आश्रम जिवंत होऊन उठतो. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग, भारत छोडो आंदोलन...

गांधीजी आणि इतर अनेक नेते, अनाम वीर कोणता देश स्वतंत्र करायला जगले आणि मेले? पंधरा ऑगस्टला तर स्वातंत्र्य दिन मानायचं गांधीजींनीही नाकारलं. इंग्रज गेले, खरं. पण आलं ते राज्य 'स्व' अथवा 'पर' हे कळायला आमचा राष्ट्रीय 'स्व' कोणता हे तर नको का कळायला?

अखेर 'रघुपती राघव राजाराम' भजनासहित हा लाईट अँड साऊंड शो संपू लागतो. 'ईश्वर अल्ला तेरे नाम। सबको सन्मती दे भगवान' हे शब्द अंधुक अंधूक होत विरून जातात, मागे थोडे सूर शिल्लक रहातात. एकम् सद् विप्रा बहुधा वदन्ति ही तर इथल्या संस्कृतीची जीवनश्रद्धा. मग हिच्याच पोटी शतकानुशतकांची विषमता जन्माला आली कशी? संस्कृतीच्या व्यक्तिमत्त्वातल्या या दुभंगपणाचं मूळ– प्रभाकर पाध्येंसारखा विचारवंत म्हणतो त्याप्रमाणे– मानवी मेंदूच्या जीवशास्त्रीय रचनेतच आहे? की इतिहासाचा 'डायलेक्टिकल' प्रवास हा असाच अनर्गल विसंगती, दुभंगपणा यातून पुढे सरकत रहातो? तेवढ्यात ते सूरही संपतात. स्वच्छ फ्लडलाईटमधे परत आश्रम १९८५ सालात प्रवेश करतो तेव्हा त्या फ्लडलाईटच्या प्रकाशात हातात बंदूक घेऊन कडक उभा असलेला एक पोलीस दिसतो. नंतर समोरच्या रस्त्यावरचे रहदारी जाणवते. उजवीकडच्या पुलावरचे सोडियम व्हेपरचे दिवे, पलिकडची वस्ती.... हळूहळू आसपास चालू असलेल्या खऱ्याखुऱ्या 'लाईट अँड साऊंड' शोचं भान येऊ लागतं.

दांडी यात्रेच्या वेळी निघताना 'स्वराज्य मिळाल्याशिवाय परत साबरमती आश्रमात पाऊल ठेवणार नाही' अशी प्रतिज्ञा गांधीजींनी केली होती. नंतर परत गांधीजी आश्रमात आलेच आहेत. याचा अर्थ कसा लावायचा? चामाराचं पोर या देशाचा पंतप्रधान बनल्याचं पहाण्याची त्यांची इच्छा होती. तो कशा मार्गाने पंतप्रधान बनलेला पहाणं त्यांना हवं होतं? पन्नास टक्के राखीव जागांच्या आधारावर की संपूर्ण देश पेलू शकणाऱ्या कर्तृत्वाच्या आधारावर? चामाराच्या पोराला पंतप्रधान म्हणून पेलताना हा देशही एक मोठी परीक्षा पास झालेला असेल असेच त्यांना वाटलं असेल ना! पण चामाराच्या पोराना तर वाटतंय 'अजून उजडायचं आहे.' हे उजाडेल कधी? गांधीजी साबरमती आश्रमात परत येतील कधी?

स मा प्त

राजहंस प्रकाशन

कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईचं सुख? तिला दुःख आहेच कुठे?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न!

ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

लीला पाटील

मुख्याध्यापकांचा गुरू

एका नावाजलेल्या शाळेतल्या शिक्षकाशी त्या दिवशी मी बोलावे असे ठरविले होते. वेळेच्या थोडी आधी मुद्दामच मी तेथे पोचले. ज्याच्याशी बोलायचे त्याचा थोडा 'फील' घेण्यासाठी. शिक्षक खोली सुसज्ज होती. तिथे लावलेल्या एका भित्तिपत्रकाने माझी नजर वेधून घेतली. अमेरिकेतील नॅशनल एज्युकेशन असोशिएशनच्या आचार सहितेतील विद्यार्थ्यांच्या सदर्भातील भाग तेथे उद्धृत केला होता. मी वाचू लागले.

विद्यार्थ्यांशी बांधिलकी

१) विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रयत्नात त्याला स्वतंत्र कृतीपासून न्याय्य कारणाशिवाय दूर ठेवणार नाही अगर विविध दृष्टिकोन समजून घेण्याला अडकाठी आणणार नाही.

२) कोणत्याही विषयाचा आशय हेतुतः दडपून टाकणे अथवा तो विकृत स्वरूपात पुढे मांडणार नाही.

३) जात, वर्ण, पथ, राष्ट्रीयत्व याखातर कोणत्याही विद्यार्थ्यास सहभागातून वगळणे, एखाद्या उपक्रमाचे लाभ नाकारणे अथवा भेदभावपूर्ण वागणूक असे करणार नाही. विद्यार्थ्यांशी असलेल्या नात्याचा खासगी फायद्यासाठी वापर करणार नाही.

४) व्यावसायिक सेवा करीत असता मिळालेली माहिती गुप्त राखेन.

५) शैक्षणिक अर्हता प्राप्त इतर शिक्षक उपलब्ध असताना वर्गातील विद्यार्थ्यांची सशुल्क शिकवणी घेणार नाही.

आचारसहितेतील विद्यार्थ्यांशी बांधिलकी म्हणून ज्या गोष्टी वाचल्या त्या फार महत्त्वाच्या वाटल्या. आपल्याकडेही शिक्षकाच्या राष्ट्रीय, विभाग व जिल्हा पातळीवर सघटना आहेत. शिक्षकानी अशी एखादी आचारसहिता स्वीकृत केल्याचे निदान मला तरी माहीत नाही. परतु दररोजच्या व्यवहारात अशा किती तरी घटना घडतात की, ज्या पाहून असे वाटते की, शिक्षकांसाठी काही आचारसहिता असणे आवश्यक आहे. असे विचार करीत करीतच सभा सुरू झाली आणि सपलीही ! परंतु शिक्षकाच्या खोलीत ती आचारसहिता का बरे लावली असेल हा विचार मला चैन पडू देईना. सभा सपल्यावर मुख्याध्यापकांना त्याबद्दल विचारले. मुख्याध्यापक गंभीर झाले म्हणाले, 'ऐकायचे आहे का ? ऐका तर मग.'

'—या गावातील ही नामवंत शाळा. बहुसख्य विद्यार्थी मध्यमवर्गीय अथवा उच्चमध्यमवर्गीय स्तरातील. अगदी अपवादात्मक विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या गरीब स्तरातील. इयत्ता सहावीच्या वर्गात असाच एक गरीब विद्यार्थी होता. त्या वर्गाच्या वर्गशिक्षिका उच्च अभिरूचीपूर्ण, सुदर व सुखवस्तू वही दाखवायला, हस्तकामातील चूक सुधारण्यासाठी, शका विचारायला तर कधी त्या सुदर बाईच्या जवळपास एक दोन मिनिटे घालवायला तो गरीब विद्यार्थी बाईच्या जवळपास घुटमळे तो जवळ आला की बाई 'जागेवरून नाही का विचारता येत तुला ?' असे म्हणत तर कधी अत्तर शिंपडलेला आपला रुमाल नाकाजवळ धरत. 'किती मळकट आणि घाणेरडा असतोस तू.' असे म्हणत. तो विद्यार्थी आपल्याजवळून लवकरात लवकर बाजूला कसा जाईल यासाठी नाना युक्त्या बाई योजीत. असे बरेच वेळा घडले. एके दिवशी शाळा सुटायच्या सुमारास एक मोलकरणीसारखी दिसणारी बाई शाळेत आली. उच्चभ्रू लोकासाठी असलेल्या या शाळेत त्या बाईचो कुठली वर्दी लागायला ! पण सुदैवाने भेट झाली तिची आणि माझी. ती बाई म्हणाली. 'काई नाई जी. आमच्या संतरामला न्यायला आलोय जी. लय येळान येतोया घरी.'

मी चाटच पडलो. सहावीत शिकणारा संतराम दररोज कशासाठी शाळेत थांबत असेल असा विचार करीत मी संबंधित वर्गशिक्षिकेला बोलाविले. 'कोण संतराम ? हा हा तो फाटके, मळकट कपडे घालणारा पोरगा होय ? मला काय माहीत तो कुठे जातो ते ? भारी घाण वास येतो तो जवळ आल्यावर' बाई बोलल्या.

चौकशी करून कळवतो असे सागून मी त्या सतरामच्या आईला दवडले तरी संतरामच्या प्रश्नाने माझ्या मनात घर केले. दुसरे दिवशी मी सतरामला कार्यालयात बोलावले. 'काय रे ? काल तुझी आई आली होती. कुठे जातोस तू शाळा सुटल्यावर ? काय करत असतोस ?' एवढेसे पोर की पण सह्याद्रीसारखे अविचल राहिले. हूं नाही हां नाही.मी अधिकच बुचकळ्यात पडलो प्रश्नाचा गुता सोडवायचा असे ठरविले संतराम शाळेतून बाहेर पडल्यावर कुठे जातो, कोणाबरोबर जातो, काय करतो, किती वेळ तिथे असतो या साऱ्याचा तपशील गोळा करायला सुरुवात केली. चौकशीअती समजले की शाळा सुटल्यावर सतराम गावाबाहेरच्या एका टेकडीवर जातो. तिथे काहीतरी खुडबुड करतो. खूपवेळ विचारमग्न बसतो आणि उदास चेहऱ्याने परततो. सतरामचे प्रकरण अधिकच गभीर बनले. एके दिवशी स्वतःच सतरामच्या मागावर गेलो. अधार पडत आला तसे सतरामने खिशातून काही काढले आणि एका ठिकाणचा दगड बाजूला करून तेथे ठेवून दिले मी हळूच पुढे झालो. सतरामच्या खाद्यावर हात ठेवला. नतर बराच वेळ मी सतरामशी बोलत होतो.

सतरामने मनातला बाईंच्याविरुद्धचा सारा विद्रोह रिता केला. शेवटी तो म्हणाला, 'मी त्याचा खून करणार आहे. ही कात्री, हे ब्लेड, हा चाकू अशी हत्यारे मी गोळा करतो आहे.' जे काही समजायचे ते मी समजलो. मी त्याला जवळ घेतले. बराच वेळ त्याच्याशी बोललों—कधी त्याचा हात हातात धरून तर कधी त्याच्या पाठीवरून हात फिरवत— 'कोणाचा राग आला म्हणून त्या माणसाला ठार मारायचा का विचार करायचा ? आईचा नाही तुला कधी राग येत ?'

माझ्या बोलण्यापेक्षा माझ्या स्पर्शामुळे संतराम थोडासा शात झाला. बाईंशीही

नंतर दोनतीनदा 'बोललो. 'आर्थिक किंवा सांस्कृतिकदृष्टया वंचित विद्यार्थ्याकडे आपण विशेष लक्ष दिलं पाहिजे. त्यांच्यात जे चांगलं आहे त्याची प्रशंसा करून त्यांना इतर अभ्यास करण्यास प्रवृत्त केलं पाहिजे. तुमच्यासारख्या रूपवान, हुषार बाईंनी आपल्या पाठीवरून हात फिरवावा हा अनुभवही पाचवी–सहावीतील वंचित मुलां–मुलींना प्रेरक वाटतो. वर्गात तुम्ही तुकारामाचे अभंग शिकविता 'तुका म्हणे जे पुत्रासि। तेचि दासा आणि दासी' असे सांगणारा तुकाराम आठवा. तुमची मुले नाही का लडिवाळपणे तुमच्या जवळ येत ? संतरामला तुमच्या संरक्षक प्रेमाची गरज आहे. त्याला प्रेम द्या.'

हा सारा प्रकार घडल्यानंतर दुसरे दिवशी अमेरिकेतील नॅशनल एज्युकेशन असोसिएशनची आचारसंहिता मोठ्या अक्षरात लिहून घेऊन ती शिक्षकांच्या खोलीत मी लावली. काही दिवसांनी झालेल्या शिक्षकसभेच्या विषयात त्या आचारसंहितेचाही समावेश केला. कळत अथवा न कळत आपण अजूनही जातीविषयक अथवा लिंगविषयक अवहेलनेचे शब्द कसे वापरतो याची उदाहरणे सभेत दिली. 'चांभाराच्या देवाला खेटराचीच पूजा हवी.' 'नुसता जातीनेच नव्हेस तर हृदयानेही मांग आहेस, 'मुलींनी पी. टी. च्या तासाला झाडाच्या सावलीत बसायचं, मुलांनी उंचउडचा आणि मुलींनी दोरीवरच्या उडचा मारायच्या, फोटोच्या वेळी मुलीनी शिक्षकांच्या पायापाशी खाली बसायचं, मुलांनी फुटबॉलच्या मॅचेसचं चित्र काढायचं आणि मुलींनी स्वयंपाक घराचं चित्र काढायचं–तळमळीने बोलतच राहिलो. 'कांदा मुळा भाजी ! अवघी विठाई माझी' असे म्हणणाऱ्या सावता माळघाप्रमाणे शिक्षकानेही आपले विद्यार्थी परमेश्वरस्वरूपच मानले पाहिजेत. तुम्ही आणि मी आपली दररोजची भाकरी आपल्या विद्यार्थ्यांमुळे खातो. विद्यार्थ्यांचे कल्याण, त्यांचा विकास हाच आपला धर्म असला पाहिजे.' असे काही बाही बोलत राहिलो.' मला सारी हकीगत सांगता–सांगता मुख्याध्यापकांचा स्वर गहिवरला. ते मला म्हणाले. 'संतरामनं मला शिक्षकाची आचारसहिता जगायला प्रेरणा दिली. अमेरिकेतील शिक्षकांनी मान्य केलेली आचारसंहिता मी पूर्वी वाचली होती; पण त्या शब्दांच्या पलीकडचा अर्थ संतरामने मला शिकविला. विद्यार्थ्यांशी बांधिलकी म्हणजे केवळ घंटा झाली की वर्गावर जाणे आणि ग्रामोफोनची तबकडी वाजल्याप्रमाणे शिकविणे नव्हे याचा प्रत्यय संतरामने दिला. दत्तमहाराजानी अनेक गुरू का केले हे उमजले मला. विद्यार्थ्यांशी बांधिलकी याच्या विभिन्न अर्थांचा विचार करावयास लावणारा संतराम हा माझा एक गुरू आहे.'

मुख्याध्यापकांचा निरोप घेऊन परतताना माझ्या मनात येत होते की खरेच विद्यार्थ्यांच्या बांधिलकीचे आचारसंहितेतील कलम परिपालनास किती अवघड आहे. शिक्षकाची प्रत्येक क्रिया त्याच्याकडून दिले जाणारे उदाहरण, केली जाणारी आज्ञा, सूचना, विनंती, शिकविला जाणारा आशय, प्रत्यक्ष वा सूचित अधिक्षेप, प्रसंसनाच्या वाबी–हे सारे व या साऱ्या पाठीमागे सुप्त स्वरूपात असणारे सारे विद्यार्थी पहात असतात. ऐकत असतात. अनुभवत असतात. संतरामने म्हणूनच ओळखले की बाईना त्याच्याविषयी व पर्यायाने दरिद्री मुलांविषयी नफरत आहे. त्याने त्याचा तरीका शोधला होता. खैर, की स्वशातून प्रेम देणारे व शब्दातून संजीवनी देणारे एक मुख्याध्यापक संतरामला मिळाले. संतरामला आपणही आपला गुरू करू या.

□

विज्ञान

सूर्याची अमोल देणगी : गाढ झोप

ध्रुववृत्तापलिकडे रहाणाऱ्या लोकांना दरवर्षी हिवाळ्याचे कित्येक महिने सूर्यदर्शन होत नाही. इतकेच नव्हे तर दिवसाचा उजेडही दुर्मिळ होऊन जातो. सूर्य दिवसभर क्षितिजाखालीच असतो आणि फक्त मध्यान्ही तास दोन तास उदासवाणा उजेड पडत असतो. सूर्यप्रकाशाच्या अभावाचा सर्व सजीव-निर्जीव सृष्टीवर परिणाम होतच असतो. अत्यंत कृत्रिम जीवन जगणाऱ्या शहरी माणसावरसुद्धा ऋतुमानाचा परिणाम होतो.

ट्रॉम्सो हे नार्वेमधील सर्वात उत्तरेकडील शहर आहे. येथील लोकांना–निदान बऱ्याच लोकांना–हिवाळ्यात एका विशिष्ट प्रकारचा निद्रानाश जडतो. अत्यंत थंडी आणि खूप अंधार यामुळे खूप झोप येत असेल असे आपल्याला वाटेल; पण तसे होत नाही. उलट झोप न आल्याने लोकांना मध्यरात्रीपर्यंत अंथरुणावर तळमळत पडावे लागते. ट्रॉम्सोच्या जवळजवळ २५ टक्के लोकांची हिवाळ्यात झोपेची तक्रार असते व आणखी ५ टक्के लोक मनःस्वास्थ्य गमावून बसतात. या निद्रानाशाचा त्रास पुरुषांपेक्षा स्त्रियांना, मध्यमवयीन किंवा वृद्धांपेक्षा तरुणांना जास्त होतो असे दिसून आले आहे. बाहेरून ट्रॉम्सोला येणाऱ्यांना हा त्रास होतो तसाच पिढ्यान्पिढ्या तेथेच रहाणाऱ्यांनाही होतो. या विकाराचा व एकंदर मानसोपचार तंत्राचा अभ्यास करण्यासाठी येथे एक इस्पितळ स्थापन झाले आहे. अस्गार्ड सायकिॲट्रिक हॉस्पिटल असे त्याचे नाव आहे. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत दिवस व तेथून पुन्हा सूर्योदयापर्यंत रात्र अशा दिनक्रमाची माणसाच्या शरीराला व मनाला इतकी सवय झालेली आहे की त्यात बदल झाल्यास शरीर व मन दोन्ही अस्वस्थ होतात.

मारी ओस्टेनसेन यांचा अनुभव अगदी सार्वत्रिक आहे. त्या म्हणतात : चांगली झोप यावी म्हणून मी सर्व उपाय केले. व्यायाम, फिरणे, दिवसाच्या इतर वेळा जराही डुलकी न घेणे आणि रात्री झोपताना गरम दूध घेणे; पण कशाचाही उपयोग होत नाही. आज अगदी छान झोपायचे असे ठरवून मी अंथरुणावर पडून डोळे मिटून घेते; पण झोप लागत नाही. जसजसा वेळ जातो तसतसा 'आता झोपलेच पाहिजे' असा विचार मनात येतो. आणखी तासाभराने 'आता तर रात्र संपत आली, आता झोप येणारच नाही' हा विचार बळावतो शेवटी न झोपताच मी ५ वाजता उठून कामाला लागते, झाले.

अस्गार्ड हॉस्पिटलमधील डॉ. ब्रॅटलिड व डॉ. हॅन्सेन यांच्या संशोधनाने असे सिद्ध झाले आहे की, वरील प्रकारच्या निद्रानाशाचे कारण एक संप्रेरक (हार्मोन) किंवा खरे तर त्याचा अभाव आहे. मेंदूच्या खालील बाजूस पिनियल ग्रंथी असते. तिच्या स्त्रावात मेलॅटोनिन असते. रक्तातील मेलॅटोनिनचे विशिष्ट प्रमाण नसेल तर झोप येत नाही. खरे म्हणजे मेलॅटोनिन हे झोप येण्याचे औषध असे नाही. शारीरिक व मानसिक ताणावरील प्रतिक्रिया नियंत्रित करण्याचे काम रक्तातील मेलॅटोनिन करते. हे ताण नियंत्रित झाले की, स्वास्थ्य म्हणजेच आरामाची स्थिती निर्माण होते व झोप येऊ शकते. पिनियल ग्रंथीला डोळ्यांवाटे मिळणाऱ्या उजेडावर (दिवसाचा प्रकाश, प्रत्यक्ष ऊन नव्हे) मेलॅटोनिन निर्मितीचे प्रमाण अवलंबून असते अशी आश्चर्यकारक गोष्ट वरील डॉक्टरद्वयांना आढळून आली. मात्र शरीरात मेलॅटोनिन रात्रंदिवस निर्माण होत असते आणि रात्री ३ च्या सुमारास त्याचे प्रमाण सर्वात जास्त असते.

सूर्यप्रकाशाऐवजी विजेच्या दिव्याचा प्रकाश पाडून काही प्राण्यांच्या मेलॅटोनिन निर्मितीत फरक पडतो असे दिसते. परंतु माणसाला त्याचा उपयोग होत नाही. प्रकाश मोजण्याचे एकक 'लक्स' हे आहे. उन्हाळ्यात दिवसाचा उजेड २५०० लक्स किंवा जास्तच असतो. ध्रुवप्रदेशातील हिवाळ्यात दिवसाचा उजेड जास्तीतजास्त ५०० लक्स असतो. घराच्या आतील भागात तर तो ३०० लक्स इतकाही नसतो. स्वाभाविकच ट्रॉम्सोसारख्या ध्रुवीय प्रदेशातील शहरात राहणाऱ्या लोकांच्या शरीरात फार कमी मेलॅटोनिन निर्माण होते. व त्यांना निद्रानाशाचा विकार जडतो.

विजेच्या दिव्याचा कृत्रिम प्रकाश आणि सूर्यापासून मिळणारा नैसर्गिक प्रकाश यात केवळ मंद-प्रखर एवढाच फरक नाही. म्हणूनच साध्या विजेच्या दिव्याच्या उजेडाने सूर्यप्रकाशाची उणीव भरून काढता येत नाही. सूर्यप्रकाशात अल्ट्राव्हायोलेटपासून इन्फ्रा-रेडपर्यंतच्या सर्व प्रकारचे विद्युच्चुंबकीय किरण असतात. त्यामुळे सूर्यप्रकाशाला एक दाहक पण तरीही संजीवक सामर्थ्य प्राप्त झालेले आहे. ब्रॅटलिड व हॅन्सेन यांनी खास उपकरणे वापरून सूर्यप्रकाशासारखा प्रकाश देणारे दिवे तयार केले व त्यांचा आपल्या पेशंटवर दररोज सकाळी अर्धा तास उपयोग केला म्हणजे त्यांना या दिव्यांच्या प्रकाशात बसवून ठेवले, इतकेच. केवळ एक आठवडा दिलेल्या या 'सूर्यप्रकाशाने' त्यांची झोप चांगलीच सुधारली.

अन्न आणि सर्व प्रकारची ऊर्जा अंतिमतः सूर्यापासूनच मिळते यात शंकाच नाही; पण आपली गाढ सुखाची झोपसुद्धा आपल्याला 'सुंदर प्रकाश सूर्य देतो' म्हणूनच लाभते!

–भा. रा. बापट

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा
१९८४ मधील
शिवराम महादेव परांजपे
ग्रंथ पुरस्कार लाभलेलं पुस्तक

निर्माणपर्व

लेखक - श्री. ग. माजगावकर

● मूल्य चाळीस रुपये

राजहंस
प्रकाशन, पुणे

नावडकर

MANOOS WEEKLY (Licensed to post without prepayment of postage No–11) Regd. No. PNCW–28

राजहंसची
दोन नवीन प्रकाशने

मराठी माणसाला "नाटक" हा आणखी एक अवयव विधात्याने बहाल केला आहे. असे अनेक कलावंत आहेत की आपली वहिवाटीची वाट सोडून नाटकाच्या बिकट वाटेकडे वळले आहेत. म्हणूनच आपली मराठी रंगभूमी एक वेगळाच घाट घेऊन मानाने मिरवीत आहे. रंगभूमीच्या या हृद्य आठवणी अगत्याने सांगण्याचा हेतु इतकाच की, आजच्या पिढीला आपल्या पूर्वसुरींची ओळख व्हावी, आठवण रहावी नि त्यांच्याबद्दल सदैव कृतज्ञता वाटावी.

साप्ताहिक माणूस मधील
गाजलेल्या लेखमालेचा संग्रह

नाट्यपंढरी

गो. रा. जोशी

किंमत वीस रुपये

श्री. कुलकर्णी यानी या पुस्तकात ऊर्जेच्या प्रश्नासंबंधी माहिती, आपल्या देशाच्या संदर्भात दिली आहे आणि तिच्या वापरासंबंधी सर्वांची जबाबदारी काय आहे याविषयी चांगले विचार मांडले आहेत. निरंतर मिळणाऱ्या ऊर्जेच्या उपयोगासाठी माणसाचे काय प्रयत्न चालू आहेत आणि भावी काळात त्यांची दिशा काय राहील याचेही चांगले दर्शन मिळते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही सर्व शास्त्रीय माहिती व आकडेवारी, किचकट न करता, सुलभ भाषेत सांगितली आहे. विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्य वाचकांना, ऊर्जेची आजची समस्या, त्याची कारणे आणि त्यावरील उपाय याविषयी सोपी परंतु मूलभूत माहिती या पुस्तकाद्वारे होईल, असे वाटते.

ऊर्जा प्रश्न
आशा उद्याच्या

प्रि. खं. कुलकर्णी

किंमत पंचवीस रुपये

वि. ग. भिडे
कुलगुरु
पुणे विद्यापीठ

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०
फोन : ४४३४५९

C/o श्री. वा. र. गोडे ४१, भवानी शंकर रोड, चितळे पथ कॉर्नर
जोशी वाडी, दादर (प) मुंबई ४०० ०२८ फोन : ४२२५४५५